# उज्ज्वल उद्यासाठी

## बाबा आमटे

ग्रं. सं. ठाणें
म.
विषय निबंध
क्र. 2231
१८८३
REFBK-0018706

संदर्भ.
निबंध 2239
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना
C0384 निबंध
२२३९ १ धिवळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 SEP 1975
19 SEP 1976
-7 JUN 1978
18 JUN 1978
28 JUN 1978
30 JAN 1980

[कु: मा. प.]

उज्ज्वल उद्यासाठी

# उज्ज्वल उद्यासाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १८७०६
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

बाबा आमटे

REFBK-0018706
REFBK-0018706

प्रकाशक डॉ. सी. तु. गुजर
युवक अकादमी
महाराष्ट्र आरोग्य मंडळ
हडपसर
पुणे ४११ ०२८

मुद्रक सुजित पटवर्धन
संगम प्रेस लिमिटेड
१७ ब कोथरूड
पुणे ४११ ०२९

प्रमुख विक्रेते साधना प्रकाशन
४३०/४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ सुभाष अवचट

किंमत
आठ रुपये

# उज्ज्वल उद्याच्या दिशेने वाटचाल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८०३४६
२२३९

एकोणीसशे एक्कावन सालची ही गोष्ट आहे. रावसाहेब पटवर्धन यांच्या सांगण्यावरून विदर्भातील विधायक कार्याची केंद्रे पाहण्यासाठी तिकडे गेलो होतो. श्री. बाबा आमटे यांच्यासंबंधी तेव्हाच प्रथम ऐकले आणि वरोडा येथे गेलो. गावाबाहेर जंगलवजा एका जागेत ते राहात होते. एक छोटीशी झोपडी आणि कुष्ठरोगी ! जंगलातली सर्व सुख-दु:खे तिथे जागी होती. बाबा आणि साधनाताई एखाद्या आरण्यक ॠषीप्रमाणे तिथे राहात होते. पण खरे म्हणजे बाबा स्वप्नातच वावरत होते आणि त्या स्वप्नात साधनाताईही एकरूप झालेल्या होत्या. हे स्वप्न झपाटून टाकणारे होते. बाबांमध्ये एक अलौकिक ताकद आहे. त्यांच्याशी साधारणत: मूक वाटणाऱ्या वस्तू, निसर्ग आणि माणसे असे काही बोलत-सांगत की ते आपल्याला ऐकू येत नाही. त्या वेळचे त्यांचे शब्ददेखील वरवर रांगडे वाटणारे, पण जीवनाचे रणांगण तुडवून आलेले असे असल्याने अतिशय प्रत्ययकारी होते. ते शब्द भूतकाळ भेदून त्यावर भावनांचा प्रकाश टाकणारे होते, तसेच ते भविष्यकाळा-तील स्वप्ने रंगवणारे व ती स्वप्ने सत्य होतील असा इसार देणारेही होते. आत्मविश्वासाने ते अभिमंत्रित झालेले होते. ते शब्द करमणुकी-साठी ओठांवरून उमललेले शब्द नव्हते तर आवरत नाही म्हणून उचंबळून ओसंडणारे शब्द होते ! थोर पुरुषांचे निकट दर्शन घेऊन आदर बाळगणारा, पण अनुकरण न करणारा असा हा माणूस होता. सर्जनशील विचारक आणि कृतिशील कार्यकर्ता त्यांच्या ठायी समूर्त झालेला दिसला. साने गुरुजींच्या मनोभूमीत तरळणारी स्वप्ने भूमीवर उतरवण्यासाठी आसुसणारा, बेचैन झालेला माणूस मला दिसला. गुरुजींनी जे साहित्यात रंगवले, पण भूमीवर उतरवण्याची उसंत त्यांना

मिळाली नाही तेच तेथे धडपडत असलेले मला दिसले आणि न कळ-तच आम्ही एका परिवारातले आहोत असे आतून जाणवले.

तोवर बाबांनी जो प्रवास केला होता आणि जे प्रयोग केले होते ते विलक्षण होते. उत्कट आणि जागरुक – संवेदनाशीलतेने जीवनाकडे पाहणाऱ्या माणसाची घडण कशी होत जाते ते पाहण्यासारखे होते. अतिशय मामुली समजल्या जाणाऱ्या गोष्टीही जीवनातील एक एक वळण ठरत होत्या. विचार पटणे आणि वर्तन होणे यात मुळी अंतरच नव्हते. त्यामुळे जीवनात नित्य नवीनता आणि रमणीयता होती. विचारांचे डबके होऊन जड कर्मकांडाची अवकळा आलेली नव्हती. आत्मपुरुषार्थावर अलोट विश्वास होता, पण लोकांना तोडणारा अहं-कार नव्हता. उद्धट वाटावी अशी रग होती, पण ती स्वत:साठी होती. 'जया न कोणी प्रभू मी तयाचा। तदर्थ हे हात तदर्थ वाचा' ह्या साने गुरुजींच्या तळमळीतील ओळी तेथे समूर्त-साकार झालेल्या दिसत होत्या. श्रमाश्रमाचा टप्पा ओलांडला गेला होता. श्रमाचा अपहार श्रमिकांनाच असह्य वाटण्यासाठी श्रमाचा व्रत म्हणून स्वीकार करावा लागतो, याची जाण आली होती. श्रमातील नवसर्जकतेचे भान झालेले होते. साम्यातील संघटनेची शक्ती अनुभवाला आली होती. ज्या टप्प्यावर कृतार्थतेने माणसाने थांबावे आणि पूर्वपुण्याईचे चेक वट-वीत सुखाने कालक्रमणा करावी तो टप्पाही वाट रोखून उभा राहिलेला नव्हता. अभयाची जागरूक साधना चाललेली होती. ज्या ठिकाणी विचाराचा मुक्काम गाठला म्हणून विसावा घेण्यासाठी थांबावे तो नव्या उड्डाणाचा इशारा ठरत होता.

तारुण्यातील सर्व उत्कट भावनांचे विलसित अनुभवूनही मनाला बोथटपणा आलेला नव्हता. जीवनातील रुद्र रमणीयता अनुभवण्याची उत्सुकता होती. विचार आणि वर्तन यांत एकतानता आली म्हणजे विचार हा बौद्धिक विरंगुळा किंवा चैन राहात नाही, वास्तवाचा विसर पाडणारी ती गुंगी बनत नाही आणि वर्तनाला जड कर्मकांडाची अवकळा कधी येत नाही. प्रत्येक क्षण उत्कट रसरसत्यापणाने उपभोगायचा ही मामुली गोष्ट नव्हे, अखेरचा वाटणारा टप्पा हा पुढील मुक्कामाकडे वाटचाल करण्याचे आमंत्रणच असतो. अभयसाधनेच्या दृष्टीने अनेक शारीरिक झुंजी झाल्या होत्या आणि त्याच्या खाणाखुणा शरीरावर अंकित झालेल्या होत्या. पण मनोबुद्धीला आव्हान मिळालेले नव्हते.

पावसात, चिखलातून खुरडत जाणारा महारोगी मैल्याची पाटी डोकी-करून नेणाऱ्या नगराध्यक्षाच्या नजरेला पडला आणि मनातील मर्यादित करुणेने त्याचा पावसापासून बचाव करण्यासाठी डोकीवरची चुंबळ त्याच्या अंगावर टाकली आणि जीवन मुळापासून हादरवणारे आव्हान मिळाले. करुणेच्या वेशाने वावणाऱ्या भीतीची जाण आली आणि अभयसाधनेतील त्रुटी ओळखून महारोगीसेवेला स्वतःला वाहून घेऊन अभयसाधनेला पूर्णता आणण्याचा निश्चय झाला. आणि वकील, नगराध्यक्ष, नवपरिणित पती या सर्व भूमिका उपऱ्या ठरून कलकत्त्याच्या स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनच्या रोखाने प्रवास सुरू झाला. सर्जनशील मन दुसऱ्याच्या अनुभवाने कधीच तृप्त होत नाही. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे ज्ञाताच्या कुंपणापलीकडे झेपावणे हा त्याचा स्वभावच असतो. महारोगाच्या निवारणार्थ प्रयोगासाठी आपले शरीर वापरू देण्याची तयारी बाबांनी दाखविली तेव्हा अनेक सांस्कृतिक कथांना सत्यत्व आले ! "माझ्या शरीरात महारोगाचे जंतू घुसवा आणि त्यातून महारोगउच्चाटनासाठी एखादी लस तयार करता येते का पाहा" असे सांगणे ही करुणेची, निर्भयतेची परमावधी झाली ! बाबांना महारोगाच्या जंतूंनी धोका दिला नाही. परंतु माणसाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राण्याला महारोगाचे जंतू आपला म्हणत नाहीत हे ज्ञान घेऊन आणि महारोगनिवारणाचे तंत्र अवगत करून बाबा वरोड्याला येऊन जंगलात बसले होते.

आपल्या संस्थेची नावेदेखील आपल्या मनोभावना अजाणपणे व्यक्त करून जातात. अनाथ विद्यार्थी गृह हे नाव तेथे आश्रय घेणाऱ्याला अनाथपणाची बोचणी सतत देत असते आणि अनाथांचे साहाय्यक झाल्याचे अहंतापूर्ण समाधानही पुष्कळांना मिळवून देते ! बाबा आमटयांना एखादे करुणालय वा रुग्णालय किंवा कुष्ठनिवास उभारायचाच नव्हता तर जिथे आनंद कोंदाटला आहे आणि त्यामुळे शारीरिक व्यंगव्याधींचे विस्मरण झाले आहे असे आनंदवन त्यांना उभारायचे होते. रोगापेक्षा आनंद अधिक लागट, संक्रामक असतो हे त्यांना दाखवायचे होते. विनोबांच्या हस्ते आनंदवनाचे उद्घाटन झाले, पण दत्तपूरच्या कुष्ठधामाच्या कल्पनेपाशीच बाबा थबकले नाहीत. जे नाही त्याचा शोक करीत जे आहे त्याची विटंबना करण्याचा नतद्रष्टपणा कोणीच करू नये, तर जे आहे ते कृतार्थ होऊन नाही त्याचा शोकसंताप नाहीसा कसा करील याची योजना करावी, हा बाबांचा

मानस. ‘ चॅरिटी डिस्ट्रॉइज, वर्क बिल्ड्स – दान नादान करते, काम उभारते ’ हा मंत्र घेऊन बाबा आनंदवनात आले.

त्या वेळचे आनंदवन कसकसे आकारत गेले ते ज्यांनी डोळ्यांनी पाहिले त्यांनाच आजच्या सर्व ऋतुंची समृद्धी आपल्या कवेत घेण्यासाठी पुरुषार्थ करणाऱ्या आनंदवनाची महती कळेल. असे गर्द रान आणि अशी जोमदार झाडे की जमीन उठीत करण्यासाठी भगीरथाचा पराक्रम करावा लागावा. आणि हे सर्व पंगू हातांनी घडवून आणायचे ! जमीनमायला पान्हा फुटावा म्हणून जे कभिन्न कातळ फोडावे लागले त्यांची कल्पना करायची तर हैदराबादच्या परिसरातील राक्षसी पत्थरांकडे एकदा नजर टाकावी ! ‘ नित्य नवा दिस जागृतीचा ’ असे तुकारामाने म्हटले आहे त्याचे दर्शन आनंदवनात घडत होते. आणि हे सगळे घडत होते तेव्हा बाबांचे शरीरस्वास्थ्य अत्युत्तम होते असेही नव्हे. मुंबईतील विशेषज्ञांना बाबांची प्रकृती अनेक आव्हाने देत होती ! असह्य दुःखात उपचारांबरोबरच नवनवी स्वप्ने हाही विरंगुळा बनत होता. आजही त्या स्थितीत फारसा फरक नाही. पुष्कळदा तर हा रुग्णाईतच इतका माहितगार ठरायचा की डॉक्टरांनीही अचंबा करावा ! आकारास येणारे आनंदवन, बाबांचे हे अनोखे आजार, सगळे पाहाणे हादेखील एक विलक्षण अनुभव होता. आनंदवनात जावे, बाबांच्या सहवासात काही क्षण राहावे आणि अनेक अंगांनी रोमांचित होऊन परतावे, हा एक सततचा क्रम झाला. इतरांना जी स्वप्ने वाटतात ती त्यांच्या कार्यक्रमाचा आराखडा आहे असे अनेकदा सिद्ध झाले. पाहता पाहता आनंदवन बहरले. कृषिऔद्योगिक ग्रामाच्या कल्पना चर्चिल्या जात असतानाच आनंदवनाने असा एक नमुना उभा केला. श्रमातून भांडवलनिर्मिती करण्यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे असा काळजीचा सूर निघत असताच ‘ श्रम ही है श्रीराम हमारा ’ म्हणत घामाचे सिंचन करणाऱ्या रुग्णाइतांनी श्रमातून भांडवलाची निर्मिती कशी करता येते याचा एक पदार्थपाठच सिद्ध केला. भांडवल फस्त करणारे राष्ट्रीयीकरण देश पादाक्रांत करण्याच्या पवित्र्यात उभे असताना समाजाला भांडवल उभारून देण्याचा पुरुषार्थ आनंदवन करीत होते ! इस्राएलला जाऊन तिथल्या किबुटझ आणि मोशावच्या समाजवादी प्रयोगांची तोंड फाटेपर्यंत स्तुती करणारी कान किटवणारी व्याख्याने दिली जात असतानाच आनंदवनात अद्वितीय असे रुग्णाइतांचे किबुटझ उभे राहिले होते. ‘ विना अपहार नही

सहकार' असा दारुण अनुभव येत असतानाच अनुदान व कर्ज यांचा आधार न घेता स्थानिक स्वयंप्रेरित सहकारी संस्थांनी आनंदवन गजबजत होते. अपंगांना उपकारकर्ते बनवण्याची ही किमया शांतपणे आनंदवनात घडत होती आणि वारा हे वेद जगभर घेऊन जात होता! आपले रेडिओसेट्स योग्य स्थानी काटा आणून ठेवलेले नसल्याने आणि त्यातून ऊर्जा खेळत नसल्याने आपल्याच निकटचे हे संगीत आपण मात्र ऐकू शकत नव्हतो!

सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनलचे देशी-विदेशी स्वयंसेवक आले आणि आनंदवनातील पहिली पक्की इमारत उभी राहिली. पाहता पाहता आनंदवनातील लोकांनी बांधकामाचे कौशल्य हस्तगत केले आणि आता पक्क्या इमारतींची एक सुभग मालिकाच तेथे उभी ठाकली आहे. स्विस एडची मंडळी सुगंध शोधीत भुंग्याने यावे तशी आली आणि आनंदवन पाहून पुलकित झाली. ओसंडून त्यांचे प्रेम वाहू लागले. अपंगांचा जागलेला पुरुषार्थ सर्वांगी फुलावा म्हणून उपवास करून त्यांनी पैसा उभारला आणि देऊ केला तर आनंदवनाने तो घेण्याऐवजी टिनच्या वस्तू बनवण्याची यंत्रसामग्री स्वीकारायचे ठरवले. टिनच्या वस्तूंच्या रूपाने आनंदवन ग्रामीण जीवनात नाना प्रकारची सुभगता निर्माण करीत आहे. आनंदवनातल्या महारोग्यांनी आपल्या घामातून आर्टस्, सायन्स, कॉमर्स, अग्रिकलचर महाविद्यालये उभारली आणि ती धट्टचाकट्टचा समाजाच्या लेकरांसाठी उपलब्ध करून दिली! कोणी आनंदवनाचे कार्य ऐकून अन्नाची पोती पाठवण्याचा आपला इरादा व्यक्त केला, कारण उपासमार हीच अशांततेची जननी असते. बाबांनी त्या परदेशी मित्रांना कळवले, "डिक्लाइन वुइथ थँक्स, बिकॉज पीस वुइल लास्ट ॲज लाँग ॲज व्हीट इज देअर. गिव्ह अस द टेक्निक बाय वुइच यू प्रोडयूस बंपर क्रॉप ऑफ व्हीट.-आभारपूर्वक तुमच्या सूचनेचा अस्वीकार करावा लागत आहे याचा खेद वाटतो. शांततेसाठी तुम्ही गहू देणार, पण गहू असेपर्यंतच ही शांतता टिकणार. किंबहुधा गहू संपताच अशांतता उफाळून येणार. तेव्हा गहू पाठवण्याऐवजी गव्हाचे भांडार निर्माण करता येईल असे तुमचे उत्पादनतंत्र आम्हाला द्या!" आत्मनिर्भरतेतून विकास करण्याचे नाकारणारांच्या ललाटी अखेरीस करंटेपणच नियती लिहित असते. स्थानिक शक्ति-साधनांचा विनियोग करून समृद्धी निर्माण केली तर ती बाळसे वाढवते, दुसऱ्याकडून याचना करून अंगावर येते ती सूज असते!

बाबांच्याकडे गेले की नांगराच्या फाळाने भूमीवर उमटलेले आणि यंत्राच्या गुंजारवातून स्रवणारे सगुण-साकार साहित्य दृष्टिगत होई, त्याचप्रमाणे जीवनाचे रणांगण तुडवून येणारे अभिमंत्रित शब्दही ऐकू येत. हे सर्वांपर्यंत पोचले पाहिजे असा हव्यास वाटे. भारतीय संस्कृतीतील सर्व उर्जस्वल मूल्ये तेथे आकाराला आलेली प्रत्यास येत. आधुनिक विज्ञान, अर्थविचार, मानवी संघटना शास्त्र यांचा आढळ होई. एका बाजूला बसलेली ही आसामी विचारांच्या बाबतीत केवळ आद्यतन होती असे नव्हे तर उद्याचा वेध घेत होती. बाबांना तेथे वैचारिक सहवास मिळण्याची मारामार पडे. सहज बोलताना त्यांची व्यथा व्यक्त होई, " आय ॲम मोअर आयसोलेटड दॅन माय पेशंट्स–माझ्या रुग्णाइतांहूनही मी अधिक एकाकी आहे! " असे ते म्हणत आणि मग त्यांचे ऐकताना आपले भान हरपे आणि त्यांचेदेखील ! हे असेच सगळे वाऱ्यावर विरून जाता कामा नये, अशी तळमळ वाटे, पण बाबांचे शब्द एखाद्या किरणोत्सर्जी द्रव्यातून बाहेर पडणाऱ्या अल्फा, बीटा, गॅमा किरणांसारखे असत. सामान्यतः अभेद्य मानल्या जाणाऱ्या वस्तू हे किरण आरपार भेदून जातात, पण त्यांचा संग्रह करणे विकट ! गॉसिप वुइथ फ्लेम्स-ज्वालांशी संवाद करण्याची त्यांची उत्सुकता. पण हे शब्दांकित व्हावे कसे ? बाबांनी तर लिहिणे जवळपास वर्ज्य केलेले. शेवटी रमेश गुप्तांसारखा सच्चिदानंद बाबा लेखकू झाला; आणि बाबांच्या चिंतनाचे नवनीत सुभग आकार घेऊन प्रकट होऊ लागले.

चिंतन-शब्दांकन असा हा अभिनव प्रयोग होता. सहृदय, संवेदनाशील मराठी वाचकांचे लक्ष या प्रकाराकडे वेधले गेले. नव्या युगाच्या जाणीवा आणि जुन्यातले सत्त्व त्यांत संग्रहित झाले होते. त्यात केवळ त्यांचे मिश्रण नव्हते तर त्यातून एक नवे संयुक्त रसायनच तयार झाले होते. त्यात ग्रामीण रग आणि शहरी बुद्धिचापल्य एकत्र झाले होते. त्यात धर्माला पारिचित अशा कल्पना नवाच आकार आणि आशय घेऊन आल्या होत्या. पूर्वपरिचयामुळे कल्पना समजल्यासारखेही वाटत होते आणि ह्या परिचिताचा संकेत कुठेतरी अपरिचिताच्या दिशेचे सूचन करीत आहे असेही जाणवत होत. अभिनव असा हा रांधा होता. त्याचे सपकारेही बसत होते, पण त्यातून बाजूला व्हावे असेही वाटत नव्हते. शतकांचे शुक्र त्यात कसे सहज सामावलेले होते! पूर्वीचे संचित होते, पण बेड्या बनणारे नव्हे, गती वाढवणारे होते. अणुयुगातल्या मानवाची त्यात भरारी होती, पण शोध मात्र त्याच आदिरहस्याचा

घेतला जात होता. कलियुगाचा त्यात तिरस्कार नव्हता तर कलियुगाबद्दलही अपार आत्मीयता होती. व्हीजन, पॅशन, कम्पॅशन, कनव्हिक्शन ह्या चौखांबी पायावर हे चिंतन उभे होते. त्यात अभिनव असे दर्शन होते, त्यात झपाटण्याची शक्ती होती, करुणा होती आणि समर्पणाची ओढही होती. त्यामुळेच ही रमेश गुप्तांनी शब्दांकित केलेली चिंतने ' ज्वाला आणि फुले ' म्हणून एकत्र झाली तेव्हा स्फुट प्रकटनाने झाला त्यापेक्षा समन्वित प्रकटनाने अधिक परिणाम झाला. ' येथे नांदतात श्रमर्णी, या भूमीला क्षरण नाही, येथे ज्ञान गाळते घाम, विज्ञान दानव, शरण नाही। येथे कला जीवनमय, अर्थाला अपहरण नाही। येथे भविष्य जन्मत आहे, या सीमांना मरण नाही।' हा शोषणरहित, समतापूर्ण, परस्पर सहयोगी अशा समाजाचा जणू मार्गदर्शक मंत्रच त्यातून उदय पावलेला दिसला. निर्भीड चिकित्सा, सहानुभूत अनुभवांचे रहस्य आणि उद्याच्या जगाचे मोहक, पण चकरावून टाकणारे चित्र त्यात प्रकटले आहे.

'ज्वाला आणि फुले' यात सूचित झालेली दाहकता आणि गात्रागात्रांना पुलकित करणारा सुगंधी स्पर्श ह्या चिंतनांतून प्रत्ययास येतो. याच वेळी बाबांच्या मनात वर्कर्स युनिव्हर्सिटीचे एक नवे स्वप्न तरळत होते. असे अभिनव विद्यापीठ की जेथे कार्यकर्तृत्व आणि उत्पादनक्षमता एकवटलेली असेल. आज कार्यकर्ता हा वाचीवीर तर श्रमिक हा स्वार्थपरायण बनला आहे. स्वार्थरहितता आणि उत्पादनप्रक्रिया यांची सांगड घातली गेली पाहिजे. श्रमिक–कार्यकर्ता विद्यापीठ म्हणजे अवकाश युगातील नवभारत उभारणीची योजनाच होय! नेहमीच्या पद्धतीप्रमाणे बाबांना या योजनेने झपाटून टाकले, तोच एक ध्यास त्यांना लागला. कार्यानुभव आणि चिंतन, प्रतिभा आणि सहृदयता, नवनव्या कल्पनांना जन्म देऊ लागले. बाबांचे काम महारोग्यांतच चालत असले तरी आता त्यांच्या चिंतनाचा मुख्य विषय युवक हा बनला. वर्तमानपत्रांतल्या वार्ता बेचैन करणाऱ्या असत. बाबांचे मन ग्वाही देत असे की तरुण मनाचे उद्रेक हे त्यांच्या मानसिक रोगग्रस्ततेचे लक्षण आहे. साउंड माइंड इन साउंड बॉडी – निकोप शरीरात निकोप मन, हे सुभाषित नेहमी कानी येते. हे सुभाषित आनंदवनाने खोटे पाडले होते. पण त्याचा व्यत्यास खरा ठरू पहात होता! धडधाकट शरीरात रुग्णाईत मन असावे, अशी शंका येऊ लागली होती. तरुणांच्या मनांना महारोगाने ग्रासले तर नाही? मग हा मनाचा महारोग

लपवून काय होणार? त्याची इतरांना लागणच काय ती होणार! मग त्यावरही काही इलाज केला पाहिजे. बाबा त्या दिशेकडे वळले होते. त्यांच्या सर्व कल्पना–योजनांना मातीच्या स्पर्शाची अट असते.

ज्यांच्याशी माती बोलते अशी जी थोडी मंडळी पाहिली त्यात बाबा आमटे हे एक आहेत. त्यांच्याशी माती मौन संवाद करू लागली, त्यांना तरुणांचे बलदंड बाहू घेऊन बोलावू लागली. सोमनाथच्या जंगलात स्विस–एडच्या मित्रांसह आम्ही गेलो. आमच्या डोळ्यांना प्रकट असलेले जंगलच दिसत होते. बाबांच्या क्रांतदर्शी डोळ्यांना तिथे उभे राहणारे श्रमिक–कार्यकर्ता विद्यापीठ दिसत होते. सहज बोलता बोलता कळले की २६ डिसेंबर १९६४ ला बाबा आमटे आपले अर्ध शतक पूर्ण करणार आहेत. त्यांच्या अर्धशतकपूर्तीनिमित्त साधनेचा एक विशेषांक काढावा असे ठरविले. त्यांची प्रसिद्ध झालेली चिंतने 'ज्वाला आणि फुले'च्या रूपात एकत्र प्रसिद्ध करायचे असे ठरले. त्यांची श्रमिक–कार्यकर्ता विद्यापीठाची कल्पना लोकांपुढे आली पाहिजे असे वाटतच होते. 'नवा प्रयोग' ही साने गुरुजींची शेवटची कादंबरी. त्यात त्यांनी जे चितारले ते सोमनाथच्या जंगलात साकार होणार असे वाटू लागले. साधनेच्या विशेषांकात वर्कर्स युनिव्हर्सिटीची कल्पना स्पष्ट करणारी बाबांची रमेश गुप्तांनी घेतलेली मुलाखत आली आहे. बाबांचे अनुभवपूत विचार त्यात आहेत.

आजच्या क्षुब्ध तरुण पिढीच्या वाया जाणाऱ्या आणि कदाचित विध्वंसाकडे वळणाऱ्या शक्तींना नवनिर्मितीच्या वाटा उपलब्ध करून देणे ही मुख्य प्रेरणा. निर्मितीच्या आनंदासाठी वखवखणाऱ्या प्रश्नांशी तरुणांच्या शक्तीला जोडणे हे योजनेचे उद्दिष्ट. जीवनाचा दरेक क्षण आणि कण आनंदमय करण्याचे तंत्र अवगत करून देणे हा कार्यक्रम. परिश्रमाच्या परिसात मातीचे सोने करण्याची शक्ती असते याचे भन होणे ही उपलब्धी. श्रमाच्या अपहाराने संतापून तो थांबवण्यासाठी संघटित उठाव करणे ही क्रांतीची भूमिका. श्रम करू शकतो, तोच श्रमाचे चीज करू शकतो, ही जाणीव हा पाया. भूतदयावाद आणि महत्त्वाकांक्षा, श्रमिकांचा, अहंता व महत्त्वाकांक्षांच्या पूर्तीसाठी वापर करू शकतात, पण श्रममहिमा त्यांना अवगत नसतो. सुख आणि सुरक्षितता यांच्या हव्यासाने तारुण्य आणि पुरुषार्थ खच्ची होत असतो, ही जाणीव निद्रिस्त तारुण्याला उठवू शकते. आनंदवनात

भिकेचा वाडगाही हाती धरू न शकणारांनी लक्षावधींची विक्रमी निर्मिती करून दाखवल्याचा अनुभव गाठी होताच. करुणालयाला तेथे निर्मितीच्या कुरुक्षेत्राचे रूप आले होते.

वर्कर्स युनिव्हर्सिटीच्या निमित्ताने घेतलेली बाबांची ही मुलाखत छोटचाशा पुस्तिकेच्या रूपाने पुढे प्रसिद्ध झाली. ही पुस्तिका महात्मा गांधींच्या ' हिंद स्वराज्य ' सारखी जीवनाच्या अभिनव शिल्पाचा मनोरम आराखडा प्रस्तुत करणारी आहे. त्यातील वाक्य न वाक्य अनुभवाने अभिमंत्रित झालेले आहे आणि त्यामुळे शब्दांचे शिल्पही अतिशय रेखीव, सुभग आहे. कोठारी आयोग जगभर कल्पनांचे दारिद्र्य मिरवीत व शिक्षणविषयक आखणीसाठी जोगवा जमा करीत होता, पण त्यांना काही ह्या ठोस पायावर उभ्या राहिलेल्या योजनेची दखल घ्यावीशी वाटली नाही ! त्यामुळे कोठारी आयोगाचा अहवाल मातीच्या स्पर्शाची अट पूर्ण करू शकत नसल्याने अलमाऱ्यांची आरास फक्त बनला आहे ! बाबांनी त्या पुस्तिकेत विविध व्याख्या दिल्या आहेत त्यात एक जोम जाणवतो. प्रलयाला सृजनाने तोलून धरणारे तत्त्व म्हणजे श्रम, ह्या वाक्याने श्रमाचे क्षितिज केवढे विशाल बनते आणि श्रमाचे उद्दिष्टही स्पष्ट होते, श्रमिकाला आलेली अवकळा त्यातून जाते. अध्यात्म म्हणजे व्यक्ती व विश्व यांच्या व्यवस्थेचा अंतर्मुखी शोध आणि विज्ञान म्हणजे व्यक्ती व विश्व यांच्या व्यवस्थेचा बहिर्मुखी शोध, असे ते सहज सांगून जातात. अपंग बुद्धिजीवी आणि आंधळा श्रमजीवी हे कृत्रिम आणि विषम विभाजन तोडणे हीच खरी क्रांती. सर्वश्रेष्ठ प्रतिभा आणि कर्तृत्व यापासून शेतीचा पायाभूत व्यवसाय पारखा राहिला हे आपल्या अवनतीचे आणि दुर्दशेचे कारण आहे.

डॉ. लोहियांचा संविदवाद जोरात होता आणि निम्म्या देशातून काँग्रेस सत्ताच्युत झाली होती तेव्हाही बाबा आमटे यांनी ' डॉ. लोहिया आणि अजगर ' हे चिंतन लिहिले होते. भारतातील शेतीला युवकांचे बलदंड बाहू आणि कुशाग्र बुद्धीचा लाभ न झाला तर इंदिरा गांधी काश्मीरी पशमिन्याची झोळी घेऊन परदेशांकडे याचना करतात, त्याऐवजी गोणापाटाची पोती घेऊन इतर जातील, एवढाच फरक पडेल, असे त्यांनी त्यात सुचवले होते. अधिक विज्ञाननिष्ठ बुद्धी, अधिक जागृत हृदय आणि अधिक कार्यशील-कलामय हात असलेली तरुण पिढी निर्माण झाली पाहिजे. साम्यवादाचे आकर्षण कमी होऊ लागलेच आहे. अभाव-

ग्रस्तांच्या प्रक्षोभातून साम्यवाद आणि दास्य उदय पावते. विज्ञानाने ती अभावग्रस्तता निवारण केली तर जगातून दास्याला आपले तोंड काळे करण्याशिवाय गत्यंतरच राहाणार नाही. आपल्या श्रमिक-कार्यकर्ता विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र नव्हे तर आत्मविश्वासाचे पाथेय देऊन परत पाठवायची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. ' डिक्लाइन वुइथ थँक्स – तुमच्या सूचनेला आभारपूर्वक नकार ' असे नोकरी देणाराला म्हणता येईल असे शिक्षण हीच स्वातंत्र्याची हमी ठरू शकते.

बाबा आमटे यांच्या अर्ध शतकपूर्तीनिमित्त साधनेचा जो विशेषांक काढला होता त्यात विनोबांनी फार मार्मिकपणे शुभचिंतन केले होते. त्यांनी लिहिले होते, "अशी निष्काम, सेवापरायण माणसे भगवान अधिक का निर्माण करीत नाही, याची शो-कॉज नोटीस मी त्याला देत आहे. पाहू त्याचे काय उत्तर येते. पण तो उत्तर द्यायला बांधला गेलेला नाही हे उघडच आहे. त्याने आमची नोटीस विचारात घेतली तरी पुरे आहे. " एसेम जोशींची षष्ट्यब्दपूर्ती, बाबा आमटे यांची अर्धशतक पूर्ती, साधनेचा बाबा आमटे विशेषांक, ज्वाला आणि फुले आणि वर्कर्स युनिव्हर्सिटी ही प्रकाशने असा कार्यक्रम कोल्हापुरात साजरा झाला. भाऊसाहेब खांडेकर अध्यक्ष होते. या निमित्ताने बाबा आमटे यांची जरा मोठ्या प्रमाणात लोकांना ओळख झाली. परार्थ हा परमार्थ मानणारे, उद्याच्या पिढ्यांच्या बुद्धीला, हृदयाला, हातांना नवा जोम चढावा म्हणून तळमळणारे, चाकोरीला विटलेल्यांच्या जीवनाला नवा अंकुर फुटावा असा ध्यास लागलेले, उद्याला आत्मविश्वासाने तोंड देण्याचे त्राण नव्या पिढ्यात यावे यासाठी बेचैन झालेले हे व्यक्तिमत्त्व आहे असा प्रत्यय या निमित्ताने अनेकांना आला. मतांध, जड, सर्जनाला पारखा, निराश, उदास, सनातनी समाज बदलावा म्हणून धडपडणाऱ्या अनेकांना बाबा आमटे हा एक आशेचा किरण वाटू लागला.

सदुसष्ट साल हे सार्वत्रिक निवडणुकींचे वर्ष. राजकीय पक्षांची धांदल चालली होती. लोकशाहीतील ही चौथी निवडणूक ! जाहीरनामे काढून लोकांना आश्वासने देण्याची राजकीय पक्षांत जणू चुरस लागली होती. मतदाराला आपल्या निवडणुकीत तसे दुय्यमच स्थान आहे. पण स्वयंवरासाठी उभ्या राहाणाऱ्या राजकीय पक्षांना सुबुद्ध, विवेकी मतदाराने आपल्या अटी सांगितल्या पाहिजेत. आनंदवनाच्या अंगणात बोलताबोलता मतदाराचा जाहीरनामा तयार करण्याची गोष्ट निघाली

आणि बाबांच्या रूपाने हा मतदार उभा राहिला ! श्री. रमेश गुप्ता यांनी हा जाहीरनामा शब्दांकित केला. भारतीय राजकीय पक्षांची सहानुभूतिपूर्ण पण परखड चिकित्सा जाहीरनाम्यात केली आहे. दुसऱ्या पक्षाची चिकित्सा वाचून हरखलेल्यांनाही स्वतःची चिकित्सा असह्य वाटली. आपले आजचे राजकीय पक्ष म्हणजे ध्येयवादाचे प्रतीक्षालय बनले आहे. वाट पाहून डोळे शिणावे अशी स्थिती. शपथबद्ध होऊन रणांगण गाजवण्याची तयारी मात्र दिसत नव्हती. जबाबदारी नसली की शेरे ठोकणे सोपे असते. देशातले बुद्धिजीवी वैफल्याची वाकळ पांघरून पडलेले. परिस्थितीची आणि पक्षांची चिकित्सा करताना अनेक कल्पना-योजना जाहीरनाम्यात येऊन आपल्यावर आदळल्यासारख्या वाटतात.

ह्या जाहीरनाम्याला नावही अत्यंत समर्पक दिलेले आहे. ' माती जागवील त्याला मत ' देण्याचे आश्वासन या विवेकी मतदाराने दिलेले आहे. ज्याला देश गहाण टाकायचा नाही त्या सर्व पक्षीय व अपक्षीय नेतृत्वासाठी हा सर्व खटाटोप होता. मतांवर प्रेम करणारांनी मातीवरही धुंद प्रेम करायला शिकावे, ही तळमळ तेथे साकारली आहे.

देशातील परिस्थिती अनेकदा व्याकुळ करणारी असते, पण बाबा आमटे यांच्या विचारात निराशेचा सूर कोठेही नसतो. अपंगांचा पुरुषार्थ जागू शकतो या अनुभूतीतून त्यांचा आशावाद आणि आस्तिक्यबुद्धी उमललेली आहे. ते म्हणतात, " या पोकळीतही मला उदंड आशा वाटते. या भूमीत प्रचंड शक्तीचा झोपलेला सागर आहे. तिच्याजवळ तिच्या आदिम परंपरेचा सारा वारसा कायम असूनही नव्याचे स्वागत करायला ती उत्सुक आहे. प्रत्यक्ष संघर्षाभिमुख राजकारण आणि उत्पादनाभिमुख विधायक कार्य हे दोन्ही पंख उभारून गरुड उडाले पाहिजेत. त्या पंखांची ऊब उघड्यानागड्या देशाला मिळाली पाहिजे. या भरारीत मरण आले तरी ती ऊब कधी विसरणार नाही. प्रत्येकाचा जोर मने व मते बदलल्यावर असतो. हातांकडे कुणाचे फारसे लक्षच जात नाही ! मतपेटीशी प्रियाराधन करणारांनी मातीवर धुंद प्रेम करायला कधी शिकवलेच नाही. सामान्य माणसांची, बेकार तरुणांची, झोपलेल्या माळरानांची, वाळून चाललेल्या नदीनाल्यांची सुप्त शक्ती प्रत्यक्ष कृतीच्या गुदगुल्यांनी जागवायची आहे. मातीच्या कणाला निर्मितीचा फुंकर घालून तो सोन्याचा करण्याची किमया मानवी मन-

गटात आहे. क्षणाक्षणाला आणि कणाकणाला सर्जनाची फुंकर घालीत, माती जागवीत समृद्धीच्या वाटेने जातील तेच दिल्ली गाठू शकतील. मतांची भीक मागणारे नेतृत्वच देशाला भीक मागायला लावते. देशाचे जयगान गाजते ठेवण्यासाठी खूप गाडून घेणारी माणसे, खूप पिचणारे कणे, धपापणारे श्वासोच्छवास, अश्रू, आणि घाम आवश्यक आहे."

विज्ञानयुग हे संघटित प्रयत्नांचे युग असते. लाखो लोक क्षणा-कणांच्या परार्धांशाचे भान राखून एकतानतेने काम करतात तेव्हा पायवाटदेखील नसणाऱ्या मार्गाने माणूस चंद्रावर पदार्पण करू शकतो! संघटित क्रिया करायची तर संस्था उभारणे अपरिहार्य असते. ह्या सार्वजनिक संस्था कशा चालवाव्या हे एक कुशल असे कर्म आहे. राष्ट्र सेवादलाच्या रौप्यमहोत्सवी मेळाव्याच्या निमित्त 'नवे अवसर-नवी आव्हाने' या मालेत बाबांनी सार्वजनिक संस्थांच्या संचलनावर एक छोटीशी पुस्तिका लिहिली. त्यांत ते आरंभीच सांगतात, "पेटलेल्या मनाने आणि थंड डोक्याने तरुणाने समस्यांचे निरीक्षण करावे. भान राखून योजना आखाव्या आणि बेभान होऊन त्या अमलात आणाव्या. बीजे पेरुन वाट पाहाण्याइतका धीर धरावा. प्रत्येक पराभूत परिस्थितीत विजयाचा गर्भ कोठेतरी असतोच. पराभव पटकन विसरणे हे युवाशक्तीचे लक्षण असते. विकसनशीलता हा प्रत्येक सेंद्रिय वस्तूचा पहिला गुण असतो. प्रेम (लव्ह), विश्वास (फेथ), ओज (स्ट्रेंग्थ) ही साफल्याची त्रिसूत्री कधी विसरू नये. संस्था म्हणजे समाजाच्या कर्तृत्वशक्तीचे मधुकोश होत. एका मधुकोशात लाखो मधमाशा असतात, पण त्यांच्यात गटबाजी वा संघर्ष नसतो. संस्था कार्यरत आणि वर्धिष्णू असली की कार्यकर्त्यांच्या अंतर्गत विद्वेषाला वेळ आणि वाव नसतो. संस्थांचे संचालन म्हणजे व्यक्तिमत्त्व दडपून टाकणारी संस्कारांची, परिस्थितीची व मनोगंडांची कोंडी फोडण्याचा अखंड प्रयत्न. भाव आणि अभाव एकत्र आले की त्यांचे जुळते आणि अशा जुळणीतूनच संस्थात्मक कार्य उभे राहाते. प्रेमाला मतभेदांवर मात करता येते तेव्हा संस्था उभी राहाते. संचालकाच्या अहंकारावर त्याच्या निष्ठेने आणि मनुष्याच्या मूलभूत भलेपणावरील विश्वासाने मात केली पाहिजे. सतत नवे साहस समोर असले की संस्थेतला ऐतखाऊपणा, सुखासीनता आणि विघटनाच्या शक्ती बळावत नाहीत. भौतिक भुका इज्जतीने भागवून समाजकार्य करता आले पाहिजे." बाबांना तळमळ आहे, जेथून आपापल्या विचारांच्या पताका घेऊन पुढची यात्रा सर्वांना करता येईल अशी मूळ-

रेषा (बेस लाइन) तयार करण्याची. त्यासाठी प्रगती सहयोग (प्रोग्रे-सिव्ह अलायन्स फॉर कम्युनिटी ॲक्शन प्रोग्रॅम्स) उभारण्यासाठी त्यांचे मन असुसलेले आहे. परस्परांच्या विरुद्ध तत्त्वज्ञाने कवटाळणारी मंडळी जगात एकवटताना दिसतात. मग दैन्य, दारिद्र्य, आलस्य, नैराश्य यांना हद्दपार करण्यासाठी निर्माणाच्या आघाडीवर लोकांनी एकत्र का येऊ नये? विविध बीजांचा उन्नत संकर करून शेतीत समृद्धी आणता येते तर अशाच तऱ्हेचा विचारांचा उन्नत संकर फलदायी का होऊ नये?

यातूनच युवक प्रगती सहयोग आणि आंतर भारती श्रमसंस्कार छावण्या उभ्या राहिल्या. याच काळात आंधळ्यांसाठी प्रकाशाची शाळा आणि अपंगांसाठी संधिनिकेतन आनंदवनाच्या परिसरात उभे राहिले. रोग-मुक्तांचे मुक्तिसदन आकाराला आले. सोमनाथच्या जंगलातही श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ सहज चालू शकेल अशी सिद्धता झाली. तलावांची मालिका उभारून अन्नस्वतंत्रतेचे जंग सुरू झाले. श्रमनिकेतन युवकनगरीसिद्धतेची वाट पाहात आहे. आत्मतृप्तीत रममाण व्हावे अशा वेळी बाबांचे मन उसळून नव्या साहसांकडे झेप घेत असते. आता भमरागडचा माडिया मामा बाबांना बोलावत आहे. इंद्रावती, वैनगंगा, पामुलगौतमी, पर्लकोटा अशा सप्त नद्यांच्या परिसरात अद्याप भूक आणि उपासमार असलेली त्यांना देखवत नाही. शारीरिक आघाडीवर रोगाशी मुकाबला करीत, इंद्रावतीचे संकेत ध्यानी घेत तिकडे जाण्याची त्यांना ओढ लागली आहे. आणि तशीच ओढ त्यांना युवकांचीही लागली आहे. कधी त्यांना वाटते की युवकांचा तांडा घेऊन नवनिर्मि-तीचे एक प्रचंड अभियान देशात निर्माण व्हावे म्हणून आपण बाहेर पडावे, आणि त्यातच आपले व्याधित शरीर उत्सर्ग व्हावे.

एकात्म भारताचे नवनिर्माण हे युवाशक्तीपुढचे एक प्रचंड असे आव्हान आहे. आव्हानाचा मुकाबला करीत असतानाच माणसाच्या बौद्धिक, भावनिक व शारीरिक शक्ती बहरतात आणि बहरण्यातच जीवनाची सार्थकता असते. सहकाराशिवाय बहर नाही; हा तर सृष्टीचा एक अटळ नियमच आहे. जीवनात मूल्यांचा आविर्भाव होतो तोच मुळी इतरांच्या संदर्भात. याचाच अर्थ संस्कृतीचा उगम आणि विकास एकाकी माणसात होत नाही, सामुदायिक जीवनात होतो आणि याच दृष्टीने मानव हा सामाजिक प्राणी आहे असे म्हटले जाते. अशा या मानवी जीवनाच्या संघटनेच्या, एकात्मतेच्या चार पायऱ्या आहेत.

पहिली पायरी प्रबोधनाची. प्रबोधन म्हणजे म्हणजे वाचिक शिक्षण नव्हे, असे शिक्षण की ज्याचा उगम आणि अंत भाषाविलासातच होतो. शिक्षण म्हणजे जीवनाच्या संदर्भाचे अवधान आणि प्रबोधन म्हणजे अधिक उचित संदर्भ निर्माण करण्याची प्रेरणा. प्रबोधन हे रचनेवाचून कृतार्थ होत नाही. रचनेशिवाय प्रबोधनाची कसोटीच लागत नाही. जोपर्यंत नवरचना करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही तोपर्यंत चांगले बोलायला कोणाचेही काही जात नाही. तशी रचना करताना मात्र ज्यांचे हितसंबंध प्रस्थापितात गुंतलेले असतात ती मंडळी आपल्याजवळच्या सर्व साधनांनिशी विरोध करायला उभी ठाकतात आणि संघर्षासाठी तयार व्हावे लागते. संघर्षाशिवाय जेव्हा नवरचना सिद्ध होत नसेल तेव्हा संघर्ष करावा लागतो आणि त्या सर्वांचा परिपाक एकात्म समाजाच्या निर्मितीत होतो आहे की नाही हे दक्षतापूर्वक पाहावे लागते.

वरवर पाहता प्रबोधन, रचना, संघर्ष आणि एकात्मता ह्या गोष्टी वेगवेगळ्या आहेत असे भासत असले तरी चारी गोष्टी एकच आहेत. रचनेतही प्रबोधन होतच असते आणि संघर्षाने एका बाजूला काही गोष्टी नष्ट होतात असे वाटले तरी ते नष्ट होणे बीजाच्या नष्ट होण्यासारखेच असते, नवजन्मासाठी ते घडलेले असते आणि संघर्ष हा देखील अशा रीतीने रचनेला कारणीभूत होतो, रचनेत परिणत होतो. सर्वांचे फलित असते एकात्मता.

युवक अकादमी प्रबोधन, रचना, संघर्ष आणि एकात्मता या चतुर्विध कार्यक्रमांतून पुढे जाण्याची धडपड करीत राहणार आहे. या वाटचालीतूनच नवी संस्कृती उदयाला येण्यासाठी जी क्रांतिकारी बाण्याने धडपड करावयाची तिचे नाव सांस्कृतिक क्रांती. आत्मपरिवर्तनाने या क्रांतीचा प्रारंभ होईल आणि समाजपरिवर्तनाने ती कृतार्थता पावेल. आत्मपरिवर्तन हा विचारांतील सच्चेपणाचा इसार असतो आणि प्रबोधनाचे त्यामुळेच ते एक प्रभावी साधन बनते.

आत्मपरिवर्तनाने सुरू झालेली वाटचाल समाजपरिवर्तनाच्या दिशेने धावली पाहिजे. त्यासाठी संघटित, सुनियोजित प्रयत्न करावे लागतील. त्यातून समनुयोग साधला पाहिजे आणि सहभाग-सहभोग वाढला पाहिजे. कारण संघटना समनुयोग, सहभाग आणि सहभोग यातूनच उभी राहाते.

युवक अकादमी या नव्या सांस्कृतिक क्रांतीच्या प्रक्रियेचे भान करून देऊ इच्छिते, कारण अशी सांस्कृतिक क्रांती हीच उज्ज्वल उद्याची हमी आहे. बाबा आमटे यांचे येथे संग्रहित झालेले विचार या दिशेचे सूचन करणारे आहेत.

युवक हाच आता क्रांतीचा अग्रदूत समजला जातो, कारण तो प्रस्थापिताचा भाग नसतो, प्रस्थापितात त्याचे हितसंबंध गुंतलेले नसतात. प्रस्थापितात ज्याचे हितसंबंध गुंतलेले असतात तो त्याच्या बचावासाठीच फळी उभारीत असतो. म्हणून युवाकंप (यूथक्वेक्स) हीच क्रांतीची मोठी शक्ती आता बनली आहे. युवक अकादमी या युवाकंपाच्या निर्मितीसाठी, संगोपनासाठी आहे. युवक अकादमीचे कार्यक्रम याच दृष्टीने आखण्याची धडपड आहे.

ज्वाला आणि फुले, श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ, माती जागवील त्याला मत, सार्वजनिक संस्थांचे संचलन या चार पुस्तकांनंतर ‘ उज्ज्वल उद्यासाठी ’ हे बाबांचे पाचवे पुस्तक ‘ युवक अकादमी ’तर्फे आज प्रकाशित होत आहे. बाबाची शब्दकळा अलौकिक आहे. त्यात अथांग विचारवत्ता आहे आणि सजग अनुभूती आहे. त्यात दुर्दम्य आशावाद आहे. नवी क्षितिजे पाहाण्याची उत्कंठा आहे. यातले बव्हंश लेख श्री. गोपाळ शहा यांनी शब्दांकित केले आहेत. ‘ उज्ज्वल उद्या ’साठी निरंतर घडपण्याची प्रेरणा युवकांना मिळावी या तळमळीतून लेखनाचा उगम झाला आहे.

साने गुरुजी रुग्णालय आणि महाराष्ट्र आरोग्य मंडळ यांनी युवक अकादमी स्थापून बाबा आमटे यांच्या विचारांची अजमावणी सुरू केली आहे. श्री. जवाहर कोटेचा यांच्यासारखा ध्यास घेऊन धडपड करणारा कार्यकर्ता या पाठीमागे लागला आहे. डॉ. दादा गुजर यांच्यासारखा अबोल परंतु कर्तबगार नियोजक त्यांच्या पाठीशी उभा आहे. पुण्यातील युवक आपले शिवशिवणारे हात, भावनांनी ओथंबलेले हृदय आणि कुशाल बुद्धी घेऊन कृतार्थतेचा अनुभव घेण्यासाठी हडपसरच्या परिसरात कार्य करीत आहेत. या पायावर आता प्रकाशाची पावले टाकीत, ‘ उज्ज्वल उद्या ’ इतर युवकांना साद घालीत पुढे येत आहे.

यदुनाथ थत्ते

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| युवा कोण ? | १ |
| युवा शक्तीचे बुलंद महायान | ११ |
| क्रांतीच्या पाऊल-खुणा | १५ |
| पत्थरांना कोंभ फोडणारी मने | २२ |
| कोठे आहेत नवे भगीरथ ? | २८ |
| लोक-बिरादरी | ३५ |
| हृदयात कोंडलेले वादळ | ४२ |
| 'ऑपरेशन पॉसिबल' | ४५ |
| कार्यक्रमाने भरलेला पाणीदार आशावाद ! | ५२ |
| आसवांच्या स्फटिकात त्यांनी पाहिले इंद्रधनुष्य ! | ५८ |
| सजल स्नेहाची दिशाखूण | ६५ |
| वळणावरचे तीन दगड | ७० |
| गुरुत्वाकर्षणापलीकडे | ७४ |
| दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद | ७७ |
| पुनरुत्थानाची प्रक्रिया | ८१ |
| सृजनशील साहस | ८५ |
| जीवनाच्या सुगंधी मिठीसाठी | ९१ |
| उषःकालची वाटचाल | ९८ |
| एक आघाडी : समान्तर कार्यक्रम | १०४ |
| उज्ज्वल उद्यासाठी | ११५ |

# युवा कोण ?

दा. क्र. १८००६

यूथ इज ही हू कॅरीज यंग हेड ऑन यंग शोल्डर्स–युवा खांद्यावर जो आपली तरुणाई घेऊन, उफाळते तारुण्य घेऊन पुढे झेपावत राहतो तो तरुण. त्याच्या तरुणाईला काळाचे बंधन नसते. When he comes across misery, pain, insecurity and frustration the young rushes to test his ability against the difficult touch–stone of life. युवक तो असतो,–जो संकटांशी, अडीअड-चणींशी, समस्यांशी सतत झुंज घ्यायला सिद्ध असतो. युवक तो की, आपल्या खांद्यावर नवी क्षितिजे पेलण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी असते. ' हे कसे होईल ? ' या प्रश्नाला त्याने सुळावर चढवलेले असते ! वैफल्य त्याला ग्रासू शकत नसते. Youth is he who crucifies the question ' how ' in life. त्याच्या डोळ्यांतून साहस उसळत असते. Adventure is chronic in his eyes. The moment you come across the youth, you see habitual adventure beeming out of his eyes. त्याच्या डोळ्यांतून आसू टपकत नसतात, तर टपकत असते उसळते साहस. आणि जेव्हा आसू त्या डोळ्यांतून टपकतात, तेव्हा त्या आसवांत तो प्रेरणा, विश्वास, समाधान, आणि कृती यांची इंद्रधनुष्ये निरखत असतो !

त्याच्या साहसांना सीमा नसतात, पण युवा हाही एक माणूस असतो. परिस्थितीने कधी कधी त्याला मर्यादा पडतात. कधी त्याचे आवेग रोधले जातात. कधी विफलतेची रेखा त्याच्या विभोर

मनाला चिकटते. निराशेचे ढग पसरतात, आणि आसवांना मग भान राहात नाही. त्याच्या भावभावनांना खळाळत्या आसवांत विरघळावे लागते. मात्र या आसवांतसुद्धा इंद्रधनूंच्या छटा पाहण्याची त्याची ताकद असते. He grooms his tears and strengthens his heart. आसू झरतात, निखळतात, टपकतात, पण तरुणाईच्या आसवांचा माथा उन्नत असतो. ती आसवे असाहायपणे वा लाचारीने मुळीच टपकत नसतात. तोही एक माणूस असतो, म्हणून आस्वे असतात. पण त्यात शक्ती असते तुफान रिचवण्याची ! संकटाशी मुकाबला करण्याची. Youth is he, who rides the whirlwind and directs the storm ! तो तुफानावर स्वार होतो. अर्जुनाचे सारथ्य जसे कृष्णाने केले, किंवा या युगात अंतरिक्षाची कवचे भेदून आमंस्ट्राँगने केले– तसे सारथ्य घनांधकारात ढगांवर स्वार होऊन बिजलीचा चाबूक घेऊन तो करत असतो. जेथे पाऊलवाट नसते तेथे तो आपल्या साहसाने, उमंगभरल्या कृतीच्या पाऊलखुणांनी नवा हमरस्ता निर्माण करीत असतो. जीवनावरच्या अपार श्रद्धेने तो हे करतो. एकटयाने मार्गक्रमण करायची वेळ आली तरी त्याची हिंमत खचत नसते. तो तसाच पुढे सरसावत असतो. नीत्शे हा एक बंडखोर तत्त्वज्ञ होऊन गेला. पागलखान्यात जाऊन तो बाहेर आला आणि इतरां नाही विचारांनी पागल बनवत राहिला. तो म्हणत असे : If you know the why of life you will know the how of life. 'का ? – कारण काय ? 'चा अर्थ ज्याने जाणून घेतला, त्याने 'कसे ' – ची रीत, ती दिशासुद्धा जाणून घेतली असे मानावे लागेल. I do not mind the present young generation showing great disregard towards the old generation, perhaps it deserves it. I do not mind youth behaving rebeliously. But when occasion arises, only a few youths show similar disregard for danger ! Youth is he, who shows greatest disregard for danger. This habit can be acquired and made chronic by studying every moment, which challenges youthfulness, by catching it and having an

unbreakable grip on each challenging moment. Youth is he, who has such unbreakable grip on the challenging moments of his life.

आजची तरुण पिढी जुन्या पिढीचा, बुजुर्गांचा अनादर करताना दिसते. पण मी त्यांच्या त्या रोषाने नाराज होत नाही. जुन्या पिढीची कर्तुकीही कदाचित तशी असेल. तरुणाईला बंडखोरी करायची असेल तर त्यालाही माझी ना नाही. नाराजी नाही. उलट प्रयोजनासाठी बंडखोरी करा, असेच मी म्हणेन. पण संकटांशी सामना देताना क्वचितच कोणी युवा बंडखोरीचा आविष्कार करताना दिसतो. त्यांच्या ह्या विमनस्कतेने मी शरमिंदा होतो. संकटाला तुच्छ लेखूनच त्याचा मुकाबला करायचा असतो. जेव्हा आव्हान देणाऱ्या क्षणांची प्रतीक्षा करताना नेमका बिंदू टिपण्याच्या तयारीत तो असतो, त्या क्षणांवर काबू मिळवतो, स्वार होतो, झेपावतो : तेव्हाच ह्या वृत्तीची निपज होत असते. झगमगत्या ज्योतीवर पतंगाने झेप घ्यावी तसे तो आव्हानाचे क्षण टिपत असतो. त्याच्याने राहवत नाही, तो जळून जातो, पण स्वत:ला मागे खेचत नसतो, रोधत नसतो, थांबत नसतो.

आमच्या आनंदवनातील वस्ती पाहा : आपल्याच देशातील हे रोगी, लंगडे, लुळे, आंधळे आहेत. ज्या मातीतून तरुणाई जन्मली त्याच मातीतून यांचेही तन बनले आहे. मग पराक्रम कसा ? पुरुषार्थ कसा ? त्यांची मने चिरतरुण आहेत ! आव्हानांवर, संकटांवर ते पतंगासारखे तुटून पडतात. आपल्या बलदंड बाहूंवर एक नवे क्षितिज पेलण्याची त्यांची हिंमत पाहात राहावी! If an outcast man on outcast land can lead a new life, can produce not only sufficient to feed himself, but to help the healthy society by capital formation, can rejuvenate, why these healthy bodies, these healthy hands of youth cannot do it? This is my heartache ! वैराण माळरानावर जर समाजाने परित्यक्त केलेला, तुच्छ लेखलेला माणूस, हातापायांचे खंड-

हर झालेला माणूस नवे जीवन उभारू शकतो,–पोट तर तो भरत असतोच आत्मनिर्भर वृत्तीने, आणि समाजाला परतफेड कण्याची, त्याचे ऋण चुकवण्याची तयारी बाळगतो, जीवनात नवा जोश, उमंग तो आणत असतो,–तर हे तरुण, धट्टेकट्टे हात असे का करू शकत नाहीत ? त्यांना निर्मितींची, उन्मेषाची स्वप्ने साद का घालत नाहींत ? का म्हणून ह्या तरुणाईला काही करता येत नाही ? हे माझ्या अंतरींचे खरे दुःख आहे.

लहानपणी आम्ही शिकत होतो : Sound mind in sound body. सशक्त शरीरास सशक्त मन वास करते; पण मला नवी अनुभूती आली. I came across a most sound mind in a most unsound, decomposed body of a leprosy patient. रोगी शरीरात मी अतीव निरोगी मनाचा अविष्कार पाहिला. मग निरोगी शरीरात खूप रोगट मन का पहावयास मिळावे ? Sound mind in a unsound body and unsound mind in sound body... असे का ? मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधत असतो तेव्हा मला जाणवते : युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही ! या ढगांना आपल्यात लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण-मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्णसुद्धा याच वयाचा होता, याहूनही लहान होता ! Youth is he, whose attention is welded to his purpose. ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे, तो युवा !

दररोज मी स्वतःला शोधत असतो. कधीमधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही, पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात माझ्या मनाला अंकुर फुटतात. I am upset, I am very much disappointed when I see within me a wrong version of myself. मी स्वतःविरुद्ध माझ्यापाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो : जो इतरांविरुद्ध नव्हे तर स्वतःविरुद्धच स्वतःजवळच

तक्रारी मांडीत असतो. मी ते दुःख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती, मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती, मग काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही ? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो या लाचारीने शर्रमिंदा होतो, तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकांतात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात आगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे. Why should he enjoy and indulge in the black dome of the night. There is always a ray of hope. The darkest hour is just before the dawn. अंधाऱ्या रात्री तो झुरत का बसतो ? आशेचे किरण सतत कुठे ना कुठे त्याची प्रतीक्षा करीत असतातच. त्या अंधारीपलीकडेच प्रकाशाची पावले आपली वाट पाहात असतात. उषःकालापूर्वी घनदाट अंधकार जरूर असतो. पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल तो अंधार देत असतो. हा विश्वास युवाला का वाटत नाही ? Youth is he, who lightens the darkest corner in the worl as also the darkest corner in his own heart. युवा तो : जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो, त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो. परिस्थितीचे लगाम खेचून जो तिला आपल्या काबूत आणतो तो युवा. साहसालाही एक अट असते : लक्ष्मणरेषा आखण्याची. तरुणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. They had not channelised their youthful energy. आपल्या युवाशक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोटचा छोटचा प्रकल्पात, कार्यक्रमात, इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो. पण चहाच्या किटलीतल्या वाफेने जनतेचे रथ चालत नसतात ! क्रांतीचेही एक तंत्र असते. तुम्ही कम्युनिस्ट असा, गांधीवादी असा, किंवा भांडवलवादी असा–पुढे जाण्याचे, प्रगतीचे प्रत्येकाचे तंत्र

असते. काल तुम्ही येथे तुफान पाहिले. वावटळ पाहिली. काही क्षणांसाठी ती वावटळ येऊन जाते. पूर्वेकडला पाऊस घेऊन येते. मोठे सुंदर दृश्य दिसते. थोडासा पाऊस येतो. सृष्टी भिजून जाते. काही वेळ आपणही ओलेचिंब होतो. तसेच मिनी-क्रांतीच्या पूर्वे-कडल्या वर्षावात Vernal showers काही क्षण भिजण्याची इच्छा तरुणाईला होते, पण या पूर्वेच्या वर्षावाने, वावटळीतल्या पावसाने शेती पिकत नाही ! 'वंदे मातरम्' जिला म्हणतात, त्या सस्य-श्यामला भूमीवर जी प्रेम करत नसते, तिच्या कुशीत खेळत नसते, ती शक्ती युवाशक्ती कधीच नसते.

मी नेहमीच म्हणत असतो की, विधायक कार्यावाचून राजकारण नपुंसक असते; आणि राजकारणावाचून विधायक कार्य वांझोटे असते. Politics without constructive work is sterile and constructive work without politics is impotent. केवळ विधायक शक्तीने देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात, कोणत्याही काळात क्रांतीचे रणशिंग फुंकता येणार नाही. आणि विधायक कार्याची सोबत नसलेली केवळ राजकीय शक्ती आपल्या क्रांतीची मुळे जनतेच्या मनोभूमीत रुजवू शकत नसते. कित्येक वर्षांपासून राज-कारण-धुरंधरांचे शासन हातात घेण्याचे प्रयत्न चालू आहेत—आणि ज्यांच्या हाती ही सत्तेची सूत्रे आहेत ते शासनाचा गाडा चालव-ण्याचे आटोकाट प्रयत्न करत आहेत. पण तरीही पंचवीस वर्षां-नंतर अर्थशास्त्रज्ञांचा दावा आहे पुराव्यासहित की, या देशातले गरीब अधिक गरीब होत आहेत आणि अमीर अधिकच अमीर बनले आहेत ! ! देशातले काही निवडक बुद्धिमान लोक दिल्लीला गेले, पण तरीही ज्या परिवर्तनाची अपेक्षा होती ते का घडून आले नाही ? —ही विचार करण्याची गोष्ट आहे. येथली राज-नीती घोषणाबाजीवर चालते आहे. स्लोगन स्टफ्ड पॉलिटिक्स आहे. म्युझियममध्ये वाघाचे कातडे पेंढा भरून ठेवतात. काहीसे तसेच राजकारणाचे झाले आहे. कोणी म्हणतात, आराम हराम है ! पण दिसते ते असे की, आराम—सुस्तीच अधिक वाढीला

लागली आहे ! कोणी म्हणतात, जय जवान–जय किसान, पण तरुण हात तसेच असोसून राहतात; कारण शस्त्र–अवजारे यांच्या बाबतींतही आत्मनिर्भरता नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत तर सांगायलाच नको. हरित क्रांतीचे आगमन झाल्यावरही बहुसंख्य शेतकरी दिवसाला पन्नास पैसेही हमखास कमवू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे ! आता गरीबी हटावचा नारा लागला आहे. पण ही गरीबी हटवणार तरी कशी ? या घोषणाबाजीने तरुणाई उबगते. तिला प्रत्यक्ष कृती हवी आहे. पण राजकीय पक्षांच्या दृष्टिकोणातून तरुणाई म्हणजे अल्सेशियन कुत्रे ! पाळले तर अन्य कुणावर छूः करून सोडता येतात !

Why youths should allow themselves to be used like that ? Why should they dog at others on behalf of political parties, who have hardly any real programme, either constructive or combative ? आपला अशा प्रकारे उपयोग–वापर तरुणांनी कुणालाही करू देता कामा नये. दुसऱ्यांसाठी भुंकण्याचे काम त्यांनी का म्हणून करावे ? या राजकीय पक्षांजवळ क्वचितच काही रचनात्मक किंवा संघर्षाचा खरा कार्यक्रम असतो. मार्क्स, गांधी, माओ यांची रीत मात्र वेगळीच असते. गांधीजींनी मूल येथे चरखासंध उघडला होता. पंधरावीस रुपये वेतनावर कार्यकर्ते काम करत. स्वराज्याचे राजकारणही चालायचे. पण लोकांशी संपर्क आणि समनुयोग साधण्यासाठी चरखा होता. Mass contact through constructive work–रचनात्मक कार्यातून लोकसंपर्क आणि लोकसंघटन करण्याची त्यांची मनीषा होती. तो बनिया कोणी पागल नव्हता ! ‘ जर देश माझ्याबरोबर चालेल, इंग्रज सरकारशी असहकार पुकारील तर एका वर्षात स्वराज्य येऊ शकते ’–असे गांधीजींनी म्हटले होते. लाखो लोक निर्भय होऊन म्हणू लागले, ‘ चरखा चला चला के लेंगे स्वराज्य लेंगे । ’ मिठाचा कायदा लाखो लोकांनी हिमतीने तोडला. सामान्य जनतेतील असामान्य शक्ती त्यांनी जागी केली. नवी प्राणमयता पालवली. जनतेत

त्यांची पाळेमुळे खोलवर रुजली होती, आपले राजकारण त्यांनी अगदी तळथरापर्यंत grassroot नेले, रचनात्मक कार्याची जोड देऊन– तेव्हा कुठे ते इंग्रजांशी संघर्ष करू शकले. पण आजची युवा पिढी आहे केवळ स्पेक्टेटर जनरेशन–प्रेक्षक पिढी, देखू पिढी ! ती केवळ पाहते आहे– कोठे कशी क्रांती घडून येते. He wants politics without commitment–जेथे बांधून घ्यावे लागेल, कार्यमग्न व्हावे लागेल असे राजकारण त्यांना नको ! कार्यक्रम असा असावा की, ज्यात बांधिलकी (कमिटमेंट) सुद्धा असावी आणि सहभागही (इन्व्हॉलमेंट) असावा. जेव्हा कोणी युवक माझ्याकडे स्वाक्षरी मागायला येतो तेव्हा मी हैराण होतो. Youth puts his signature on events and time. युवक तो आहे : जो इतरांपासून संदेश वा स्वाक्षरी मागत नसतो, तो घटनांवर आणि क्षणांवर आपली स्वाक्षरी उमटवतो !

आता काय आहे, काय नाही याचे चऱ्हाट आणि रडगाणे बंद झाले पाहिजे. ती पिढी अशी आहे, हा धर्म असा आहे : सोडून द्या या गोष्टी. धर्माने दुनियेचे भले होईल यावर भरोसा ठेवायची तुमच्यावर कोणी सक्ती तर नाही ना केली ? आपसात वैर करावे असे धर्म सांगत नाही. पण त्याच्याच नावावर झगडे होत आहेत. कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट, हिंदू आणि मुसलमान, शिया आणि सुन्नी, ब्राह्मण आणि अब्राह्मण, स्पृश्य आणि अस्पृश्य A religion which refuses to establish fellowship between man and man is bound to fail in establishing fellowship between man and the God. जो धर्म माणसामाणसांत भाईचारा निर्माण करायला असमर्थ आहे तो माणूस आणि देव यांच्यांत नाते कसे सांधणार ? मी साशंक आहे. तुमचा धर्म कोणता आहे ?–युवाधर्म. जो दुसऱ्यांसाठी जगण्याचे शिकवतो, तो माझा धर्म आहे. To live for others. It is good to get, but better to give and giving is growing and there is no growth without prunning. घेणे चांगले, पण देणे त्याहून श्रेयस्कर. आणि देण्याचा अर्थ आहे–

विकास करणे. छाटणी केल्यावाचून विकास होत नसतो. द्राक्षवेलींची छाटणी होते, मगच त्यांची वाढ होते; द्राक्षांचे घोस बहरतात. दोस्तहो, religious dogma धार्मिक मतांधता आम्हांला कुठेच नेऊ शकणार नाही. चालण्याची शक्ती आमच्याच पायांत आली पाहिजे. आपला विश्वास स्वतःवरच असला पाहिजे. आज विश्वास ठेवला जातो—ग्रंथांवर, धर्मांवर, ज्याला कधी कोणी पाहिले नाही अशा देवावर. इंग्रजीत म्हण आहे : As secured as the baby in the womb—गर्भाशयात मूल जसे सुरक्षित असते तसे. पण नऊ महिन्यां-नंतर ते मूल बाहेर यायची कोशीस करते. त्याचे पालनपोषण करणाऱ्या आईला किती वेदना, किती चिंता वाहाव्या लागतात. New life is never born without labour-pain. प्रसूतिवेदना सहन केल्यावाचून नूतन जीवन कसे जन्मणार ?

साने गुरुजींनी ‘आंतर भारती’ शब्द आपल्या हृदयीच्या सर्व सद्भावना एकवटून दिला. तो शब्द, ती भावना एकतेचा राजमार्ग आहे. Sane Guruji drained the udder of his heart by the word Antar Bharati, Friends, it is the blue print of unity. मी ब्राह्मण, मी देशमुख, मी मराठा, मी शीख, मी पंजाबी, मी तमिळ, मी बंगाली, मी तेलगू—हा विचार मग मनात का येतो ? का यावा ? हा प्रश्न विचारता विचारताच साने गुरुजी प्राणांची कुरवंडी करून गेले. Defeated prophet पराभूत प्रेषित बनून गांधीजी एकटे नौखालीत गेले. विनोबाजी सूक्ष्मात प्रवेशिले. महा-त्म्यांना कळते की, हे दुःखाचे धर्मचक्र भोवऱ्यासारखे घुमत असते. जितकी जास्त गती तेवढे ते स्थिर भासते. म्हणून महात्म्यांचे, प्रेषितांचे चित्त भंग पावत नसते. With a view to stay at one place in the era of science man has to move with the greatest speed. विज्ञानयुगात एका जागी ठाकण्यासाठीसुद्धा मोठ्या वेगाने पुढे जावे लागते !

रचनात्मक संघर्षासाठी तरुणाईने अविलंब तयारी करायला हवी.

जेव्हा वृक्षाची मुळे जमिनीत चांगली खोलवर रुजतात, पसरतात, तेव्हा त्याच्या फांद्या धरतीवर विस्तारतात. रचनात्मक कार्याचा अर्थ असा भूमीत रुजून, मुळे खोलवर पसरवून, जीवनरस प्राप्त करणे. मदर रूट– सुर्माची ताकद जेवढी, त्याची भूमीत विस्तारण्याची शक्ती जेवढी, त्या प्रमाणात वृक्ष मोठा होतो, बहरतो, पसरतो. कितीएक घोटीव दगडांच्या चिऱ्यांतून, त्या पत्थरांचे स्नायू चिरीत तो अंकुर आत पसरतो. ही मुळे केसाहूनही नाजूक, तंतूसमान, मुलायम असतात. पण किती दुरून, किती गहराईतून ती जीवनरस शोषून आणतात; वृक्षाला पुरवतात. वृक्षांच्या मुळांतली ही ताकद आपण समजून घेतली पाहिजे. ही ताकद ज्या वेळीं तुम्ही जाणून घ्याल त्या वेळी श्रेयाला, साहसाला आलिंगन देता येईल. रचनात्मक क्रांती ज्यांना करायची आहे त्यांनी हा बीजमंत्र जाणून घेतला पाहिजे.

# युवाशक्तीचे बुलंद महायान

आपल्या गर्भकुडीतला गंध उमजला नाही म्हणून कस्तुरीमृग सैराट धावत असतो. आजच्या युवकाला समजत नाही की, आत्मविश्वासाचा अंकुर आपल्याच मनगटात रुजलेला असतो. वास्तवाची धार बोथट करीत, उपदेशाचा वर्षाव होत असतानाही तो अडचणीतून आत्मविश्वासाचे वल्हे घेऊन सरसावतो. जखमांची आरास शरीरावर मिरवताना त्याला दु:ख होत नसते. त्याचा प्रत्येक अनुभव जीवन समृद्ध करणारा असतो. युवा हे अनंत अनंत शक्यतांचे एक बीज असते. जीवन त्याच्या दृष्टीने एक अखंड खेळ असतो. निरंतर चालणारी ती एक धुन असते. विहार असतो. परिस्थितीवर मात करीत तो अथक जात असतो. न रुळलेल्या वाटा चोखाळत असतो.

वास्तवाची बिकट दर्शने त्याचा निर्धार विचलित करू शकत नाहीत. त्याचा आत्मविश्वास उफाळता असतो, पण तो वाफ होऊन विरून जाण्याचे नाकारत असतो. परिस्थितीशी विद्रोह करताना दंतुर क्षणी तो ओसंडून, उधाणून येतो. झुंज देऊनही तो श्रमाला हल्लक आणतो. मूर्च्छित धैर्याला तो नवे सुवास हुंगवतो. त्याचे विहरणे कवितेचे चरण रेखाटत असते. कळकळीच्या प्रवृत्तींचा कल्लोळ त्यांच्यात गुंजारत असतो. मन्वन्तराचे फेरे तरुण मनावर प्राचीनतेची पुटे चढवू शकत नसतात.

त्याच्या विजयाला उद्दाम, अप्रामणिक गार्गिते नसतात. तो जेव्हा एखादी प्रवृत्ती अंगिकारतो तेव्हा पुढारी किंवा नेता नसतो, तर शिकाऱ्यांच्या जथ्यातला आघाडीवरचा एक शिकारी तो असतो. सावजामागे रानोमाळ हिंडणाऱ्या शिकाऱ्यासारखा तो तुडवत निघतो दशदशांनी घोंगावणारी संकटे. आपल्या प्रवृत्तीच्या प्रेरणेशी इमान राखून तो सतेज-उत्साही असतो. तीक्ष्ण असतो. आणि या अंत:प्रेरणेचे बिंब त्याच्या कृतीत उमटलेले असते. दुसऱ्याच्या आदेशाने त्याच्या पेशी लहरत नसतात. तो दिमाखाने म्हणतो : माझेच उच्च आदर्श माझ्या पराकाष्ठेच्या प्रयत्नांशी समतुल्य असतात. आय ॲम इक्वल टू मायसेल्फ ॲट माय व्हेरी बेस्ट. त्याच्या पदन्यासाने माळरानाला अंकुर फुटतात. कातळांच्या गाभ्यात मऊसुती येते. दुसऱ्याच्या छायांकित जीवनात तो हास्याचा खदखदाट निर्माण करतो.

निरागस धिटाई ही त्याच्या स्वभावाची एक लकाकती किनार असते. काही तरी करा, काही तरी बना, कशावर तरी विश्वास ठेवा, असे तो सांगत असतो सर्वांना. युवा स्वतःच साहसाची पताका घेऊन ललकारत निघतो. असीम समुद्र आणि अनंत आकाश यांच्या शुभमंगलावर अक्षता टाकायच्या लगीनघाईने तो निघालेला असतो. त्या लगबगीत गर्भित असते सामान्यांसाठी काही श्रेयस शोधण्याची अलंकारपूर्ण सदिच्छा. जीवनाचे महाद्वार ठोठावताना त्याच्या नजरेसमोर समूहाकांक्षेचे लोलक तरळत असतात.

अशा मुशाफरीच्या चित्कारांतून त्याचे सिद्धान्त आकार घेत असतात. निश्चिततेच्या, निर्णय घेण्याच्या, गहनता अधिक सखल, सरळ करण्याच्या त्याच्या सुभग शक्ती विस्तारत जातात. त्या युवाच्या नसा-स्नायूंतून शक्ती झणत्कारत असते. ती चित्र- सुरात अवतरते तेव्हा तो चितारत असतो ते त्याचेच पोर्ट्रेट असते. विद्ध, विव्हळ गान त्याच्या सुरांत झंकारत नसते. शक्तीला सर्वस्पर्शी स्नेहवेदन लाभलेले असते. ते अनिरुद्ध सहयोगाचे सूर आळवते.

युवाच्या प्रत्येकच पैलूत त्याचे असे चित्र उमटते, पण ते अकृत्रिम सचोटीचे असते.

अपयशाची त्याला तमा नसते. अवकाशातल्या सावल्या त्याला भेडसावत नसतात. गारगोटीतला स्फुल्लिग जसा कुठल्याही क्षणी प्रकट व्हायला उत्सुक असतो, तसा तो सजोश असतो. उत्कंठापूर्ण असतो. अपयशाने फेसाळलेला चेहरा हाही त्याच्या दृष्टीने एक मोलाचा अनुभव असतो.

आपल्या आशावादाच्या अधीर पूर्तीचा ललकार करण्यास तो आतुर झालेला असतो. साहसाच्या पंखांत काळजीची पिले गोंजारणे त्याला पसंत नसते. अश्रूतून हास्य निर्माण करण्याच्या शक्तीवर त्याचा मर्यादातीत विश्वास असतो. क्षणाक्षणाचे कवच भेदून तो जखमसमृद्ध वर्तमानातून भविष्याच्या स्फटिकांना आकार देत असतो.

तारुण्य चुका करण्यात कुचराई करीत नाही, हे खरे आहे. पण एकेका चुकीतून सिद्धतेकडे नेणारी दिशा त्याला खुणावत असते. दुसऱ्यासाठी जगण्याची लालसा शक्यताशक्यतेचे सारे नितळ, शेवाळलेले किनारे धुंडाळत असते. भूतकाळातल्या तक्रारींचा रियाज करीत तो रेंगाळत नसतो. कर्तृत्वाच्या प्रकाशाची धूळ उडवत तो जात असतो– साऱ्या सीमा पार करत. त्याला पेलण्यास परमवीरचक्रेही असमर्थ असतात.

कार्याला गती देण्याची ऊर्मी त्याच्या पेशीजालात तरारून जात असते. कृत्रिमतेचे टरफल फोडून ती आभास आकारत नसते. त्या ऊर्मीला मतामतांचे मार्गदर्शन नसते. ती वासनाचक्रांनी अभिशप्त नसते. आणि गतीची बिंबें टिपण्यासाठी त्याला पारा लावलेल्या काचेच्या चौकटीची आवश्यकता नसते. आत्मसमाधानाच्या कोवळ्या उन्हात तो चालत असतो.

झाडावरच्या फलसंभाराला जमिनीत खोलवर ठाण मांडून बसलेल्या मुळांचे सजल आश्वासन असते, कृत्रिम बहाराने ते फुलारत नसते. युवासाठी रेडीमेड तयार साजऱ्या ऐषऐटीचा आकृतिबंध कधीच उपयुक्त ठरत नसतो. स्वत:च्या अनुभवांनी जीवनात उपलब्ध कंगोरे, किनारे, आणि शिखरे तो पारखून घेत असतो. दंतकथांपेक्षा स्वत:चे उघडे कोरे ताजे अनुभव त्याला प्रिय असतात. प्रवचनांच्या हिमनद्या वितळल्या तरी साहसाची शिखरे बुलंदच असतात.

स्नेहाचा मध मोहोळात बंदिस्त करता येत नसतो. उत्तुंग डोंगरकपारींचा सहारा घेऊनही आग्या मोहोळाला पाझर फुटतात. स्नेहाला पर्याय शोधता येत नसतो. तो केवळ जाणता येतो. स्नेहाच्या स्पंदनांना अंतराळाचा विस्तार, दिशांचे गहनत्व रोधू शकत नसते. ही बिलीव्हज, दॅट लव्ह कॅनॉट बी इन्स्टिटच्यूटेड बट कॅन बी फेल्ट, नॉर कुड इट बी सबस्टिटच्यूटेड. युवाचे समर्पण नेहमीच नव्या तंत्राचे पाठ आत्मसात करीत असते, समर्पित होऊनही तो संपलेला नसतो ! शिकण्याची ती सुरुवात असते. शब्दांना अर्थाचा नवा आकार, आशय देत तो आपल्या एकांताचे, अश्रूंचे आणि असहायतेचे थडगे उभारीत असतो. जिवंत असण्यात, दुसऱ्यासाठी जगण्यात केवढा आनंद असतो याचा श्रीकार तो गिरवतो तेव्हा तो एका महाकाव्यासाठी आशय निर्माण करीत असतो. 'मुक्तिवाहिनी' सारखे एखादे बलदंड महायान नेहमीच वर्तमानाला धडका देत असते. युवाशक्तीचे 'टर्मिनस स्टेशन' इतिहासाने अजून पाहिलेले नाही !

# क्रांतीच्या पाऊलखुणा

जेव्हा क्रांतीला कार्यक्रम नसतो, तेव्हा ती कोसळून पडत असते. युनिव्हर्सिटीमधले विद्यार्थी आणि कारखान्यांतले मजूर रस्त्यावर येऊन बॅरीकेड्स उभारतात आणि काही काळ समाजाचा श्वासोच्छ्वास् रोखल्यासारखा होतो; मूलभूत लोकशाहीच्या प्रयोगाचा धिक्कार करीत रक्तपाताने सत्ता हस्तगत करू पाहणारी डाव्या-उजव्यांची संकल्पित क्रांती हुकूमशहाच्या हातांत सत्तासूत्र आल्याबरोबर गर्भगळीत होते आणि परत सर्वसामान्य व्यवहार मुकाटचाने सुरू होतात.

जेव्हा क्रांतीला कार्यक्रम नसतो तेव्हा खरोखर अखेरचा सामान्य माणूसच सुळावर चढवला जात असतो. गोळीबारात मरतो तोच. घर त्याचेच जाळले जाते. देशोधडीला लागतात ती त्याचीच मुलेबाळे. नेते खुशाल असतात, त्यांच्या इस्टेटी व बँक अकाउंट्स परदेशांत सुखरूप असतात, अथवा प्रतिबंधक स्थानबद्धता पोलिसांच्या गोळीबारापासून त्यांचे आगाऊ संरक्षण करीत असते ! लढताना सेनापती जसा मागे तसे हे क्रांतीचे सूत्रधार मागेच असतात.

रेड्यांच्या व हत्तींच्या लढतीत चुराडा होतो तो गरीब बिचाऱ्या जंगलातल्या हिरवळीचा !

दुसरे असे की, खऱ्या क्रांतीची कधी उजळणी होत नाही, ती गिरवली

जाऊ शकत नाही. एकदा झालेली क्रांती फार तर घोकंपट्टी करून आठवणीत ठेवली जाऊ शकते, पण खरी क्रांती नित्य नूतनच असते. नवा जीवनहेतू व नवे रूप घेऊन ती येते. आणि जन्म जेवढा कठीण होता तेवढाच हा नवा जन्मही खडतर असतो. बाळ–बाळंतीण दोन्ही दगावण्याची शक्यता असते. अशा वेळी हे अडलेले मूल शल्यक्रियेने काढण्याची आवश्यकता असते. शल्यक्रियेतली कापाकापी ही नव्या जीवनाला वाट मोकळी करून देणारी कापाकापी असते, तिला एक हेतू असतो–आणि एक कार्यक्रम असतो. क्रांती ही खऱ्या अर्थी अशीच एक शल्यक्रिया आहे आणि या क्रियेत राष्ट्राची नेतृत्वशक्ती ही सर्जनची भूमिका पार पाडीत असते. सर्जनची भूमिका ही खरोखर सर्जनाची, नवनिर्मितीचीच भूमिका असते. त्याच्या हातातील हत्यारे पाहून घाबरण्याचे कारण नसते. आपल्या भूमिकेबद्दल तो कितपत जागरूक व सावध आहे, ती भूमिका पार पाडण्याचे साहस व कार्यक्षमता त्याच्याजवळ आहे की नाही, एवढे पाहायचे असते. आणि त्याने आधीच ह्या पुण्याईचा इसार देऊन ठेवलेला असायला हवा असतो. त्याच्या खाती छोटी छोटी अशी असंख्य ऑपरेशन्स यशस्वीपणे पार पडलेली असायला हवी असतात. त्याचे हात, हृदय आणि मेंदू अनेक मायनर ऑपरेशन्स करून या मेजर ऑपरेशनसाठी तयार झालेले असायला हवे असतात. अशा सर्जनच्या हातांत शस्त्रक्रिया आणि अशा नेतृत्वाच्या हातांत क्रांती सुरक्षित असते; पण हेच हात अपरिपक्व असले म्हणजे रक्तमय अथवा रक्तहीन क्रांतीच्या कपाळी कपाळमोक्षच येतो–जसा तो फ्रान्समध्ये, पाकिस्तानात व भारतात आला !

आपापल्या जुन्या पोथ्यांतल्या पठडीप्रमाणे क्रांतीचा अर्थ लावणारे पुष्कळ आहेत. क्रांतीच्या दूरस्थ दृश्यांची रंगीबेरंगी छायाचित्रे टिपून मांडणारे कारागीर पुष्कळ आहेत. पोथी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांत फरक काय ? ऑईल पेंटिंग आणि रंगीत छायाचित्र यातले अंतर काय ? कलेला कारागिरीपेक्षा श्रेष्ठ ठरविणारे तिचे वेगळेपण कोणते ?

कलाकृती ही वस्तूची केवळ यथातथ्य अभिव्यक्ती नसते, ती वस्तू-मागची कल्पना व्यक्त करीत असते. तिच्या मागचे जीवनाचे स्पंदन ती आपल्यापर्यंत पोचवते. ती कधीही, कशाचीही नक्कल किंवा केवळ प्रतिबिंब, प्रतिकृती असू शकत नाही. नव्या जगाच्या जन्मा-पूर्वी सर्वदूर उचंबळत असलेल्या या जीवनक्रांतीचे पठडीतले भाष्य-कार पुष्कळ आहेत. निरर्थक म्हणून तिच्याकडे तुच्छतेने पाहणारेही पुष्कळ आहेत. पण तिला आपल्या प्रत्यक्ष आत्मप्रत्ययांचा अर्थ देणारे, या क्रांतीमागच्या महाकल्पनेचे तैलचित्र रंगवून दाखवणारे कलाकार कोठे आहेत ?

पण क्रांतीबरोबर तिचे नेतेही जन्माला येत असतात, हे एक ऐति-हासिक सत्य आहे. आधी अंडे की आधी कोंबडी अशातलाच हा प्रकार वाटतो, पण वादात न पडता या क्रांतिकारी नेतृत्वाच्या पाऊलखुणा कुठे दिसतात, हे पाहणे आवश्यक आहे.

क्रांतीचे द्रष्टे हे जुन्या पिढीतले असू शकतात, पण क्रांतीला नेतृत्व नव्या पिढीचेच लागते. क्रांती हा अखेर जुने आणि नवे यांचा एक उत्कट लढाच असतो. भविष्याने भूतकालाशी दिलेली ती निकराची झुंज असते. जुन्या पिढीबरोबर तिचे सर्व रस्तेही म्हातारे झालेले असतात. तिने एके काळी प्राणपणाने जोपासलेली मूल्ये सुरकुतून गेलेली असतात आणि राखीव अरण्यातले सिंह जसे पाच फुटांवरूनही पाहता येतात तसा या पिढीचा दबदबा निघून गेलेला असतो. आणि एखाद्या विदूषकाच्या तोंडून पर्वतीय–प्रवचन ऐकत असल्यासारखी नवी पिढी तिच्या शब्दागणिक उपहासाने हसत असते. आता या शब्दांच्या नजरबंदीने तिला चकवता येत नाही. क्रांतीचा बाळकृष्ण या पूतना मावशीला फसत नाही. नेतृत्वाच्या या जुनाट मावशीला निवडणुकीच्या दिवसांतच अथवा मतलब असेल तेव्हाच पान्हा फुटतो ! कोठेतरी आत तिने खूणगाठ बांधून ठेवलेली असते की, या बाळकृष्णाला अज्ञानात, दारिद्र्यातच ठेवायला हवे. भेदाभेदांचे विषारी स्तन्यच त्याला पाजायला हवे.

तरच मते मिळतील, तरच आपला मतलब सुरक्षित राहील. काही पूतना धुपून गेलेल्या जमिनीसारख्या वांझ असतात. क्रांतीची गर्भ-धारणा त्यांना होऊ शकत नाही. त्यांना स्वतःचा असा पान्हा नसतो. मग ग्लॅक्सोचे बेबी–फूड घेऊन त्या बाळकृष्णाला भरवू पाहतात. या बाळाला रंजविण्याचे, सुख लावण्याचे नाना उद्योग त्या करतात. कधी त्या शताब्द्या साजऱ्या करतात आणि पेंढा भरलेले काही वाघ-सिंहही प्रदर्शनात मांडतात ! पण नव्या पिढीच्या लेखी हा सर्व माल केव्हाच पुराण वस्तूंच्या अजबखान्यात जमा झालेला असतो.

आणि जुन्याच्या विरोधात उभे ठाकलेले हे जे नवे असते त्याचे स्वरूप आधी भीतिदायकच असते. नव्या अनोळखी शक्तीचा आविर्भाव हा सुरुवातीला भीतिदायक आणि विध्वंसकच असतो. सुरुवातीला अग्नी विध्वंसकच होता. अणुशक्ती असेच भीषण रूप घेऊन अवतरली. आकाशातून खाली येणारी वीजही विध्वंसकच ठरते. नव्या जगाचे क्रांतिकारी नेतृत्व हे सुरुवातीला असे विध्वं-सकच वाटणार. चंद्रावरच्या हरणांची शिकार करायला निघालेली ही पिढी आहे. नव्या जगाचे हे पहिले रहिवासी आहेत. त्यांची वर्तवणूक त्या पुरातन आदिमानवासारखी राठ आणि जंगली ही वाटू शकेल.

योगिराज भन्साळींनी एखाद्या अन्यायाविरुद्ध उपोषण करावे, तसे या जागतिक निर्घृणतेच्या विरोधात आणि शांतीसाठी ते हिप्पी जोडपे बेड-प्रोटेस्ट–शय्यानिषेध–सुरू करते. म्हणजे सात दिवसां-पर्यंत एकाच खोलीत नुसते विवस्त्र झोपून राहायचे. या साऱ्या बेढब समाजाच्या थोराड मूल्यांचा ही पिढी असा उपहास करते. ही विकृती नव्हे, कळतनकळत केलेले विडंबन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. वैफल्य आणि असुरक्षितता यांच्या धारदार पात्यांच्या कैचीत ही नवी पिढी सापडलेली आहे. आर्थिक, वांशिक, कौटुंबिक, आत्मिक वैफल्याने व असुरक्षिततेने तिला पछाडलेले आहे. आणि

जे या खाईतून तिला वर काढील आणि याच कैचीच्या भरवंशावर काळाचे वस्त्र कापून या पिढीच्या अंगावर त्याचा प्रसंगानुरूप साज चढवील, तेच उद्याचे नेतृत्व असेल.

ही पिढी अशांत आहे. पण जगात शांतता निर्माण व्हावी, अशी पोटदुखी या पिढीला जडल्याचे हे लक्षण आहे. या अशांत पिढीने शांत व्हावे म्हणून पेपर सोपे काढणे अथवा परीक्षा रद्द करणे हा अॅस्पिरिनने टच्यूमरची डोकेदुखी थांबविण्याचा प्रकार आहे. कुशल न्यूरो सर्जन जसा मेंदूच्या सातव्या कवचाआड दडलेले टच्यूमर बिनचूक काढतो तसे या डोकेदुखीच्या मुळाशी शिरावे लागेल. हे काम नव्या नेतृत्वाचे आहे. हे नेतृत्व सुरुवातीला बंडखोर वाटणे स्वाभाविक आहे. पण या बंडखोरीमागे एक हेतू आणि एक समर्पण-भाव असेल. दडपण, मताग्रह आणि पद्धतबाजी ही जुन्या नेतृत्वाची लक्षणे होती; तर पद्धतबाजीऐवजी एक सर्मापित स्वच्छंदता, मताग्रहाऐवजी वस्तुनिष्ठता आणि दडपणाऐवजी स्वयंस्फूर्तपणे स्वीकृत केलेली जबाबदारी ही या नवनेतृत्वाची वैशिष्टचे असतील. हे नेतृत्व कुंचल्याच्या फटकाऱ्यांनी रंगवलेल्या चित्रासारखे (पॅच-वर्क पेंटिंग) असेल. त्याला एक गणवेष असणार नाही. आणि तरीही ती एक चमू असेलच. आणि त्याची काम करण्याची पद्धत? त्याची कोणतीही एक पद्धत असणार नाही आणि साऱ्या पद्धती त्याच्या असू शकतील. अंतरिक्षयात्रिकाप्रमाणे वाटचालीतच रस्त्याची माहिती करून घेण्याचे तंत्र (लर्निग द रूट अॅज यू गो!) हे त्याचे तंत्र असू शकेल. बुद्धीने निरीक्षण आणि आत्मस्फूर्तीने उड्डाण, ही त्याची पुढे जाण्याची व नेण्याची शैली असू शकेल.

आज हा सर्व स्वप्नरंक आणि गूढरम्य आशावाद वाटू शकेल, पण या आशावादाला प्रत्यक्ष प्रत्ययांचा एक खंबीर पाया आहे. एक उदात्त आणि सर्वमान्य हेतू पुढे ठेवल्याबरोबर सामान्य माण-साच्या समूहातली ही नेतृत्वशक्ती कशी प्रकट होते याचा अनुभव मी घेतलेला आहे. तरुण पिढी झपाटून टाकील, आणि केंद्राकेंद्रांवर

त्यांना उठवील, असा एक विशाल हेतू कोणता असू शकेल आणि तो तिच्यापुढे कोण कसा ठेवू शकेल, हा खरा आपल्यासमोरचा प्रश्न आहे. या महान प्रश्नाचे जहाज स्वातंत्र्यानंतर अजून भटकतेच आहे. त्याला उत्तराचा किनारा अजून गवसलेला नाही.

हे उत्तर शोधण्याचा एक अल्पसा प्रयत्न म्हणजे सोमनाथवरून सुरू झालेली स्वयंस्फूर्त अशी श्रमसंस्कार छावण्यांची अखिल भारतीय शृंखला ! तरुण नवनेतृत्वाचा चेहरा त्या ठिकाणी पहिल्यांदा उमटला. या चेहऱ्याचा रंग कुठलाही लालपिवळा रंग नव्हता. असलाच तर त्याला धरित्रीचा रंग होता. त्याच्यावर कुठल्याही संप्रदायाचे लेबल डकवलेले नव्हते, असलेच तर जीवनाच्या भक्तीच्या संप्रदायाचे ते होते. त्याचा स्वत:चा असा एखादा नारा नव्हता, असलाच तर एक मंत्र नि:शब्दपणे त्या हजार तरुणांच्या हालचालींतून घुमत होता–एका पिढीपूर्वी ' छोड़ो भारत ' या मंत्राने देशातल्या तरुणांना खडबडून घराबाहेर काढले होते, आता ' जोडो भारत ' या मंत्राने शहरांतल्या परीटघडीवाल्या, सुखासीन तरुण–तरुणींना जमीन, घाम, अश्रू आणि ढोरासारखे कष्ट अव्याहत उपसत राहणारी माणसे यांत आणून सोडले होते. त्या मंत्राने एक साम्राज्य सात समुद्रापल्याड भिरकावणारा प्रचंड उद्रेक निर्माण केला होता, या मंत्राने एका खंडतुल्य देशाचे तुकडे तुकडे झालेले मन सांधण्याचा प्रयत्न मातीच्या मुशीत सुरू झाला होता. जिकडे तिकडे ' तोड़ो भारत ' चा हलकल्लोळ सुरू असता पहाटेच्या दवाने नि:शब्द टपटपून गुलाबाचे ताटवे फुलवावे तसा– **जोडो भारत** हा मंत्र मनामनावर टपटपत होता.

मंत्रांच्या ठायी प्रचंड सामर्थ्य असते असे म्हणतात. पण ते झोपलेले असते, ते जागे करणारी एक साधना असते, एक तंत्र असते. हे तंत्र या श्रमसंस्कार छावण्यांतून शोधले व घडवले जात आहे. भेदांच्या भिंतींचे रूपांतर विविधतेच्या वैभवात कसे करता येईल, त्याचे हे तंत्र आहे. राष्ट्रीय विध्वंसातून एक राष्ट्र नवनिर्माण मोर्चा कसा

उभरता येईल त्याचे हे तंत्र आहे. क्रांतीच्या प्रसूतिवेदनेतून नव्या जगाचे बाळ सुरक्षितपणे जन्माला घालणाऱ्या एका मेजर ऑपरेशनचेच हे तंत्र आहे–आणि अखेर ते एक युद्धतंत्रही आहे. सुरुंग उडविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी बसावे लागते. शत्रूपक्षाचेच सुरुंग जमा करून व त्याच्यावर उडवून त्यालाच जेर करता येते. पण हे सुरुंग उडवण्याआधीच जमा करायला हवे असतात. त्यांचे स्फोट होण्याआधीच त्यांची अलगद सफाई करायच्या मोहिमेला ‘ सॅल्व्हेज ऑपरेशन ’ असे म्हणतात. विधायक कार्यक्रम हे तरुणांच्या स्फोटक शक्तीचे असे ‘ सॅल्व्हेज ऑपरेशन ’ आहे. एकीकडे खवळलेल्या समुद्राच्या दर्शनी भागावर प्रश्नांची व्यापारी जहाजे भटकत आहेत. विध्वंसाच्या युद्धनौका धावपळ करीत आहेत आणि अशा वेळी त्यांनी पेरलेले सुरुंग गोळा करीत सोमनाथाची, भमरागडची मोहीम निघाली आहे. एका नव्या चेहऱ्याच्या नेतृत्वाने पाणबुडीसारखा सूर मारला आहे–आणि आता सगळ्या भटक्या समस्यांना सुरुंग लावीत ही पाणबुडी पुढे पुढे चालली आहे. आणि ज्या किनाऱ्यावर ती आपले डोके वर काढील तो अंतिम विजयाचा किनारा असेल. या मोहिमेत सहभागी होणारे बहाद्दर कोण ?

# पत्थराना कोंभ फोडणारी मने

‘जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण’ अशी एक समाजधारणेची व्याख्या गेल्या शतकात रस्किनने केली होती. पण त्या कल्पनेला एक मर्यादा घातल्यासारखी होती. मुळातच धरतीला आणि नियतीला हा संकुचित दृष्टिकोण मंजूर नाही, जमीन तीच असते. माती तीच असते तरी आपण पाहतो, त्याच कणातून कडूनिंबाचे झाड उगवते आणि जवळच द्राक्ष–संत्रीही डोलत असतात ! निसर्गाच्या उत्पत्तीपासून ह्या समतेचे अस्तित्व आहे. त्याच धरतीचे शेतकरी हे सुपुत्र. गांधीजींनी रस्किनच्याच खांद्यावर उभे राहून आणखी सोपी व सर्वस्पर्शी व्याख्या केली : ज्यात सर्वांचा उदय तो सर्वोदय भले ! सर्वांच्यासाठी, सर्वांच्या भल्यासाठी असलेले प्रत्यक्षातले हे निसर्गसूत्र गांधीजींनी आपल्या कार्यक्रमात ओवले. काही विशिष्टांचा उद्धार वा उत्कर्ष ही कल्पना अपुरी असल्याचे दाखवले.

आपल्याकडे प्राचीन काळी खऱ्या अर्थाने ग्रामीण लोकराज्य होते. सर्वांच्या सहकार्याची आणि विकासाची त्यात व्यवस्था होती. आजच्यासारखी मतामतांची साठमारी तेव्हा नव्हती. आपला मुखिया तेच बिनविरोध निवडत. गावातल्या गरजा गावातच भागवल्या जात. गावची लक्ष्मी गावातच राखून गाव समृद्ध असायचा. परस्परांकडच्या विशिष्ट वस्तूंची विश्वासाने देवाण-घेवाण

व्हायची. आता याच्या नेमके उलटे चित्र आहे ! पाचामुखी परमेश्वर दिसण्याऐवजी भेदाभेदांची पंचायतनेत जागोजागी अवतरली आहेत ! ग्रामपंचायतीच्या गरम पंचायती होऊन डोके फोडाफोडीपर्यंत पाळी जाते ! ही विस्कळित समाजरचना बदलण्यासाठी, नवे ओजे प्रकट होण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीचा आणि सहकारी समाजरचनेचा आधार घेऊन प्रयत्न करावा लागेल.

या कार्यक्रमासाठी छू:मंतर समाजवादाची किंवा कॉम्प्युटरचीसुद्धा गरज नाही ! गावाने ग्रामस्वदेशीचे व्रत घेऊन स्वावलंबी बनले पाहिजे. गावातली लक्ष्मी गावातच वसली पाहिजे, ही पहिली गोष्ट. शेटजी, भटजी किंवा कोण्या सावकाराच्या मालकीचा ऐवज राहून बाकीच्यांनी केवळ भुसा फुंकत रहायचे ही गोष्ट आता इतिहासजमा केली पाहिजे ! गावातल्या चांगल्या प्रवृत्तींचे पोषण करण्यासाठी सहकाराच्या मालिकेत त्या ओवायला हव्यात. तेथे कुणाचे शोषण असणार नाही. मात्र ‘ सहकार ’ अथवा ‘ समाजकार्य ’ या शब्दांभोवती जमलेली पुटेसुद्धा घासून पुसून साफ करायला हवीत !

अगदी साध्यासुध्या गोष्टींतून हे आपल्याला साधता येणे शक्य आहे. गावात नेहमीच कुणाला तरी हॉस्पिटलच्या गावी नेणे भाग पडते. अशी तातडीची वेळ येतेच. किंवा दैनंदिन जीवनातही वाहतुकीचा प्रश्न येतो. मोटरीसारखी वाहने वा सरकारी मदत यमनियमांच्या चौकटीत कामी पडू शकते. अशा वेळी गावाने आपल्या मालकीची एखादी बैलगाडी ठेवावी. तिचा खर्च गावाने सोसावा. शेतीप्रधान व्यवस्थेच्या गावाला हे भारी नाही. पुढे जाऊन ऐपतीनुसार जीपही ठेवता येणे काही अवघड नाही. गावातल्या गुरांची निगा, राखण, त्यांचे शेणखत इत्यादींच्या व्यवस्थेसाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते. पूर्वी देवीच्या नावाने गावात वळू सोडत. अधिक चांगल्या जनावरांची पैदास करण्याच्या दृष्टीने आजही गावाला असे करता येईल. खेडोपाडी वीज लकाकू लागली

आहे. सहकारी पीठगिरण्या चालवता येतील. त्याच यंत्रावर आणखीही उपयोगी व्यवस्था बसवून पाणीपुरवठा, कडबा-कटर इत्यादी सोयी सहकारी पद्धतीने करता येतील. घरोघरी नळ पोचवल्यावर केवढा प्रश्न सुटणार आहे ! सामूहिक कडबा-कटरच्या योगे गावासाठी मोठ्या प्रमाणावर वैरणीची बेगमी करता येईल. सर्वांच्या उपयोगासाठी सामूहिक पद्धतीने करता येण्यासारखे असे किती तरी छोटे मोठे उद्योग आहेत. सहकारातून निर्माण होऊ शकणारे हे वलय आहे. अंबर चरख्याचे युनिट, हातमागाचा प्रकल्प, त्याचप्रमाणें नांगराचे फाळ, मेणबत्त्या, दोर, अवजारे इत्यादींसाठीसुद्धा सहकारी युनिट करून गावच्या गरजा पुऱ्या करून सर्वांना रोजगार उपलब्ध करून देता येतील. ग्रामस्वदेशीचे व्रत यात अभिप्रेत आहे. वऱ्हाडातल्या ‘ ऐकिली ’सारख्या परंपरेत याचीच बीजे आहेत.

सहकार सहयोग, आणि परस्फर विश्वास या त्रिसूत्रीतून ‘ अहिंसक दिलेरी ’ निर्माण करून विकास साधणे, हे गांधीजींच्या कल्पनेतील कार्याचे सूत्र होते. बदलत्या काळाच्या संदर्भात हे करायचे तर त्यासाठी बुलंद दर्जाची जिद्द हवी. अहिंसेचे किंवा सर्वोदयाचे बुजगावणे अथवा फॅडही नको, हे स्पष्टपणे सांगायची गरज आहे. मोठ्या तत्त्वांच्या चुकीच्या नि स्वार्थान्ध वापरातून केवळ श्रीमंतच अधिक श्रीमंत होत जातात आणि गरीब अधिक गरीब होतात. या कटू फळाची चव वर्तमानाने चाखली आहे. चांगले विचार केवळ डोक्यात उगम पावून चालत नाहीत. त्यासोबत आचाराची पावले पडली पाहिजेत. सद्‌विचारांची सोबत सदाचाराने अनुभवली पाहिजे आणि आत्मविश्वास नुसता मनात बाळगून भागत नाही, तो मनगटात उतरला पाहिजे.

सर्वांच्या भल्याच्या या कल्पनेचा सुरुवातीला स्वप्नरंजन म्हणून उपहास करण्यात आला. कुठल्याही गोष्टीच्या जन्माच्या वेळी ती परिपूर्ण वा सुंदर असतेच असे नाही; बहुधा ओबडधोबड असेच

तिचे रूप असते. आधुनिक तंत्राचा समाजव्यवस्थेसाठी खूपच उपयोग होणार आहे. सामाजिक कार्याच्या तळमळीत बासनातल्या कापूरवड्या हुंगवून चालणार नाही, किंवा ती कल्पनाच स्वाहाकार करून हजम करता येणार नाही. विज्ञान, यंत्र, तंत्र आणि अहिंसक दिलेरीसाठी तो मंत्रही आहे. गावाने आपल्या नव्या पिढीला याचे दर्शन घडवून आणले पाहिजे. विज्ञानाने अमर्याद संधी उपलब्ध करून दिली आहे; ती आता कुणा जातीची वा कुळाची मालमत्ता राहिलेली नाही. आपल्या शेतीप्रधान देशात कोंडी करणारे, पुरातन बालेकिल्ले, तट पुष्कळ अंशी ढासळले आहेत तरी त्याची चाहूल. लागली आहे खास; पण शेतकऱ्यांची प्रगती केवळ समाजवादी घोषणांनी किंवा मतपत्रिकेच्यां चित्रावर टप्पे लावून होणार नाही. त्या शाईच्या फुल्या नवी व्यवस्था आणू शकत नाहीत. विज्ञानाची जोड असलेली तळमळ हीच आपल्या शेतीप्रधान देशाला तारून नेईल. तेथेच मतपेटीतून जन्मलेल्या नव्या नेतृत्वाला वाव मिळणार आहे.

श्रीकृष्णाने असे स्नेहराज्य गोकुळात स्थापले होते. पेंद्या-सुदामा यांना त्याने जवळ केले होते. कुरणशाळा त्याने चालवल्या. जातीयतेचे, वर्णभेदाचे कंस त्याने मारले. गोपालकाल्याच्या कल्पनेतून त्याने सर्वांना एकत्र आणले. नव्या कार्याच्या दृष्टीला त्याची जोड दिली तर आधुनिक समृद्धीचे गोकुळ निर्माण होणे कठीण नाही. ही पुराणकथा. परंपरेतून लोकसंस्कृतीने जतन केलेली. त्यातून नवा अर्थ आपण घेतला पाहिजे. कामाचा गोवर्धन एकटा कुणी उचलू शकत नाही. नेता फार तर अंगुलिनिर्देश करतो. सर्वांचे हजार हात लागल्याशिवाय गोवर्धन उचलला जाऊ शकत नाही. ज्यांच्याजवळ नव्हते त्यांना श्रीकृष्णाने दिले, पण धाड घालून वा लुटून नव्हे. गावातले पेंद्या–वाकड्या उपाशी आहेत ना, मग हे दहीदूध आम्ही बाहेर जाऊ देणार नाही, असा त्याचा हट्ट होता. श्रीकृष्णाची ही दृष्टी उचलून गावाला लागणारे दही, दूध, भाजीपाला किती; ते निर्माण करण्यास काय लागेल; मनुष्यशक्ती किती आहे; ती कशी

कामी लावता येईल याचे भान ठेवले पाहिजे. ही सामूहिक दृष्टी जोपासली पाहिजे. माती जागवणाऱ्यांची जमात एक असते ! जो पडित माळ जागवतो, हिरवे करतो, पत्थरांना कोंभ फोडतो, तोच हे स्वप्न उभे करू शकतो. माती जागवणाराच समाजाच्या पडित मनोभूमीची मशागत करू शकतो. शेतकऱ्याच्या सहयोगाला आजचा अर्थ हा असा लाभला आहे. ही क्रांती काही शहरांतल्या डांबरी सडकांवर साकारणार नाही. पुस्तकांतून घोकता येणार नाही. दुसऱ्या देशांतून आयात करता येणार नाही. शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीतूनच ही नवी घडण आकार घेणार आहे.

सामूहिक कार्य हे मधमाशांच्या मधुकुंभासारखे असते. राणीमाशीला त्या रचनेत महत्त्वाचे व्यक्तिगत कार्य असते, तेवढेच महत्त्व कामकरी माशांना. सर्वांच्या सहयोगातून, बिंदूबिंदूतून मधुकोष जमा होत असतो. या उलट हुकूमशहाच्या आदेशाची तुलना वारुळातून निघणाऱ्या मुंग्यांशी करावी लागेल ! गावातल्या प्रत्येक कृतीला मधमाशीसारखा सहयोग अंश लाभला पाहिजे, तो तपासून पाहिला पाहिजे, आजच्या संकरित समाजव्यवस्थेसाठी भरघोस स्नेहाचे पीक घ्यायला अशा दक्षतेची आवश्यकता आहे. या कल्पनेत आहे तीसुद्धा या माणुसकीचीच उत्तम जोपासलेली समज. युक्ती–शक्तीबरोबरच भक्तीसुद्धा वाढली पाहिजे. स्पर्धेपेक्षादेखील सहकारातून आपण जास्त कमवू शकतो याचा इसार आजच्या काळाने दिला आहे.

शेतकऱ्यांचा सहयोग हा असा आहे–त्याच्या जीवनातून जे दिसते त्याचे हे निरूपण आहे, हा तात्पुरता सल्ला नाही. निवडणुकीत मते देतात, संस्थांना अनुदाने देतात, तशी ही सहयोगाची दृष्टी दान देता येत नाही. व्यक्तीने व समाजाने आपलीच मशागत करून ती कमवायची असते. ही त्यालाच जाणवणार आहे. ऋतुचक्राचे सादपडसाद जाणत, मातीखालच्या मातीची आस तृप्त करत, तो काम करत असतो, भान ठेवून योजना आखत, व त्या बेभान होऊन

सर्वांबरोबर अमलात आणताना त्याला कळेल की आपल्या हातातच हा परिस उद्याच्या व आजच्या जगाला अधिक मनोहर विकासासाठी ह्या सुसंस्कृत राष्ट्रवादाची गरज आहे. ' जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।' यातसुद्धा त्याचीच बीजे आहेत. ह्यासाठी दुसऱ्याची कळकळ असलेले हृदय, डोळे आणि हात हवे आहेत. पण ही जाणीव शेतकऱ्याच्या अंतःकरणात रुजली पाहिजे, फोफावली पाहिजे. म्हणजे तिचे सकस पोषण होईल. मंद गाढवाला झ्याः झ्याः करत चालवण्यासाठी डोकेबाज परीट काठीच्या टोकाला गाजर बांधून त्याच्यासमोर धरतो, त्या आमिषाने गाढव चटचट चालते; –पण– पण तसा समाजवाद येणार नाही. कष्टाने झिंगलेले, श्रमाने रसरसलेले त्याचे जीवन असते. धुराड्यांचा काळा धूर हुंगत, स्वतः जगण्यासाठी तो खपत नसतो. त्याचे जगणे असते काम करण्यासाठी ! पाखरे हाकलण्यासाठी भल्या सकाळी सज्ज असलेल्या त्याला जाणवतात पूर्वेच्या क्षितिजावरच्या सोनेरी कडा ! अंथरुणात झोपेतला चहा घेणाऱ्या, आकाशचुंबी इमल्यांच्या गर्दीतल्यांना त्या सोनेरी रेषा दिसणार नाहीत. पण हा उदय शेतकऱ्याला दिसणार नाही तर कुणाला दिसणार ? आणि मनातला आत्मविश्वास बलदंड मनगटांतून उतरला पाहिजे–तो सर्वांच्या भल्यासाठी !

# कोठे आहेत नवे भगीरथ ?

ग्रीक पुराणात हिरोक्लीजची कथा आहे. हिरोक्लीजला एकाच दिवसात एक मैलोगणती लांबलचक असलेला तबेला साफ करण्याची जिम्मेदारी सोपवण्यात आली. त्याने आधी फावडे, झाडू, टोपले घेऊन तो तबेला साफ करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या नंतर लक्षात आले की, दिवस उतरणीला लागला आहे आणि तबेल्याचा एक टप्पादेखील अजून साफ झालेला नाही ! त्यासरशी एकदम हतबुद्ध होऊन त्याच चिखलात त्याने बैठक मारली आणि त्याच वेळी त्याच्या अंतर्शक्ती एकाएकी उसळून आल्या. त्याला नवीन कल्पनेचा जोश लाभला. हिरोक्लीज उठला आणि नगराच्या बाहेर वाहत असलेल्या नदीचा प्रवाह तबेल्याकडे त्याने वळवून दिला आणि पाहता पाहता तो विस्तीर्ण तबेला स्वच्छ झाला.

ही ग्रीक दंतकथा भारतीय भगीरथाची निश्चितच आठवण करून देते. गंगा स्वर्गातून उतरली होती; पण तिला शंकराची जटा आणि जह्नूच्या कर्ण विवरातून मुक्त करण्यासाठी त्याला प्रयत्नांची शर्थ करावी लागली होती. विज्ञानाची गंगा आजसुद्धा देवता आणि मानवांच्या अहंकारात गुरफटली आहे. तिला देशातल्या आणि जगातल्या अगदी तळथरापर्यंत पोचवण्यासाठी तळमळणारे भगीरथ तरुण हेच नव्या पिढीचे भगीरथ मानायला हवेत.

दंतकथांतील चमत्कार आणि प्राचीनतेचा अंश वजा करता त्यांचा

प्रतीकात्मक अर्थ आपण ध्यानी घ्यायला हवा. आधुनिक संदर्भातसुद्धा हिरोक्लीज आणि भगीरथ इंजिनियर अवतरू शकतात. (आणि मानवाची चंद्रावर उमटलेली पावले हेच दाखवून देतात !) निराकार प्राकृतिक चेतनांना – शक्तींना मानवासाठी एक अर्थवत्ता देणारा, त्यांच्या भल्यासाठी त्या अपार शक्तींना 'चॅनलाईज' करणारा – तो इंजिनियर, तंत्रविशारद. ह्या शक्ती भौतिक असू शकतात तसेच आत्मिकसुद्धा. अखेर ज्याला आम्ही 'नेता' म्हणतो, तो सुद्धा मानव-समूहांच्या अंतर्बाह्य शक्तिधारांना विवक्षित अशा खास दिशेने एकत्रित करून वळण देणारा तंत्र-विशारदच मानायला हवा.

जुन्या पिढीला माझ्या दृष्टीने सर्वांत अधिक कमीपणा आणणारी गोष्ट कोणती असेल तर ही की, तिने 'नेता' हा शब्द बिलकुल पोकळ आणि उपहासास्पद असा बनवून नव्या पिढीला सोपवला ! नेतृवाची जुनी प्रतिमा एक तर कागदी, खादीधारी, व्यासपीठीय, झब्बेशाही व्यक्तित्व असलेली, तिकडमबाज परंतु वर्तमानपत्रांच्या पानांवर रोज झळकू इच्छिणारी तथाकथित महामानवाची प्रतिमा ! किंवा त्या नेत्याभोवती अलौकिकता, गूढमयता आणि तात्त्विक प्रभामंडलाचे चक्र विराजत असलेली ! हा एक ऐतिहासिक मूर्खपणा आणि भ्रम होय. ईश्वर आणि मनुष्यासंबंधीच्या अवास्तव कल्पनांतून याचा जन्म झाला आहे. खरोखर, सच्चा रहस्यभाव कधी अदृश्य राहू शकत नाही. तो छपू शकत नसतो. तो अधिकाधिक स्पष्ट आणि व्यक्त होऊ शकतो.

'नव्या नेतृत्वा'चा तलास करताना या चमत्कार भरल्या चकचकाटापासून आधी दूर राहिले पाहिजे आणि या भ्रमजाळाला तोडले पाहिजे. स्थलकालपरिस्थितीनुसार नेतृत्वाच्या कसोट्या बदलत असतात. पुरातन कसोट्या नव्या संदर्भात कुचकामी ठरतात. जर या जुन्या–नव्याच्या घोटाळ्यापासून बचावलो तरच वास्तवात नवे नेतृत्व म्हणून कोणती चीज उदयाला येते आहे ते आपण पाहू

शकू ! आणि येत असेल तर कोठे आणि कसे ? आणि अखेर त्या नेतृत्वाचे असे कोणते स्वरूप प्रत्ययाला येते ?

जुन्या पिढीची नेतृत्वाची कल्पना मध्ययुगाच्या पेक्षा जरा थोडीशी पुढारलेली असेल नसेल ! घसा फोडून ओरडत ती नव्या पिढीच्या वाटसरूंना पुकारते आहे. कोठे ती फुंकर मार-मारून धर्मचक्र प्रवर्तनाचा दंभ करीत आहे. कोठे ती जन्मशताब्दयांच्या महोत्सवात मग्न आहे ! आणि कळत नाही, आणखी नवी नवी नावे धारण करून ती आणखी काय काय रंग करीत आहे !

आणि नवी पिढी तर ऐकायला जराही रिकामी नाही ! कारण त्यांना माहित आहे की, ज्या मार्गासाठी या वृद्धजनांनी कंठशोष चालवला आहे ते मार्ग कुठेच नेत नाहीत ! आणि नेतही असतील तर जीवनाच्या भिक्षुधर्मी वंचनेकडे, छद्मी बौद्धिक तर्कटांच्या निरर्थक रस्सीखेचीकडे ! आणि एका सर्वव्यापी स्मशानी वैफल्याकडे.........या तथाकथित देशभक्तांच्या पिढीने एक मोडतोड झालेला, चिघळल्या जखमांनी भळभळता देशच नव्या पिढीला दिला आहे !

मग ह्या नव्या पिढीने का म्हणून त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून चालावे ? ह्या सगळ्या पुराणशक्ती त्यांच्या केवळ संशयग्रस्ततेतच महान शाबीत झाल्या आहेत ! त्यांचे पुष्कळसे निष्कर्ष, सिद्धान्त स्वतःच समस्या बनले आहेत.

प्रदर्शनापुरते या पुराण – नेतृत्वात डावे – उजवे पंथ दाखवता येतील; पण वस्तुतः सत्तेच्या खुर्चीवर असलेले आणि सत्ताहीन या दोन श्रेणींतच ते सामावू शकते ! स्वातंत्र्योत्तर काळातील तरुणाई अशा नेतृत्वाच्या पकडीत सापडत नाहीसे दिसले तर त्यात आश्चर्य कसले ? विशाल देहाचा पाणघोडा आणि रानमांजरी यांचे जंगलातील दृश्य नजरेसमोर येते. त्या तल्लख रानमांजरींना

वाटते की पाणघोड्याचे लचके तोडता येतील. पण इकडेतिकडे ओरखडे, जखमा करण्यापलिकडे काही विशेष होत नसते. पाणघोडेही थकलेले नाहीत ! मैदान सोडून पळालेले नाहीत. एखादा जातो तर त्याचे स्थान दुसरा घेतो. या रानमांजरी विद्यापीठांच्या परिसरात आणि रस्त्यावर चौकाचौकात धूम करीत आहेत.

वैफल्य – अंधार सर्वत्र पसरलेले असतात. गंगेला अडवणाऱ्या अहंकारमन्य देवगणांचे राज्य सर्वत्र आहे. प्रत्येकाच्या डोळ्यांत उमटलेल्या क्षितिजात असमाधान जाणवते आहे. युवा भगीरथ आणि हिरोक्लीज कोठे असतील का ? परिस्थितीचे चक्रव्यूह भेदणारे अभिमन्यू आहेत का ? आणि असतील तर ते कुठे ?

ते आहेत ! जरूर आहेत ! रणांगणावर आहेत, धरणावर आहेत, विज्ञानाच्या प्रयोगशाळेत आहेत, आदिवासींवरच्या अन्यायाशी झुंजत आहेत. १९६५ च्या रणांगणावर महाकाय पॅटन टँक आणि सुपरसॉनिक जेट विमाने त्यांनीच उलथवली. दोन सार्वत्रिक निवडणुकांत अर्ध्याहून अधिक राजकीय जडता आणि गतिरुद्ध प्रवाहांना मुक्त करण्यासाठी मोठमोठ्या खडकांना आपल्या तरुण मतशक्तीच्या बळावर उखडून टाकताना पाहिले. गतवर्षी ७१ च्या पूर्व आणि पश्चिम रणक्षेत्रावर तर अभूतपूर्व नव्या तेजाचे दर्शन घेतले. विजयाचा महान आविष्कार प्रकटला. शेतांत, कारखान्यांत, आपल्या आईबापांपासून दूर त्यांना घाम गाळताना पाहिले. पुन्हा पुसा इन्स्टिटयूट, पंजाब – महाराष्ट्रातील शेतांवर उत्पादनाचे उच्चांक गाठताना पाहिले. विज्ञानाच्या क्षेत्रात नव नवे संशोधन करताना पाहिले. आदिवासी क्षेत्रात समर्पित जोशाने नव्या रचनेसाठी संघर्ष पेलणारेही तेच आहेत. समाजातल्या तळथरात प्रबोधन घडवण्यासाठी, भमरागडसारख्या घनदाट आदिमानवाच्या रानात झोकून देण्यासाठी कटिबद्ध असलेले ते दिसत आहेत. नवे कोरे अनुभव घेण्यासाठी, निर्मितीसाठी सळसळणारी त्यांची मने सतत क्षण टिपत आहेत. झुंज घेत आहेत.

शकू ! आणि येत असेल तर कोठे आणि कसे ? आणि अखेर त्या नेतृत्वाचे असे कोणते स्वरूप प्रत्ययाला येते ?

जुन्या पिढीची नेतृत्वाची कल्पना मध्ययुगाच्या पेक्षा जरा थोडीशी पुढारलेली असेल नसेल ! घसा फोडून ओरडत ती नव्या पिढीच्या वाटसरूंना पुकारते आहे. कोठे ती फुंकर मार-मारून धर्मचक्र प्रवर्तनाचा दंभ करीत आहे. कोठे ती जन्मशताब्दयांच्या महोत्सवात मग्न आहे ! आणि कळत नाही, आणखी नवी नवी नावे धारण करून ती आणखी काय काय रंग करीत आहे !

आणि नवी पिढी तर ऐकायला जराही रिकामी नाही ! कारण त्यांना माहित आहे की, ज्या मार्गासाठी या वृद्धजनांनी कंठशोष चालवला आहे ते मार्ग कुठेच नेत नाहीत ! आणि नेतही असतील तर जीवनाच्या भिक्षुधर्मी वंचनेकडे, छद्‌मी बौद्धिक तर्कटांच्या निरर्थक रस्सीखेचीकडे ! आणि एका सर्वव्यापी स्मशानी वैफल्याकडे........या तथाकथित देशभक्तांच्या पिढीने एक मोडतोड झालेला, चिघळल्या जखमांनी भळभळता देशच नव्या पिढीला दिला आहे !

मग ह्या नव्या पिढीने का म्हणून त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून चालावे ? ह्या सगळ्या पुराणशक्ती त्यांच्या केवळ संशयग्रस्ततेतच महान शाबीत झाल्या आहेत ! त्यांचे पुष्कळसे निष्कर्ष, सिद्धान्त स्वतःच समस्या बनले आहेत.

प्रदर्शनापुरते या पुराण – नेतृत्वात डावे – उजवे पंथ दाखवता येतील; पण वस्तुतः सत्तेच्या खुर्चीवर असलेले आणि सत्ताहीन या दोन श्रेणींतच ते सामावू शकते ! स्वातंत्र्योत्तर काळातील तरुणाई अशा नेतृत्वाच्या पकडीत सापडत नाहीसे दिसले तर त्यात आश्चर्य कसले ? विशाल देहाचा पाणघोडा आणि रानमांजरी यांचे जंगलातील दृश्य नजरेसमोर येते. त्या तल्लख रानमांजरींना

वाटते की पाणघोड्याचे लचके तोडता येतील. पण इकडेतिकडे ओरखडे, जखमा करण्यापलिकडे काही विशेष होत नसते. पाणघोडेही थकलेले नाहीत ! मैदान सोडून पळालेले नाहीत. एखादा जातो तर त्याचे स्थान दुसरा घेतो. या रानमांजरी विद्यापीठांच्या परिसरात आणि रस्त्यावर चौकाचौकात धूम करीत आहेत.

वैफल्य – अंधार सर्वत्र पसरलेले असतात. गंगेला अडवणाऱ्या अहंकारमन्य देवगणांचे राज्य सर्वत्र आहे. प्रत्येकाच्या डोळ्यांत उमटलेल्या क्षितिजात असमाधान जाणवते आहे. युवा भगीरथ आणि हिरोक्लीज कोठे असतील का ? परिस्थितीचे चक्रव्यूह भेदणारे अभिमन्यू आहेत का ? आणि असतील तर ते कुठे ?

ते आहेत ! जरूर आहेत ! रणांगणावर आहेत, धरणावर आहेत, विज्ञानाच्या प्रयोगशाळेत आहेत, आदिवासींवरच्या अन्यायाशी झुंजत आहेत. १९६५ च्या रणांगणावर महाकाय पॅटन टँक आणि सुपरसॉनिक जेट विमाने त्यांनीच उलथवली. दोन सार्वत्रिक निवडणुकांत अर्ध्याहून अधिक राजकीय जडता आणि गतिरुद्ध प्रवाहांना मुक्त करण्यासाठी मोठमोठ्या खडकांना आपल्या तरुण मतशक्तीच्या बळावर उखडून टाकताना पाहिले. गतवर्षी ७१ च्या पूर्व आणि पश्चिम रणक्षेत्रावर तर अभूतपूर्व नव्या तेजाचे दर्शन घेतले. विजयाचा महान आविष्कार प्रकटला. शेतांत, कारखान्यांत, आपल्या आईबापांपासून दूर त्यांना घाम गाळताना पाहिले. पुन्हा पुसा इन्स्टिटयूट, पंजाब – महाराष्ट्रातील शेतांवर उत्पादनाचे उच्चांक गाठताना पाहिले. विज्ञानाच्या क्षेत्रात नव नवे संशोधन करताना पाहिले. आदिवासी क्षेत्रात समर्पित जोशाने नव्या रचनेसाठी संघर्ष पेलणारेही तेच आहेत. समाजातल्या तळथरात प्रबोधन घडवण्यासाठी, भमरागडसारख्या घनदाट आदिमानवाच्या रानात झोकून देण्यासाठी कटिबद्ध असलेले ते दिसत आहेत. नवे कोरे अनुभव घेण्यासाठी, निर्मितीसाठी सळसळणारी त्यांची मने सतत क्षण टिपत आहेत. झुंज घेत आहेत.

या नव्या नेतृत्वाची ओळख करून घेण्यापूर्वी आपण जुन्या पुराण्या परिभाषांची तपासणी करायला हवी. हे नवनेतृत्व केवळ उपदेशकांचे वा आदेश देणाऱ्यांचे नाही. ते नवरचना करणाऱ्यांचे, संचालन करणाऱ्यांचे आणि कर्मकुशलांचे नेतृत्व आहे. सिद्धान्तांपेक्षाही समस्यांमध्ये त्यांना अधिक दिलचस्पी आहे. आश्वासनांऐवजी त्यांची परिणामांवर अधिक निर्भरता आहे.

त्यांना माहीत आहे की, कारस्थानांतून उगवलेली क्रांती आपल्या उद्दिष्टांप्रत कधीच पोचत नसते. त्याच्या क्रांतीचे साधन कारस्थाने, उत्पात नाहीत, तर संपर्क आणि समन्वय हे त्यांचे मार्ग आहेत. त्यांच्या क्रांतीची पहिली अट आहे : सामान्य जनजीवनाशी तादात्म्य आणि समरसता. तो आपले चार दाण्यांचे चतकोर अलग शिजवू इच्छित नाही. कुठल्या तरी सुरक्षित बंद मंत्रालयांतून किंवा आदर्श हस्तीदंती मनोऱ्यांतून भौतिक आणि सर्वंगामी क्रांतीचे संचालन मुळीच होऊ शकत नसते. क्रांती अखेर उत्क्रांतीचेच तीव्र रूप असते. जीवनातल्या समस्त सामान्य प्रेरणांना न नाकारता, नष्ट न करता त्यातील विकृती दूर करीत, समन्वय साधत आणि त्यांना अधिक उन्नत करीत पुढे जाणे हीच क्रमविकासाची दिशा राहिली आहे. ही विकासगती आता निश्चेतनेतून चेतनेच्या प्राणमय प्रदेशात शिरली आहे. सुप्त शक्तीसारखी जाणवणारी त्यांची कार्यशीलता आता स्वतःला ओळखायचा जागरुक प्रयत्न करू लागली आहे. ह्या क्रमविकासाकडे भान ठेवून, घटनांमागे दडलेल्या विविध सुप्त शक्तींना जाणत, सर्व बाह्य–संघर्षांतून वर उठवता येणे, शक्य आहे. आणि आपापल्या स्वाभाविक कर्मक्षेत्राला अभ्यासातून आणि आत्मविश्वासातून भरसक प्रयत्नाने टिपणे, गतिमान करणे शक्य आहे. हे ज्ञान आणि कर्मकौशल्य आता केवळ हातांच्या बोटांवर मोजता येणाऱ्यांची मिरासदारी राहिलेली नाही. ज्याला ते मिळवायचे असेल तो ज्ञान–कर्माच्या दाराशी जाऊन धडका देतो आहे.

अंतरिक्ष यानाचा चालक आपल्या आसनावर स्थिर आणि दृढ असतो. आपल्या प्रत्येक हालचालींचे परिणाम तो जाणत असतो. आपल्या समोरच्या असंख्य घटना मागे दडलेल्या तारांच्या प्रचंड गुंतागुंतीचे कार्य त्याला नेमके ठाऊक असते. नेमक्या क्षणी नेमकी हालचाल त्याच्याकडून अभ्यासपूर्ण रीतीने होत असते. क्षणार्धात महान निर्णय घेण्याची क्षमता अनायासेच त्याच्या अंगी बाणते; पण त्याच्याहून अधिक स्थिर असतो त्याचे अंतरिक्ष यान पृथ्वीवरून नियंत्रित करणारा वैज्ञानिक निर्देशक ! एका अंतरिक्ष यात्रिकाच्या साहस आणि यशामागे अगणित अनामिक तंत्रज्ञांचे परिश्रम आणि प्रतिभा एकवटलेली असतात. येथे कोण असतो नेता अन् कोण अनुयायी ? मानवाच्या जीवनाचे नियंत्रण करणारा तो अगाध परमेश्वर की अहोरात्र प्रामाणिकपणे यानाशी संबद्ध, आपापल्या कर्मात मग्न असणारे ते चालक ? एका महान घटनेत त्यांचे लघुत्व साऱ्या सीमा ओलांडून जाते ते ? नव नेतृत्वात नेता आणि त्याचे अनुयायी यांचे संबंध अशा प्रकारचे असतील. महान ध्येयाप्रती अशा अनामिक समर्पणाने तो जाईल. या समर्पणाने तो सहज-पणे, विनासायास नम्रभाव धारण करू शकेल. नम्रतेच्या पाठोपाठ, आपल्या सभोवती इच्छित परिणामांचा आविष्कार पाहू शकणारा आत्मविश्वास प्राप्त होतो. हा विश्वास कुणा पागल वा अर्धपागल हुकूमशहाचा संभ्रम नसतो. कारण येथे दरक्षणी सामना करायचा असतो वस्तुस्थितीशी आणि कठीणतर समस्यांशी. प्रक्षुब्ध न होता. त्याचे एक क्षितिज असते. एक लक्ष्मणरेषा—मर्यादाही असते. त्या रेषेत विशिष्ट काळापुरत्या त्याच्या सर्व प्रवृत्ती एकवटतील. काळाच्या आवाहनांच्या विकृत आकलनातून हुकूमशहाचा जन्म होत असतो. नव्या पिढीला हे लहान-मोठे, विविध प्रकारचे चांगलेवाईट मुखवटे धारण करणारे हुकूमशहा मंजूर नाहीत. आता म्युझियममध्ये ठेवण्या-लायक या गोष्टी आहेत. आणि त्यांच्या बेलगाम उधाणाचा तरुण पिढीला रागच आहे, हसूही येते आणि कीवही वाटते.

नवे नेतृत्व कसल्याही प्रकारे वर्तमानपत्रांतून गाजावाजा न करता असे चूपचाप वर येते आहे. वर्तमानपत्रांची सद्दी तर दुसऱ्या दिवशी रद्दीच्या टोपलीत जाते ! या रद्दीत भले आजच्या पिढीचे उत्पात असोत. देशव्यापी तुफान रोजच देशाला ग्रासत असो; पण लक्षात ठेवा की, तुफानातच पवनचक्क्या वेगाने फिरू लागतात ! समाज-जीवनातील या विविध पवनचक्क्या, विविध शक्तींची ही केंद्रे स्वनातीत वेगाने गती घेत आहेत. भले ही उसळती पिढी दिशाहीन, शून्यात्म्यांची भासत असो, पण एक दिवस तिला आपला प्रेषित आणि नेता जरूर लाभेल ! नवतंत्रांनी समृद्ध असलेले हे रचना-गर्भ युग दुष्प्रवृत्तीला मागे टाकील. जपान, जर्मनी यांच्या राखेतून आणि छोटचा इस्राएलच्या वाळूतून नव्या देशांची पुनर्रचना नव्या पिढीच्या नेतृत्वानेच तर करून दाखवली आहे. कदाचित त्यांच्या-हून अधिक उचित समयी आपण सुरुवात करीत असू. मला एक सचेतन विश्वास आहे की, या नव्या नेतृत्वाचा ' फिनिक्स ' सुद्धा तमाम विफलतांच्या राखेतून पुनश्च वर येत आहे. जगाला लव-करच त्यांच्या चोचीत लपलेली विद्युल्लता आणि पंखांतले तुफान दिसेल !

सोमनाथच्या जंगलात अखिल भारतीय श्रमसंस्कार छावण्या दर-वर्षी संपन्न होत आहेत. उदयाला येत असलेल्या या नव नेतृत्वाचा चेहरामोहरा त्यातूनही पहायला मिळाला आहे. बेचाळीसच्या नव नेतृत्वाची पिढी ' छोड़ो भारत ' या मंत्राने प्रेरित झाली होती. स्वातंत्र्योत्तर कालावधीत त्या या नव्या पिढीचा स्फूर्तिमंत्र आहे – ' जोडो भारत ' आणि त्याचे तंत्र आहे – नवरचना. पुनर्रचना. मालमत्तेचे विध्वंसन नव्हे. त्यांच्यात उलथापालथ करणे नव्हे. जादूच्या कांडीने नव्या वस्तू निर्माण करण्याची छू:मंतरगिरी नव्हे. तर साऱ्या योजनांना यथास्थान देणे. त्यांच्यात क्रमशीलता राखणे, एक परिपूर्ण आणि सर्वव्यापी योजनेच्या अंतर्गत नव्या समन्व-यांशी आणि संयोजनांशी त्यांचा अनुबंध जोडणे. हे त्या पुनर्रचनेचे तंत्र आहे.

# लोक-बिरादरी

मनाने, भावनेने आणि शरीराने अपंग झालेली म्हणून उपहास केली जाणारी ही पिढी. एकीकडे प्रकाश व आवाजापेक्षाही अधिक वेगाने अंतराळ व्यापून आश्चर्यापेक्षाही आश्चर्यजनक अशा रीतीने विज्ञान विजय मिळवते आहे. जगातल्या एका भागात हे चित्र, आणि आपली तरुण पिढी 'प्लास्टिक पिढी' म्हणून संबोधली जाते ! या प्लास्टिक पिढीच्या वाट्याला आपल्याकडे पुष्कळदा 'डोन्ट्स'च येतात. असुरक्षिततेच्या भावनेने त्यांना व्याकुळले आहे. एक प्रकारचा रितेपणा त्यांचे पंख उडण्यापूर्वीच ग्रासून राहिला आहे. अर्धनारीनटेश्वरासारखे हे आजचे चित्र ! आपल्याला कुणी ओळखावे, आपले कुणी ऐकून घ्यावे, आपलाही समावेश वर्तमानात केला जावा यासाठी या पिढीचा आकांत आहे. त्यांना अवकाश हवा आहे, झेप घ्यायला इंधन हवे आहे. दिलासा हवा आहे. जबाबदारीची ते मागणी करताहेत; पण 'स्व'विषयी संवेदनशील असलेली ही पिढी पाऱ्यासारखी निसटू पाहात आहे ! ती जुन्या पिढीचीच प्रतिबिंबे पाहात, अधिक 'लोकप्रिय' होण्याची स्वप्ने पाहात आपला रितेपणा भरून काढण्याचा प्रयत्न करते. हे पिढीतले परस्पर घटक परस्परांना आवडतात; हवे असतात; पण परस्परांना स्नेहरज्जूंनी गुंफायला त्यांनी शिकले पाहिजे. (दे लाइक ईच अदर, दे वाँट ईच अदर, बट दे मस्ट लव्ह ईच अदर). त्यांचा विफलतेचा आजार ठीक आहे, पण मग 'प्रिस्क्रिप्शन'

काय ? तर त्यांच्या जाणीवांच्या समभार रेषांना जुळेल असा कार्यक्रम त्यांना हवा आहे.

त्यांना क्षितिज न्याहाळता आले पाहिजे. अवतीभोवती पाहायला लाभले पाहिजे. प्रकाशाच्या सान्निध्यात त्यांना काही करता आले पाहिजे, आणि त्यातून त्यांनी काही उचलले पाहिजे. असा हा पाहण्याचा, करण्याचा आणि शिकण्याचा एक संयुक्त कार्यक्रम हवा. न खचणारी श्रद्धा आणि 'शॉर्ट सर्किट' न होणारी शक्ती हवी. मग भिववत्या रितेपणाची भीती त्यांना वाटणार नाही. रित्या दिवसांमध्ये हिमतीने असे काही करता आले पाहिजे, मायकेल अँजेलोसारखे म्हणता आले पाहिजे, "अरे संगमरवरी पत्थराची धूळ मी आज हुंगली नाही !"

स्वतःच्या जीवनाला आणि दुसऱ्याच्या जीवनाला आकार देता देता जी धूळ हुंगायला मिळते, त्या धुळीची मस्ती घेऊन वावरायचे असते. सोमनाथच्या कार्यक्रमाने ह्या धुळीची मस्ती 'प्लास्टिक पिढी'पर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला आहे.

जमीन लागवडीखाली आणण्यासाठी झाडझाडोरा निखंदावा लागतो. खोडे खोदावी लागतात. दगडगोटे उलथून, वेचून काढावे लागतात. तेव्हा कुठे साधी सपाटी दिसते. याला जमीन उठवणे, 'रिक्लेम' करणे म्हणतात. तसा 'ह्यूमन रिक्लमेशन'चा कार्यक्रम आजच्या पिढीला हवा आहे; पण घोषणांचे नुसते पेंढा भरलेले आचार-विचार त्यांना नको आहेत. स्वतःच विणलेल्या आणि केव्हाही झटकून टाकून नवा अर्थ शोधता येणाऱ्या 'वॉश अँड वेअर' विचारांच्या मागे लागलेली ही पिढी. जीवनातील अवबोधाचा, गूढतम गूढाचा शोध घेत वणवण हिंडण्याची घटका आता संपली आहे. जीवनातला नवा अर्थ अंकुरून आला आहे. मात्र अंतराला निरंतर करणारी ही पिढी अवकाश व्यापूनही रितीच राहिली आहे. ह्या पिढीचे स्वरूप हिमनगासारखे आहे.

समाजाने केवळ एक हिस्साच पाहिला आहे. मात्र उरलेला नऊ हिस्से भाग दडलेला आहे. उसळत्या लाटांवरून हे मात्र लक्षात येत नाही की तो समृद्ध आहे. भरल्या पोटीच्या विद्या 'पिठा' तून तत्त्वांचे गोळेच चघळायला शिकवणाऱ्यांना मात्र त्यांच्या उद्रेकाची व्यथा कळत नाही.

विज्ञानक्रांतीची रंगीत पताका घेऊन निघालेल्या ह्या पिढीलाही हे कळायला हवे की भावनांचा उद्रेक उकळत्या तेलासारखा असतो. सर्वत्र तो उपयोगी ठरत नाही. तेथे चित्रकारासारखी क्षमता हवी. मग नव्या चित्राची निर्मिती करता येते. त्याला हवे असते अविचल मन आणि सहृदय कृती. मग देवावाचूनही त्याला स्वतःला निर्मिती करता येते ! त्यांना हव्या असतात कार्यक्रमाच्या काही कातीव रेषा. त्या रेषांना स्वतःचा विस्तार हवा असतो आणि रंग हवे असतात. श्रेष्ठ चित्रकृतीचा रंग तकतकीत असतो. त्या रंगाला एक गंध जाणवतो. त्याला असतो एक श्वास ! तशी त्या कार्यक्रमाला प्राणमयता हवी असते. गांधीजींच्या कार्यक्रमांत ही खासीयत होती. क्रांतीला रेखाचित्रही लागते आणि चारित्र्याचीही जरूरी असते.

सोमनाथच्या उचंबळलेल्या, आसावलेल्या मातीतही अशा काही रेषा ह्या पिढीच्या हाती लागल्या आहेत. त्यांतून आकारते आहे आज आणि उद्याला दिलासा देणारे एक चित्र. ही त्या पिढीचीच स्वतःसाठी एक देन आहे; पण ह्या रेषांपलीकडेही माणसे जगत असतात. नव्या जगाची अंधुक चाहूल त्यांना लागलेली असते. पण आम्ही त्यांच्याकडे जात नाही आणि ते तुमच्या-आमच्यापर्यंत पोचू शकत नाहीत. आम्हाला जाणून घेण्यासाठी ते उत्सुक असतात. त्यांना उत्कंठा असते. आमच्याशी हितगुज करावेसे त्यांना वाटते. त्यांना आमचा संदेशही हवा असतो; पण त्या लांब-दूरच्या आदिमानवापर्यंत, त्याच्या वस्तीपर्यंत आम्ही जात नाही. जातो, तेही कधी केवळ 'पिकनिक' साठी, आणि सांस्कृतिकतेचा दंभ मिरवण्यासाठी, फोटो घ्यायला !

‘ प्लास्टिक ’ पिढीला कदाचित हे वाटेल शोभादर्शकांतल्या हरक्षणी वेगळा आकार घेणाऱ्या आकृत्यांसारखे ! एकीकडे रितेपण आणि दुसरीकडे चंद्रावरची कावड आणलेली याच पिढीने पाहिली आहे. आणि जमीन भुकेली आहे, याची जाणीवही तिचे मन भेदून गेली आहे. या पिढीला कार्यक्रमाच्या रेषा तर सापडल्या आहेतच... पण आजकाल संस्थांनाही मर्यादा पडतात. आर्थिक कुवत, कार्यकर्त्यांची उणीव भासत असते. त्यामुळे एक कंटाळवाणा ‘ टोन ’ साऱ्याच समाजकार्याला येऊन जातो. एक मळभलेला जडपणा दबून असतो. हे साकळलेपण दूर करण्यासाठी, नव्या कल्पना दूरवर रुजवण्यासाठी दूरच्यांपर्यंत जायला हवे असते. एका दिव्याचा उजेड दूरवर ‘ फोकस ’ करायची गरज आहे. या पिढीने असे काही ‘ सेल ’ जागजागी निर्माण करायला हवे आहेत. दुहेरी संवाद निर्माण करण्यासाठी एक ‘ सर्किट ’ जोडायचे आहे. प्रगतीच्या कल्पनांचे बियाणे घेऊन अज्ञाताच्या भूमीवर जायचे आहे. आपल्या आवाजाचा प्रतिध्वनी शोधण्यासाठी, मित्र मिळवण्यासाठी म्हणून त्यांनी बाहेर हिंडायचे आहे. सोमनाथच्या कार्यक्रमांच्या रेषांत हीही एक रेषा आहे– दोन टोके सांधणारी. तिचे नाव आहे **लोक–बिरादरी !** (पीपल्स मोबाइल इन्स्टिटयूट).

सुरुवातीला असे करता येईल : पाच पाच दिवसांचा कार्यक्रम असेल. असेल दिमतीला एखादी जीप किंवा स्टेशनवॅगन. त्यात सारी बेगमी राहील. आणि त्यात असामीही पाच असतील. सोमवार ते शुक्रवार ह्या पाच दिवसांच्या अवधीत हे तरुण सुदूर खेड्यात जंगलात वस्तीला जातील. आपल्या अनुभवांची, कल्पनांची, प्रयोगांची हकीकत ते या लोकांना सांगतील. पाचांतला प्रत्येक जण वेगवेगळ्या अनुभवांनी, संकल्पनांनी तुडुंब असेल. आपले धन तो त्यांच्यापाशी लुटवून देईल. या तुकडीत एखादा वैद्यशास्त्राचा विद्यार्थी असेल वा पारंगत पदवीधर असेल, तर तो त्यांच्या आरोग्याचा सहानुभूतीने विचार करण्याचा प्रयत्न करील. पाहणी करील. काही औषधांची मदत करील. उपयोजनांची

माहिती देईल. एखादा साहित्यप्रेमी त्यांच्या लोककथा, प्रेमगीते गोळा करील. त्यांचे शब्द जाणून घेण्याचा प्रयत्न करील. कुणी एखादा वादक असला तर त्यांना रिझवील. एखादा शेतकीतज्ज्ञ असला तर शेतीच्या नव्या प्रयोगांशी त्यांचे नाते जोडून देईल. दाट रानातली वस्ती असेल तर त्या लोकांना जंगलसंरक्षणाची कल्पना नव्या रूपात देता येईल. जमिनीची धूप थांबवण्यासाठी आवश्यक असलेले उपाय त्यांना शिकवता येतील. खते, पोल्ट्री इत्यादींचीही माहिती त्यांना आधुनिक तंत्राच्या साहाय्याने देता येणे शक्य आहे.

हा कार्यक्रम प्रचारकी अथवा रूक्ष मुळीच असू शकणार नाही. साचेबंद असे याचे स्वरूप राहणार नाही. हे पाच तरुण त्यांच्यांत राहतील. त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्याकडूनच त्यांना काही शिकायला मिळेल अनेकदा ! त्यांच्यातला एखादा उमदा मुलगा जमलेच तर सोमनाथला येऊन प्रकल्पात अनेक गोष्टींचे ज्ञान, अनुभव गाठीला घेऊन जाईल. त्याला प्रशिक्षणाची संधी देता येईल. या कार्यक्रमांत तज्ज्ञांनासुद्धा सहभागी होता येईल. आपले विशिष्ट ज्ञान या सुदूरांपर्यंत त्यांना पोचवता येईल. नव्याशी त्यांची ओळख करून देता येईल. तज्ज्ञांच्या दृष्टीने त्यांनाही थोडा ‘ हवापालट. ’ प्रत्येक फेरीत वेगळा ‘ ग्रुप ’ असेल आणि ठिकाणही नवे असेल. एक एक दाणा पेरत पुढे जावे तसे हे काम सुरू राहील. नव्या ताजेपणाने, नव्या ठिकाणी, नवे अनुभव घेता येतील. या कार्यक्रमात कंटाळवाणा एकसूर राहणार नाही. हे एक ऋतुचक्रच असेल.

पाच दिवसांच्या ‘ लोक-बिरदारी संस्थे’चे स्वरूप थोडक्यात हे असे आहे.

संधिप्रकाशाच्या छायेत उभी असलेली एखादी आकृती आपण पाहू शकतो, ती नेमकी ओळखता येत नाही. तसे ‘ खूप करावेसे वाटते;

पण काय करू हे कळत नाही ' अशी तळमळणारी माणसे खूप असतात. आपणच स्वतःला संधिप्रकाशात हुडकण्याचा तो प्रयत्न असतो. आपला चेहरा मात्र ओळखू येत नाही ! अशांसाठी ही लोक-बिरदरी नवा चेहरा प्राप्त करून देणारी असेल. येथे कुणी कुणाचे दबेल नसेल. प्रत्येकाला वाव राहील. ' इनिशिएटिव ' प्रत्येकाला घेता येईल. पाच दिवस त्यांच्या कामाशी स्वतःचीच स्पर्धा असेल. प्रशिक्षणाचे हे एक विस्तृत क्षेत्र आहे. आधुनिकतेची दीक्षा देण्यासाठी आणि घेण्यासाठी हे आवाहन आहे.

ही काही खास नवी कल्पना अथवा जादूगाराच्या पोतडीतली ' चीज ' नाही. मिशनऱ्यांनी हे केलेले आहे. कुणी एखादा एकांडा शिलेदारही आपल्या परीने हे करत असेल. दोन जगांतील संवाद साधण्याचा आणि त्यांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. वैफल्याची वाकळ पांघरलेल्याला आपलाच नवा चेहरा या कार्यक्रमात सापडेल. वैफल्याने मृत्यूशी संवाद करू पाहणारा जीवनाच्या नव्या संवादात मग्न होऊन जाईल. हताश पिढीला हा तजेल्याचा अनुभव, दृष्टी आणि कृती यांचे संधान जमवायला प्रेरक ठरेल. आपल्या व्यक्तिमत्वाचा अनोखा ठसा समाजक्षेत्रावर उमटवण्यासाठी—जन्मखुणेसारखा अमीट ठसा—या योजनेचा उपयोग होऊ शकेल.

सकृद्दर्शनी ज्यांना कुणाला हे फालतू वाटावे अशांनाही यातून नवा अर्थ सापडेल. या लोक-बिरादरीतून आत्मविश्वासाचे कण जोपासता येतील. हा रचनात्मक प्रयत्न आहे. यात समर्पणाची चव आहे. ज्यांना कुणाला आपले आयुष्य देता येत नाही; पण काही करायची तळमळ आहे त्यांना यात सूर सापडेल.

कित्येकदा समाजकार्य फुलदाणीतल्या प्लास्टिकच्या फुलांसारखे होऊन जाते ! त्या फुलदाणीत निसर्गाची ताजी टवटवीत फुलेच राहावीत, ती प्राणमय राहावी याचा अनुभव ही लोक—बिरादरी

देईल. ‘ मी देशावर प्रेम करतो ’ अशी कागदावरची प्रतिज्ञा वाचण्याऐवजी त्याला सांगता येईल : ‘ मी देशावर प्रेम केले ! ’ नशीब हे एखाद्या मोठ्या भोपळ्यासारखे असते. ते सहज फोडता येणे शक्य आहे; ‘ आम्हाला संधीच मिळाली नाही ’ म्हणून निराश व्हायची गरज नाही. या कार्यक्रमातून अंतर्मुख होऊन पाहायला शिकवणारा ‘ राष्ट्रीय छंद ’ निर्माण होईल.

समाजाला धरणीकंपासारखे धक्के देणारे काम कुठे आहे, ही ‘ एपीसेंटर्स ’ कुठे आहेत, ते नेमके या लोक-बिरादरीच्या कामातून ओळखता येईल. ‘ मी कोण आहे, काय आहे, कुठे आहे ? ’ अशांसारख्या संमिश्र अंतर्ध्वनीचाही लोक-बिरादरीत कानोसा घेता येईल. आणि तरुणाला संधी आहे—अधिक मोकळेपणी निरीक्षण करण्याची, अनुभव घेण्याची, समाजजीवन वाचण्याची, अधिक समजावून घेण्याची, अधिक पाहण्याची. ही सौंदर्यप्रसाधनेसारखी समाजसेवा नाही. सत्याला स्वप्नाचेही स्वप्न बनवण्यासाठी सामावून घेणारी ही वास्तवता आहे. मध्येच निखळल्यासारखे झालेल्या तरुणांना येथे सांगता येईल : ‘ आम्ही आहोत एकमेकांना, ‘ नेत्या ’ ची आम्हाला गरज नाही ! ’ गोष्टीच्या पुस्तकातली ही क्रांती नसेल. एक वास्तविक अनुभव मात्र. फुटलेल्या आरशात आपल्या प्रतिमेच्या चिरफळ्या झालेल्या पाहून आणि ते हेंगाडे भाव पाहून भिऊन गेलेल्या तरुणाला संथ जलाशयात, आपले नितळ प्रतिबिंब पाहण्याची, त्याचा ठाव घेण्याची ही संधी आहे. यातून उद्याकडे स्वच्छ नजरेने पाहणारा आणि स्वप्नांना वास्तवाचा आकार देणारा तरुण निर्माण होईल.

घनदाट अंधारातले हे काही प्रकाशाचे ठिपके आहेत याची जाणीव आहे. मात्र प्रश्नाचा उद्रेक करण्यापूर्वी, स्फोट करण्यापूर्वी आपण कल्पनेलाच जरा घासून पुसून पाहू या.

# हृदयात कोंडलेले वादळ

आठवणीच्या तीव्र वेदनेच्या कुशीतून हा क्षण हुंकारत सुटला आहे. साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांमधील विरामचिन्हे कधीच गळावयास हवी होती. साने गुरुजींच्या ओल्या पापणीत नवसमाजाची स्वप्ने साकार करणारी कशी धुंदी खेळत होती ! तिच्याशी इमान राखणारी सेना सर्वत्र सहयोग देत सुटली पाहिजे. पंख तुटलेल्या पक्ष्याची दीन, उदास अवस्था माझ्याने पाहवत नाही. राष्ट्रावरील संकटाच्या कातरवेळेला तिच्या लेकरांनी काहीतरी भव्यदिव्य, मृत्यूच्या कमळात मिटण्याआधी करावयास हवे.

निमित्तांचे अनेक दरवाजे उघडले गेले आहेत. ते बंदही असेच अचानक होतील. दुःखाच्या पाऊलखुणा आसवांनी पुसण्याची वेळ निघून गेली. त्या पाऊलखुणा वांझ हुरहुरीने किंवा निर्जीविता कवटाळणाऱ्या राजकीय पक्ष्यांच्या गुबगुबीत पिसाऱ्याने पुसून टाकता येणार नाहीत. दुःखाची पदचिन्हे पिसाऱ्याने पुसून टाकायची असतात, आसवांनी नव्हेत. राजकीय पक्षांच्या डोळ्यांना मोर्तब असते सत्तेच्या वृक्षावर घाईत बसवणाऱ्यांच्या आंधळेपणाचे. साने गुरुजींच्या डोळ्यांना मोर्तब होते प्रेमाचे.

जातीयतेच्या चिघळणाऱ्या जखमा, भाषेच्या वादाचे व्रण, विषमतेमुळे निर्जीव झालेले आम जनतेचे जीवन, जीवनाच्या अंगाअंगातून

बाहेर पडणारे पिसाळलेले दुःख, संवेदनेचा शर हरवून बसलेला सत्ताधारी पक्ष, योजनाकारांच्या मनाच्या अवकाशामधली मनोरथांची आतषबाजी, निष्क्रियतेच्या आडोशाआड दडून बसलेले सार्वजनिक जीवन, दुखावलेले अहंकार, शेतकऱ्यांच्या सुगीकडे पाहून लसलसणारे बुभुक्षित जबडे, चिवचिव करणारी मध्यमवर्गाची हलाखी,...कारखान्याच्या धूर ओकणाऱ्या चिमण्या, आपल्या देशाच्या सार्वजनिक जीवनाला लागलेली ही घरघराट, यंत्राची ही घरघर फार दिवस चालू देणार नाही...

मृत्यूच्या तळाचाही ठाव घेऊन परत येणारे सगरपुत्र आता हवे आहेत. जीवनाचा रोज निरोप घेऊन आन्हिक करणारे तपस्वी हवे आहेत. आपल्या जाळ्यात तुफान पकडू शकणारे वाल्या कोळी आता हवे आहेत. आपल्या भुजांत ज्याने आक्रोश करणारे वादळ पकडण्याचा यत्न चालवलेला आहे, त्या एका धडपडणाऱ्या मुलाचे हे उसासे आहेत. हे का तरुणांना जाणवणार नाहीत ?

आपण धडपडणारी साने गुरुजींची मुले. आपल्या शक्तीचा कमाल वापर करीत आहोतसे वाटत नाही. आजच्या तरुणांशी आपला कुठे आहे संबंध ! आजचे तरुण म्हणजे जणू संवेदनाहीन असा गोठलेल्या मासाचा गोळा वाटतो अनेकांना. ज्या विचाराचा, तत्त्वज्ञानाचा, चळवळीचा तरुणवर्गाशी संबंध तुटला त्याची आयुमर्यादा फार फारतर दोन-अडीच तपे ! पण याचे आपल्याला हवे तेवढे भान नाही. माझा आक्रोश तरुणांच्या हृदयाला भिडतो, नाही असे नाही; पण कुठलेही आश्वासन त्यांच्याकडून मला मिळत नाही. भव्यदिव्य गोष्टींची वाचिक चर्चा मला सुखवीत नाही. ती भव्यदिव्यता आपल्या बाहूंत पकडून साकार करण्याची हिंमत बाळगणारे तरुण मला दिसले पाहिजेत. आजच्या तरुणांना अभिमंत्रित करू शकेल असे आपण त्यांना काही दाखवले पाहिजे.

दरेक श्वासागणिक माझ्या आत्मविश्वासाची तीव्र स्पंदने प्रक्षेपित

होत आहेत. माझे अश्रू न कळत माझ्या डोळयांतून पाझरत आहेत. भारताच्या यौवनाच्या आजच्या अवस्थेमुळे सभा–व्याख्यानांचा मला उबग आला आहे आणि उथळ समाजशास्त्र चर्चेला मी विटलो आहे. न गवसणारी परंतु भूल घालणारी दृष्टी माझ्यापाशी नाही. माझ्या हृदयात कोंडलेले वादळ इशारा देत आहे : जे साध्य झाले त्याला कुरवाळीत जे अद्याप साधायचे आहे त्याची मी उपेक्षा करू शकत नाही.

समाजवादी मित्रांनाही एक इशारा : बाबांनो, घर्षणातून उत्पन्न होणारी उष्णता ही निर्मितिक्षम असतेच असे नाही, पुष्कळदा ती वायाच जाते. परिस्थितीचे सम्यक् विवेचन ध्येयाने झपाटलेले कार्यकर्ते निर्माण करू शकत नाही. उद्याच्या प्रश्नांनी आज चिंताग्रस्त झालो तरी तेवढयाने ते प्रश्न निकालात निघू शकत नाहीत. उद्याच्या नवभारताच्या निर्मितीचे आराखडे माझ्या सहकाऱ्यांनी इथे रक्ताने आणि घामाने काढलेले आहेत. हे आराखडे म्हणजे नुसती उद्याची चिंता नव्हे तर उद्याचा इसार आहे.

# ‘ऑपरेशन पॉसिबल’

तरुणांशी बोलायचे तर तीन गोष्टी सांगता येतील. त्यांना काय सांगायचे, कसे सांगायचे, आणि ते कुणाला सांगायचे आहे. संवादाच्या या तीन प्रक्रिया. जे सांगायचे त्यालाही एक आयाम आहे. त्याचे स्वरूप पुरेसे स्पष्ट आणि विस्तृत पाहिजे. ते धीटपणे आणि मोठ्याने सांगायला हवे. संवादाची ही रीत. लेनिन, हिटलर, स्टॅलिन, माओ यांनी ती वापरली, म्हणून बिचकायचे कारण नाही. लोकशाहीवादी राष्ट्रांनासुद्धा प्रचारतंत्राची ही मेख वापरावीच लागते. त्याचे स्वरूप तुषारांतून जाऊन त्याचेच अंतरंग प्रस्फुटित करणाऱ्या किरणासारखे असते.

काय सांगायचे आहे ? राष्ट्र आणि तरुण यांनी, स्वतःची परीक्षा पाहाण्याचा किंवा स्वतःची पारख करवून घेण्याइतका धीर सतत ठेवला पाहिजे. हे विश्लेषण स्वतः करण्याची कुवत असली तर ठीक, नाही तर प्रयोगशाळेतल्यासारखे प्रक्रिया करून घ्यायला तयार असले पाहिजे. संकटांना, अडचणींना त्याने मॅग्नेटसारखे खेचून घ्यायची तयारी ठेवायला हवी.

कसे सांगायचे ? हेतू अथवा उद्दिष्टे यांचे अतिशय स्वच्छ, स्पष्ट शब्दांत सरळपणे दिग्दर्शन हवे. स्वप्निल धूसरता नको. आशय चटपटीत, नेमका आणि तोलूनमापून हवा. धडपडीच्या उद्दिष्टाचा

गाभा 'अपील' झाला म्हणजे तल्लखपणे त्याचे पैलू अवगत होतील. आशयाबद्दल आणखी थोडेसे : तो जोशपूर्ण आणि प्रवाही हवा. मायकेल अँजेलोसारखा एखादा शिल्पकार ओबडधोबड दगडातून आकृती पाहू शकतो. तो दगड त्याच्या प्रत्येक कंगोऱ्यासह तो जाणून घेतो. तसा आशय कण-कण जाणवणारा आणि जागवणारा. तो मिळमिळीत असण्याऐवजी 'टफ' हवा. आव्हान देणारा.

एकदा अपेक्षित हेतूचे त्यांना नीट भान झाले म्हणजे एकाकी मनसुद्धा संघर्षाला सामोरे जायला उत्सुक असते. त्यात असते खात्रीचे आश्वासन आणि खंबीरपणाचा आनंद. डंकर्कच्या वेळी चर्चिलने हेच केले. वाळवंटातून हिरवी स्वप्ने पालवताना इस्राएलला गवसली ती अशीच प्रतिमा. क्यूबा राष्ट्र उभे केले कॅस्ट्रोने ते अशाच प्रतिमेतून. वास्तवाचे भान असले म्हणजे माळरानावरच्या शिळाही जागवता येतात. जखमांचीसुद्धा आरास मांडता येते. वेदनेचे समान धागे गुंफत.

हे कुणाला सांगायचे ? तरुणाईला. युवाशक्तीला. ती निरनिराळ्या रूपांत असते. कधी वैफल्याने ग्रासलेली, निराशेच्या धुक्यात चाचपडत असते. प्रत्येकालाच विरोध करणारी. आम्हीही कोणी तरी आहोत हे सांगणारी. मग काचा फुटतात, बसेस जळतात. अधुऱ्या आशा-आकांक्षांनी ही वणवण तरुणाईच्या नशिबी आलेली असते. तिची प्रक्रिया विघटन करणारी, स्फोटक असते. अहिंसेचे नारे लावणारेही त्यात असतात. पडद्याआड पलिते असतात. त्यांना धुंदी चढलेली असते : नव्या व्यवस्थेची. पण कायदा मात्र ते नाकरतात. समाजाच्या वेगवेगळ्या प्रवृत्तींवर हे तरूण तिरस्काराचे लोळ टाकत उठतात.

ज्यांच्याशी संवाद साधायचा, त्यांची ही अवस्था आहे. समाजातली जुनी पिढी कधी याची दखल घेते. विरोध करते. चुचकारते. कधी समजून घेते, तर कधी नव्याबरोबर तीही वाहवत जाते ! एकाच

झेंड्यासाठी प्राणाची बाजी लावणारे आणि त्याच रंगाचे टॉयलेट-पेपर वापरणारे हिप्पींही एकाच राष्ट्राचे असतात !

बदलाबरोबर वाहत जाणे, त्याचा अनुनय करणे किंवा तो बदल निपटून काढणे ह्या क्रिया-प्रतिक्रिया प्रत्येक पिढीत असतात. प्रत्येक राष्ट्रात, प्रत्येक समाजात, एवढेच नव्हे तर प्रत्येक माणसात प्रेरणांचा संघर्ष हा नित्य चालूच असतो. किंकर्तव्य झालेला अर्जुन किंवा हॅम्लेट प्रत्येक मनात वावरत असतो. कधी नवी मूल्ये पटतात, पण व्यवहारात भीड मोडत नाही म्हणून एखाद्या धडाडीच्या संघटनेचा युवकनेताही हुंडा घेत असतो ! जुन्याच मूल्यांच्या प्रलोभनात, धाकात नव्याचा शोध घेताना तो गुरफटला जातो. हा संघर्ष आदिमानवापासूनचा आणि अगदी हाडाच्या गाभ्यापर्यंत इतका रुजलेला असतो की तो नाकारता येत नाही.

क्रांतीची निकड या तरुणाईला कळते, पण नुसत्या घोषणांमधून ती प्रकट होते. करायला कोणी पुढे जात नसते. कोणी नुसतेच क्रांतीच्या ध्यासाने झपाटलेले असतात. त्यांची आकांक्षाही विफलतेपोटीची असू शकते. पण त्यांची चेतना रुद्रशक्तीसारखी असते. तिला हवे असते नेमके नेतृत्व. वल्गना करणारे पहिल्या प्रकारातले असतात. ते निर्माण करतात फक्त ' मिकी माउस 'सारखे विनोदी प्रकार ! जगातले युवक त्यांच्या नादी लागत नाहीत. ते रुद्रशक्तीला आकर्षून घेण्याचा प्रयत्न करतात. पेरू देशात भूकंपाचा हाहा:कार उडाला. सहानुभूतीचे हजारो हात सरसावले. मिसेस निक्सननी देणग्यांचा, भेटींचा पाऊस पाडला ! पण कॅस्ट्रो–? जखमी होऊन कण्हत पडणाऱ्यांसाठी मजजवळ देण्यासारखे हे आहे–असे म्हणत त्याच्या पिंटभर रक्ताची शिशी पेरूला गेली ! मिसेस निक्सनच्या देणग्यांनी विमाने तुडुंब भरलेली. आणि ही एकच शिशी–पिंटभर रक्ताची ! डोंगरभर देणग्यांचा सारा परिणाम धुऊन निघाला ! ! बेचिराख राष्ट्राचा धूर चर्चिलनेही उघड्या डोळ्यांनी पाहिला होता. तो आपल्या पाइपातून पार फुंकून टाकला ! असे पाइप

मोकळ नसतात. संकटांचा अंगार ते एका क्षणात उडवून लावतात. याउलट अवास्तवाच्या नादी लागणाऱ्यांना हवी असते कस्तुरीचा वास येणारी सुगंधित क्रांती ! ती फुलपाखरासारखी अल्लादपंखी असते. समाजाची शक्ती ते जागवू शकत नाहीत.

संवादाच्या, तरुणाईशी 'ॲप्रोच' करण्याच्या ह्या तीन तऱ्हा. त्यांचा उपयोग समाजाच्या निरनिराळ्या प्रवृत्ती करून घेतात. डावेउजवे पंथ आपल्याला हवे तसे हे तंत्र राबवून घेतात. तरुणाईचा राग शिगेला पोचवायचा, कुर्बानीची नशा धर्माच्या नावाखाली चढवायची, आणि डिटोनेटरसारखे दुरूनच स्फोट घडावायचे! आपल्याच माणसाला पाण्यात पाहायचे नाही, अशी शिकवण देता देता कुणी पाहत असतात एकमेकांचीच प्रतिबिंबे !

आजच्या अणुयुगात ही तरुणाई जागवताना दोन पर्यायांचे भान ठेवायला हवे. विज्ञान किंवा विनाश ! दोन्ही एकाच वेळी स्वीकारता येणार नाहीत. विज्ञान स्वीकारा अथवा विनाश अटळ आहे. मग काहीच शिल्लक राहणार नाही. ओझोन गॅसला 'पंच' करून त्यातून अल्ट्रा व्हायोलेट किरणांचे थवेच्या थवे सैन्यावर, लोकांवर अशा अदृश्य रीतीने टाकण्याचे तंत्र तंत्रज्ञांनी शोधून काढले आहे की, लोकांना कळणारही नाही आपण कसे भस्म झालो ! तंत्रज्ञानाच्या व्यापारी स्पर्धेने घेतलेले हे विघातक वळण आहे. विज्ञान जागतिक सहकार्याचा विषय झाले आहे; पण तंत्राला व्यावहारिक चढाओढीने ग्रासले आहे ! हे दुष्टचक्र आहे. अशा वातावरणात तरुणाई हाताळायची आहे. गांधी, लेनिन, मार्क्स, मार्टिन ल्यूथर, साने गुरुजी हे केवळ दीपस्तंभासारखे. खडकावर जहाज आदळू नये एवढेच त्यांचे दिग्दर्शन. पण वल्हे मारण्याची, खडक टाळण्याची ताकद नाविकांतच हवी.

लोकांच्या नावाने पक्षाचा खेळ खेळणारे, धर्माच्या नावाखाली सुरुंग लावणारे, 'बहुजन हिताय'चा नारा लावणारे महाभाग–

यांच्या जल्लोषात बलिदानाचा आवेश असतो, पण त्यांच्याकडून काहीच होत नसते ! अशा वेळी माओ, कॅस्ट्रोसारखा एखादा नेता येतो. ' मी आश्वासन देत नाही. मी करतो. ' असे तो म्हणतो; आणि मग तरुणाई झपाटल्यासारखी त्याची पावले धुंडत जाते ! ज्योतीवर झडप घालायला निघणाऱ्या पतंगासारखी. त्या आवेगाकडे शासन डोळेझाक करू शकत नाही. पण तो लोट आवरायला सरकारी बडगा कुचकामी ठरत असतो ! पण अशी अवस्था येते तेव्हा लोक जीवे बचावतात नि घर मात्र शाबूत राहिलेले नसते ! क्रांतिकारकांनी आपल्या घरांवरून नांगर फिरवलेला असतो !

हिटलर, स्टॅलिन, माओ यांना हेच भोवले. स्टॅलिनच्या बरगड्यांना थडग्यातही त्यामुळे शांती मिळाली नाही. नीत्शे, मार्क्स यांचीही तीच गत. कधी कधी त्यांचे नाव उच्चारायलाही नंतरच्या पिढ्यांना मज्जाव होतो !

' तुम्ही जग बदलले नाही, खरे ना ? ' असा प्रश्न लिओ द लास्ट नावाचे पात्र विचारते. सतलज लाल झाल्यानंतरही भिवंडी लाल होत असते. शांतिनिकेतनच्या परिसरात बॉम्बचे धूर निघतात. साबरमती आश्रमाच्या भोवती आगडोंब उसळतो. आपणही संतांना, नेत्यांना विचारतो : 'तुम्ही खरेच बदलले जग ?' पण संधिसाधू राजकारण लिओला उत्तर देऊ शकत नाही. समाजवादाला ' कॉस्मेटिक टच ' देऊन, साजरेपण चढवून तो प्रश्न तसाच राहतो. त्यांनी रस्त्याचीसुद्धा दखल घेतलेली नसते. एखादा संत कबुली देतो, जगच काय पण वाटदेखील मी सुधारली नाही ! त्या कबुलीमागेही तो रेखाटत असतो स्वतःभोवती आशावादी वलय. तुष्ट होऊन.

पण या सगळ्या अडचणी असल्या तरी देश आपल्या समस्या स्वतःच सोडवत असतो आपल्या परिसीमेत. त्यासाठी सांस्कृतिक क्रांती आयात करायची गरज नसते. आव्हानावर आव्हाने झेलीत इच्छा-

पोकळ नसतात. संकटांचा अंगार ते एका क्षणात उडवून लावतात. याउलट अवास्तवाच्या नादी लागणाऱ्यांना हवी असते कस्तुरीचा वास येणारी सुगंधित क्रांती ! ती फुलपाखरासारखी अल्लादपंखी असते. समाजाची शक्ती ते जागवू शकत नाहीत.

संवादाच्या, तरुणाईशी 'ॲप्रोच' करण्याच्या ह्या तीन तऱ्हा. त्यांचा उपयोग समाजाच्या निरनिराळ्या प्रवृत्ती करून घेतात. डावेउजवे पंथ आपल्याला हवे तसे हे तंत्र राबवून घेतात. तरुणाईचा राग शिगेला पोचवायचा, कुर्बानीची नशा धर्माच्या नावाखाली चढवायची, आणि डिटोनेटरसारखे दुरूनच स्फोट घडावायचे! आपल्याच माणसाला पाण्यात पाहायचे नाही, अशी शिकवण देता देता कुणी पाहत असतात एकमेकांचीच प्रतिबिंबे !

आजच्या अणुयुगात ही तरुणाई जागवताना दोन पर्यायांचे भान ठेवायला हवे. विज्ञान किंवा विनाश ! दोन्ही एकाच वेळी स्वीकारता येणार नाहीत. विज्ञान स्वीकारा अथवा विनाश अटळ आहे. मग काहीच शिल्लक राहणार नाही. ओझोन गॅसला 'पंच' करून त्यातून अल्ट्रा व्हायोलेट किरणांचे थवेच्या थवे सैन्यावर, लोकांवर अशा अदृश्य रीतीने टाकण्याचे तंत्र तंत्रज्ञांनी शोधून काढले आहे की, लोकांना कळणारही नाही आपण कसे भस्म झालो ! तंत्रज्ञानाच्या व्यापारी स्पर्धेने घेतलेले हे विघातक वळण आहे. विज्ञान जागतिक सहकार्याचा विषय झाले आहे; पण तंत्राला व्यावहारिक चढाओढीने ग्रासले आहे ! हे दुष्टचक्र आहे. अशा वातावरणात तरुणाई हाताळायची आहे. गांधी, लेनिन, मार्क्स, मार्टिन ल्यूथर, साने गुरुजी हे केवळ दीपस्तंभासारखे. खडकावर जहाज आदळू नये एवढेच त्यांचे दिग्दर्शन. पण वल्हे मारण्याची, खडक टाळण्याची ताकद नाविकांतच हवी.

लोकांच्या नावाने पक्षाचा खेळ खेळणारे, धर्माच्या नावाखाली सुरुंग लावणारे, 'बहुजन हिताय'चा नारा लावणारे महाभाग–

यांच्या जल्लोषात बलिदानाचा आवेश असतो, पण त्यांच्याकडून काहीच होत नसते ! अशा वेळी माओ, कॅस्ट्रोसारखा एखादा नेता येतो. ' मी आश्वासन देत नाही. मी करतो. ' असे तो म्हणतो; आणि मग तरुणाई झपाटल्यासारखी त्याची पावले धुंडत जाते ! ज्योतीवर झडप घालायला निघणाऱ्या पतंगासारखी. त्या आवेगाकडे शासन डोळेझाक करू शकत नाही. पण तो लोट आवरायला सरकारी बडगा कुचकामी ठरत असतो ! पण अशी अवस्था येते तेव्हा लोक जीवे बचावतात नि घर मात्र शाबूत राहिलेले नसते ! क्रांतिकारकांनी आपल्या घरांवरून नांगर फिरवलेला असतो !

हिटलर, स्टॅलिन, माओ यांना हेच भोवले. स्टॅलिनच्या बरगड्यांना थडग्यातही त्यामुळे शांती मिळाली नाही. नीत्शे, मार्क्स यांचीही तीच गत. कधी कधी त्यांचे नाव उच्चारायलाही नंतरच्या पिढ्यांना मज्जाव होतो !

' तुम्ही जग बदलले नाही, खरे ना ? ' असा प्रश्न लिओ द लास्ट नावाचे पात्र विचारते. सतलज लाल झाल्यानंतरही भिवंडी लाल होत असते. शांतिनिकेतनच्या परिसरात बॉम्बचे धूर निघतात. साबरमती आश्रमाच्या भोवती आगडोंब उसळतो. आपणही संतांना, नेत्यांना विचारतो : 'तुम्ही खरेच बदलले जग ?' पण संधिसाधू राजकारण लिओला उत्तर देऊ शकत नाही. समाजवादाला ' कॉस्मेटिक टच ' देऊन, साजरेपण चढवून तो प्रश्न तसाच राहतो. त्यांनी रस्त्याचीसुद्धा दखल घेतलेली नसते. एखादा संत कबुली देतो, जगच काय पण वाटदेखील मी सुधारली नाही ! त्या कबुलीमागेही तो रेखाटत असतो स्वत:भोवती आशावादी वलय. तुष्ट होऊन.

पण या सगळ्या अडचणी असल्या तरी देश आपल्या समस्या स्वत:च सोडवत असतो आपल्या परिसीमेत. त्यासाठी सांस्कृतिक क्रांती आयात करायची गरज नसते. आव्हानावर आव्हाने झेलीत इच्छा-

शक्तीच्या किमयेवर तरुणांच्या अस्तन्या वर चढतील आणि साद मिळेल : तुम्ही माझ्यासाठी ते करू शकाल ?

शर्त फक्त एकच असेल : आपल्या हृदयाशी कवटाळलेल्या मूल्यांशी इमान राखा !

नुसते नारे लावून त्या आव्हानाने हरखता येणार नाही. गाडलेल्या प्रस्थापिताला ठोकरून लावा. नव्याची आस धरा. वेगाने पुढे व्हा. आणि मोडीत निघणारे जगही तुमच्या मागे येईल ! असे केले तरच जीवनाला सामोरे जाण्याचे, ते पाहण्याचे ' राष्ट्रीय गवाक्ष ' तरुणाईला शोधता येईल.

भग्नावशेषांना कवटाळून बसत उसासे टाकणाऱ्यांना सवाल आहे : या तरुणाईला संघर्षाचे वाण द्या—ती ते हाताळू शकते खंबीरपणे. कर्तव्य द्या—ती ते पार पाडू शकते.

याला प्रस्थापिताकडून, हाडीमासी सुस्त परंपरा रुजलेल्यांकडून उत्तर मिळत नसते. म्हणून आक्रोश करत तत्त्वज्ञ मरतात !

तरुणाई कुणाला म्हणायचे : वैफल्यग्रस्त संघर्षाचा नेमका सूर पकडून जी त्याच्याशी समतान होते; बुद्धीला चेतना देते तिला. त्या चेतनेने संघर्षाशी सूर मिसळताना धुंदी चढवते तिचे नाव तरुणाई. (यूथ पॉवर इज दॅट वुइच हार्मोनाइझेस केऑस, इन्टॉक्सिकेटस् रीझन). करता येणे शक्य आहे, ते केलेच पाहिजे, हा युवामंत्र बनला पाहिजे. जुने नेतृत्व वर्तमानातून हद्दपार होत आहे, ते तरुणाईच्या व्यथेवर उतारा देणार नाही. परमेश्वराला भावना नाही, तो बहिरा-मुका आहे असे समजून त्याचे पुनर्वसन करण्याचा नीत्शेसारखे धोशा लावतात. परमेश्वराला दुःख, वेदना उमजत असतील वा नसतील, पण माणसाला त्या कशा सहन होणार ? माणसाला त्यावाचून गती नाही, हा स्वाभाविक तर्क आहे. त्याची

अनुभूती तरी माणसाला घेता येईल की नाही ? माणूसच त्याला समर्थ आहे. परमेश्वराची पूजा करा वा त्याचे अस्तित्व नाकारा, पण जगातले दैन्य, दारिद्र्य, संघर्ष हे तर माणसाला ‘ फील ’ होऊ शकतात, जाणवू शकतात. जाती, धर्म, पंथ यांच्या नावाखाली वेगवेगळे थर साचून जुनी पिढी त्यांचा बळी ठरली, तीच चुकी तरुण पिढी करीत आहे. एका धिप्पाड पिढीने दिलेला कबुलीजबाब आहे : करायला गेलो ते पाव शतकानंतरही अशक्यप्राय ठरले–‘ ऑपरेशन इम्पॉसिबल ’ ! आता तरुणाईला आव्हान आहे ‘ ऑपरेशन–पॉसिबल ’चे. तुमच्या वेदनांचे रंग आकाशात उधळले जाऊ द्या. त्यातून हिंदकळणारे इंद्रधनुष्य मला पाहायचे आहे.

१८७०६
(स्थळ प्रत)

# कार्यक्रमाने भरलेला पाणीदार आशावाद!

सभोवारच्या घडामोडींकडे निरखताना तरुणाईच्या वाटचाला कोणती भूमिका येते ?

पारदर्शक तावदानातून पाहणाऱ्याची ? कमलदलासारख्या अलिप्तपणाची ?

पलीकडचे सारेच दृश्यमान असते. तेथे भाव भावनांचा जल्लोष चाललेला. पण त्यांना अलीकडून पाहणाऱ्या तरुणाईला कवटाळता येत नाही. क्षणोक्षणी उत्फुल्ल होऊनही निर्मिती, आनंद, संघर्ष या भावना युवाशक्ती उपभोगू शकत नाही. नजर सावध असते. बारकाईने अवलोकन असते, तरीही तावदानातून पाहण्याने संभ्रमावस्था येत असते. गोंधळ उडत असतो. तावदानाआड मोकळी हवा मिळत नसते, म्हणून निराशाभरला एकाकी, रितेपणाचा गुंजारव कोंदाटतो; नजर पिचते, आणि मग या कोंडीवर सूड घ्यावा असे वाटू लागते. आवेश उफाळतो. आपल्याच स्वप्नांना चिरे देत तो धक्के देऊ लागतो. अशी ही–सीइंग थ्रू द ग्लास-विंडो–तावदानातून पाहण्याची अवस्था असते.

जलशून्य गडद कातळाच्या कपारीत एखादे गवताचे पान मूळ धरत असते. कठोर जडतेचा भेद घेत, विपरीत परिस्थितीचा रस शोषत ते आकाशाकडे झेपावत असते. तो आडदांड कातळ एक दिवस

त्याच निरागस अंकुराच्या विस्तारात दडून गेलेला असतो ! आशा–निराशेचे घुमणारे चक्र प्रत्येकाच्याच जीवनाला स्पर्श करत असते. गरजणाऱ्यांनी, उसळणाऱ्यांनी, आवेशणाऱ्यांनी पहायला हवे हे गवताचे पाते ! कारण त्वेषाच्या क्षणजीवी स्फुल्लिगांची आरास विपरीत परिस्थितीची कातळजड अवस्था उलथवू शकत नाही. दगडांच्या कपारीत (थ्रस्टिंग थ्रू) चिरत, भेदत-रसथेंब शोधत जाणारा एखादा अंकुर मात्र चिरेबंदी कातळ उधळून लावतो ! रस्त्यावरचे निनादते नारे फार तर 'चरबीझड क्रांती –फॅट-फ्री रिव्होल्यूशन' घडवू पाहतात. साचलेले चरबीचे थर वितळतात, पण सांगाडा मात्र तोच असतो. त्याच्या भरणपोषणाची व्यवस्था तीच असते, आणि चरबीची पुटे चढविणाऱ्या पेशीही कायम असतात ! चरबीचा स्रोत कायम असतो. ही चरबीझड खऱ्या क्रांतीला मंजूर नसते.

कपड्याला डाग पडू नये म्हणून धुण्याआधी खिशातल्या जिनसा–कुठे शाईची पुडी, एखादी लवंग, वा आणखी काही असलेच तर खिसा उलटापालटा करून आतबाहेर रिकामा करावा लागतो. ही व्यवहारातली साधी रीत. अंतर्बाह्य स्वच्छतेची. संतांनी ही खूण वापरली. स्नेह आणि सहृदयतेची पाखर घालून ! क्रांतीला असा निर्मितीचा, स्नेहाचा आणि दूरदृष्टीचा कार्यक्रम असतो. (द वे टू चेंज द सोसायटी इज टू सबव्हर्ट इन्साइड आउट विथ द पॉवर ऑफ लव्ह अँड केअर).

गरीब–श्रीमंत,–रोगी–निरोगी, स्नेही–दुष्ट, इ. जगाची विभागणी फोल आहे. जगाला जागे करणारे आणि त्याला झोपविणारे–सुस्ती आणणारे यातच त्याची विभागणी झालेली आहे ! बुद्ध–ख्रिस्त–गांधी–किंगसारखे त्याला जाग आणतात; तर परिस्थितीकडे, दुःखाकडे कानाडोळा करवून, त्याला सुस्तीची झिंग चढवून झोपविणाऱ्यांचा दुसरा वर्ग असतो. धर्माची, वादाची 'ट्रँक्विलायझर्स' देणारे हे लोक चरबीची पुटे चढवत असतात.

तरुणाईला लाभलेला मोलाचा आधार म्हणजे संघर्षाची जाण ! ती त्यांच्या गाभ्यात खोलवर असते. हा फीलिंग ऑफ क्रायसिस जुन्या पिढीने हरवलेला असतो. म्हणून निर्मितीच्या प्रेरणेचे कौतुक होत नसते. साज मिळतो मात्र साजऱ्यागोजऱ्या प्रवृतींना. वागण्याच्या, संकोचाच्या, जातिभेदाच्या साऱ्या प्रवृत्तींचे हे अदृश्य गज. समोर दिसणाऱ्या अडथळ्यांना ठोकरता तरी येते; युक्तीने दूर सारता येते. पण हे अदृश्य गज सहजी फोडता येत नाहीत ! यांचे विलयन करण्यासाठी करावी लागते कठोर साधना. पारदर्शक तावदानाआड राहून हे विलयन साधत नाही. म्हणून तरुणाईची तडफड किसली जात आहे खोबऱ्यासारखी. खरखरणारा हा आवाज तरुण पिढीच्या अस्वस्थतेचा आहे.

अजस्र अशा श्वापदासारखी भुकेने वखवखल्यासारखी क्रांती आपल्याच अपत्यांचा फन्ना उडवत असते. ज्येष्ठ पिढी युवा पिढीचा घास घेते, मग ती पिढी पुढल्यांचा...तेव्हा प्रश्न पडतो तरुणाईला– ' जीवन हे नरभक्षकासारखेच आहे का ? ' हा ' कॅनिबालिझम '– शक्तीचा असाच घास घेत राहणार ?–कितीही साज चढवला तरी माणसात कुठे तरी दुर्बळता, नग्नता असतेच आदिम प्रवृत्तीची. त्यावर साजरेपणाची एक मालिका मात्र असते. अनेक प्रश्न-चिन्हांनी तरुणाई विस्मित होते. भूक ही प्रेमापेक्षाही अधिक आदिमप्रवृत्ती असते. क्रांती प्रेमाच्या पायावर उभी राहते की भक्ष-णाच्या......यावरच तिची भूमिका सिद्ध होणार आहे. क्रांतिपूर्वी-चाच आपल्याच लोकांवरील अत्याचारांचा इतिहास तिचे सुपुत्र पुष्कळदा घडवत असतात ! विजेसारख्या लकाकलेल्या क्रांतीच्या क्षणापूर्वी आणि क्षणानंतर साम्राज्य राहते अंधाराचे ! म्हणून क्रांतीच्या शापात न अडकता तरुणाईने बंडखोर व्हावे. आत्म-विश्वासाच्या पुंजांनी ठासून भरलेल्या तरुणाईला हे शक्य आहे. पेंढ्याच्या वल्गनांनीं भरलेले त्यांचे पॅकेज नसते ! मात्र क्रांतीच्या मोहाने तिची आयात कधीच करता येत नसते. ती असतात फक्त प्रतिबिंबांची प्रतिबिंबे ! त्यांची भुरळ पडून तरुणाई कृतिशील

भासली तरी ते मृगजळच असते. नेमक्या प्रश्नावर मांड ठोकून भरधाव निघालेली दिसली तरी तिची दिशा चुकलेली असते, प्रश्नचिन्हे कशी, कुठे, कशासाठी, कुणाच्या सहयोगाने वळवायची याची जाण असली म्हणजे ते प्रश्न नेमके 'प्लम्ब' करता येतात; वाकवता आणि वळवता येऊन प्रवाह योग्य तेथे नेता येतो. कार्य-क्रमाने भरलेला असा पाणीदार, पैलूदार आशावाद नसेल तर ते केवळ भडकवले जातात. दूरदृष्टीची दिशा चिपाडलेल्या डोळ्यांना मिळू शकत नाही !

तरुणाईला 'बुजगबाहुल्यां'चीही भूमिका कधी असते. पण देशावर झंझावात थडकतो तेव्हा सत्तेने निर्ढावलेले वराह बुजगबाहुल्यांना न जुमानता शेत फस्त करत असतात! युवाशक्तीला भूक आहे स्वप्नपूर्तीची. त्यांचीही ध्येये आहेत; पण त्यासाठी प्रत्येक दिवस परिश्रमाने भरलेला हवा. माप भरावे तसा दिवस काठोकाठ भरला पाहिजे भ्रामक भावनांच्या आहारी जाऊन शक्तीचा गर्भपात होत असतो.

'देशासाठी प्राण द्या' अशा घोषणा करणे सोपे आहे. पण देशासाठी कसे जगावे हे सांगता येत नाही ही खरी शोकांतिका आहे ! घोषणेत केवळ जोष आहे, थरथर आहे, पण धक्का देणारे चैतन्य नाही; 'रिअल व्होस्टेज' नाही ! मग दवंडी देऊन, ढोल बडवून समाज-वाद कसा आणता येईल ? प्रत्येक स्पंदनातून, कामातून, घामातून प्रत्येक हृदयात तो उमटून कृतीतून उतरला पाहिजे. ढोलावरचा आवाज केवळ हवेतच उमटतो, आणि विरून जातो ! जीवना-तल्या संकटांशी मुकाबला करा, नाहीतर हे नारे लावू नका. 'पुट अप ऑर शट अप' असे त्यांना सांगितले पाहिजे. नेते राजकीय लक्षणे सांगतात, पण उतारा देत नाहीत. तो तरुणाईने विचारला पाहिजे. हे सारे खरे, पण यावर उतारा काय, आणि त्यासाठी तुमची तयारी आहे का,–असे विचारता आले पाहिजे, अशी दम-दार इच्छा असते तेव्हा आपण सारे सारे किडे असलो तरी मी

चमकदार किडा आहे, असे चर्चिलसारखे म्हणता येते! शिस्त जबाबदारी, आणि चमक या अडणीवर आपले जीवन रचले पाहिजे. स्वतःच्या व इतरांच्या प्रवृत्तींशी शिस्तीने जुळवणी केली पाहिजे. शिस्त नसली किंवा तिचे अपसरण झाले म्हणजे ब्रह्मघोटाळा होतो. स्वतःहून जबाबदारी पत्करली पाहिजे. तिचे निनाद आतूनच उमटले पाहिजेत. अन्यथा तिचे उकिरडे निर्माण होऊन तीच ओझ्यागत वाटू लागते. या प्रवृत्ती घेऊन वावरताना आत्मविश्वासाची चमक हवी 'ग्रेस.' मात्र ती रूढिग्रस्त सवय नसावी, किंवा फॅशनची 'मॅनर्स' ही नको. त्या मॅनर्स औपचारिकतेच्या गुलाम असतात, आणि चाकोरीतले छाप घेऊन ललामभूत म्हणून वावरतात. प्रसंगानुरूप, ग्रेस बदलत राहते.

बुद्धिजीवी वर्गाला 'दिमागी ऐयाशी'चीच शान वाटते. 'टू मच रिझन' हा त्यांचा प्रकार असतो, तर तरुण वर्गाचा प्रकार असतो 'टू मच पॅशन.' आणि मग शोभादर्शकातल्या चित्राकृती क्षणोक्षणी बदलत जातात तसे उत्फुल्ल उन्मेष काबूत ठेवू न शकणाऱ्या तरुणाईला जग दिसते धुरकटलेले, संशयग्रस्त, आणि विस्कळीत! स्वतःवरच रुसून बसल्याने त्यांना असे दिसते. कळ्यांमध्ये फुलांच्या बहराची चाहूल लागते तशी त्यांनाही भविष्याची चाहूल आज लागायला हवी. केवळ कालच्या प्रश्नांवर निर्वाह करून भागणार नाही; किंवा तसेच भविष्याबद्दल आधीरतेने हुरळता येणार नाही. तप्त मुशीत ओतून घ्यावे तसे आपल्या आशेचा संदेश आपल्याच हातांनी दुसऱ्यासाठी जगताना उमटला पाहिजे म्हणजे मग आपल्या स्नेहाचे संगीत ऐकता येते. हे करताना समाजाबद्दलच्या कृतज्ञतेची जाण जीवनाला आली पाहिजे. म्हणजे मग मृत्युचेही स्वागत करता येते. असे जीवन जगताना वादळी विजेचा जरीपटका खांद्यावर मिरवता येतो. स्वतःच मग आपल्या भूमिकेचे दिग्दर्शन अभिजात नटासारखे त्याला करता येते. ज्याला भ्यायचे ते भय नेहमीच क्षणपैलू लेवून येते. पण तेच मग दीर्घकाळच्या आशेची छाया बनून जाते. अशी वादळी शक्ती लाभली म्हणजे पराभवाच्या

राखेतून तो पुन्हा उठतो,—पुन्हा नव्या स्फोटाची, नव्या दीप्तीची रचना करण्यासाठी !

पण वर्षातून एकदा कुठे काही समारंभपूर्वक केल्याने हे जमत नसते. नुसतेच भुंकत राहण्यापेक्षा आम्ही आमच्या 'व्हिजन' दर्शनाचेच लचके तोडायला हवेत, तिला चावा घ्यायला हवा. राजकारणाचे तुकडे न चघळता आपल्याच अपंगत्वाचे लचके कचकावून तोडता आले पाहिजेत. आपला उन्मेष गुंतवायला शिकले पाहिजे. त्याची सध्या नुसतीच दाणादाण उडाली आहे. ही शक्ती गुंतवली तर त्यापासून समाधानकारक, नित्य असे 'रिटर्नस्'—फायदे मिळतील ! संचलनशक्तीची उणीव, निश्चयाची कमतरता त्यामुळे तरुणाई जडतेला, कृतिशून्यतेला बळी पडत आहे. सळसळणाऱ्या आवेशावर गंज चढतो आहे. अभिजात चित्राच्या प्रत्येक रंगाच्या फटकाऱ्यातून जशी भावनांची स्पंदने निर्माण होत असतात तशी तरुणाईच्या कार्यक्रमातून ही जाणीव रोमरोमातून सळसळली पाहिजे. 'स्मग्लर ऑफ ट्रुथ—सत्याची चाचेगिरी' जो करू पाहतो त्याला असेच जिवंत क्षणातून, जिवावर उदार होऊन आपल्या प्रश्नांचे उत्तर शोधले पाहिजे.

# आसवांच्या स्फटिकात त्यांनी पाहिले इंद्रधनुष्य !

तो पाहा सूर्य
तळपत सारे चराचर दाहतो आहे
आणि हा वसुंधरेचा पुत्र
केव्हाचा जमीन वाहतो आहे
वाहतो आहे जमीन माझा हलधर
धरित्री जे जे धारण करते
ते ते करतो आहे वहन त्याचा पुरातन खांदा
माळावर लिहितो आहे प्रत्यक्ष वेद फाळांनी
त्याचा झुकलेला हडकुळा बांधा !

आनंदवनातील हिरवी स्वप्ने फुलवणारा हा हलधर. गुन्हा न घडता समाजाने त्याला गुन्हेगार ठरवून टाकले होते वाळीत ! त्याच्या कुजलेल्या कुडीतल्या प्राणाला स्पर्श करायला मृत्युलाही भीती वाटावी ! कळवळा दाखवणाऱ्या समाजाची मानवता त्याच्या-समोर चतकोर तुकडा टाकून धन्यता मानत होती. त्याच्या हाता-वरच्या भाग्यरेषाही झडून-पुसून गेल्या होत्या. हातांचे खुंट झालेले होते. क्षतभरल्या पावलांना चाहुल नव्हती. जीवन एकाकी होते. ही सारीच घृणेची विशेषणे आनंदवनातल्या त्या हलधराने वाऱ्यावर भिरकावून दिली. रोगी शरीरातही निकोप, शुद्ध मनाचा वास होता. अंधाराच्या प्रदेशात प्रकाशाच्या रेषा पालवत हा जत्था

निघाला–जीर्णशीर्ण खांद्यावर नवे क्षितिज पेलायला. खडकाळ माळाला अंकुर फुटले. शिलांतून प्राण जागे झाले.

भुईचे हिरवे हास्य फुलवण्यासाठी
नांगराच्या फाळांनी तिला कुरवाळणारा
स्वर्गातल्या अश्रूंची कोसळणारी झड
भरलेल्या डोळ्यांनी पाहणारा
असे संपन्न जीवन बेहोषपणे जगणारा तो हलधर.
त्याच्या मस्तीची स्तोत्रे गाणारे वाल्मीकी आता हवे आहेत !

माळरानावर हिरवी शेते डोलू लागली, गिट्टीच्या खदानीतून पाचूचे बेट आणि सुखसदने निर्माण झाली. वेदनेचा पहाड कोरता कोरता त्यांना आढ़ळून आले, आपण हे सुखाचेच कैलास लेणे कोरीत होतो! मग, प्रकाशा महापूर आला पहा, असे म्हणत त्याने आणखी एका दुःखाला आपल्या कुशीत आसरा दिला. आसवांच्या स्फटिकांतून त्याने पाहिले इंद्रधनुष्य ! वेदनांचे नाते जेव्हा जुळते, तिच्या समान धाग्याने जेव्हा जीवने गुंफली जातात तेव्हा माणसामाणसांतल्या आणि राष्ट्राराष्ट्रांतल्या तटबंदी कोसळून पडतात. फेलोशिप ऑफ पेन – दुःखवेदनांचा सहयोग – निर्माण होतो त्या वेळी माणूस दुसऱ्याचा विचार करू लागतो.

अभावांचेच लचके तोडून असे कितीही वणवणलात
तरी अभावांची भूक मिटणार नाही
आणि अभावांच्याच लक्तरांनी
जीवनाचे नंगे शरीर झाकता येणार नाही.
त्यासाठी जलधारांचे ताणे
आणि नांगरांच्या रेषांचे बाणे
यांनी मातीवर विणलेली
गर्द हिरवी महावस्त्रे हवी आहेत !

जेव्हा पोटाच्या रिकाम्या खळगीत गरजणारे खर्ज तृप्तीच्या

चिरसुगंधी गीतात गांधार होऊन येतात तेव्हा माणसाच्या साऱ्याच मूल्यांचे संकल्प प्रकाशाच्या भरतीवर स्वार होतात. अन्न हेच खरे उपनिषद हे तेव्हा कळते.

लोळ निखळे प्रकाशाचा, फुटता अग्निबाण वेदनेचे–

ही काही कुणा जादुगाराच्या पोतडीतली किमया नव्हे, की कुठल्या सुरस आणि चमत्कारिक इंद्रभुवन गुहेचे वर्णनही नव्हे. विक्राळ, नखरेल वेदनेने तडफडणाऱ्या माणसांनी उभारलेल्या मनुजतेच्या शिल्पाची, माणुसकीच्या जडणघडणीची ही कथा आहे.

व्यथेतून निथळत ही बरसात
इथेच माझ्या देहाची नित जळते ही फुलवात

असे म्हणत त्या हिरव्या स्वप्नांमध्ये मृगजळाची रखरख ओलांडून तो उभा आहे. आणि म्हणतो–

समर्पणाची उत्सुक ओंजळ माझ्या या नयनांत

माणुसकीच्या साक्षात्काराची ही कुठली सीमा म्हणावी ? वंचनेचे अक्षांश-रेखांश ओलांडत आपल्याच छायेलासुद्धा थरथरणारा तो... जाईच्या फुलाने आपल्या सुगंधाचे ओझे वाहावे, तशी समाजाच्या कृतज्ञतेची जाणीव बाळगून, समाजाकडून मिळालेल्या सादाची स्मृती ठेवून परतफेडीसाठी उभा आहे. जखमांची आरास मांडून बसला असला तरी तो म्हणतो–

'दारी सुखाच्या मूक वेदना अश्रुंगीत गातसे
केवळ ना आभास,

एका दुःखाने आणखी एका दुःखाला निवारा द्यायचा, सर्मपित भावनेने समाजाचे ऋण फेडावयाचे, ही शब्दापलीकडील क्षितिजाला स्पर्शणारी कल्पना आहे असे मानावे लागेल ! येथे कल्पनांची

तुलना नाही करायची, माणुसकीचे मखमली अंगार कुठवर पोचतात तेवढे पाहायचे.

आनंदवनातले हिरवे रावे फुलले आहेत, स्नेह आणि सहयोगाच्या सुगंधी मिठीतून. मी–आम्ही–तू–तुम्ही–आपण सर्वच या कल्पनेला येथे एक मीलनबिंदू मिळतो. आनंदवनाच्या सर्वच प्रवृत्तींत हा विचार रुजलेला आहे.

मस्तकावर पाटच्या वाहणाऱ्या स्वेदगंगेच्या
डगमगल्या चालीची
धुळीत लिहिलेली कविता....

यातूनच निर्माण झाली आहे. त्याला नव्हते कुठल्या उपनिषदाचे पीठ किंवा धर्मगुरूचा अवतार. 'कुरणशाळेत' साक्षर झालेल्या हिरव्या अंगठेबहाद्दराचे हे काम, अंगठे झडलेले अंगठे बहाद्दर ! !

आनंदवनातल्या मुक्तिसदनास त्यांनी उभारलेले हे हिरवे लहरते स्वप्न पाहा. रोगमुक्तांची ही वसाहत–त्यांच्या पुनर्वसनासाठी. रोग बरा झालेला, पण समाज स्वीकारत नाही. अजूनही तो दूषित ग्रहाचा पडदा दूर झालेला नाही. यांनी मात्र उभा केला आहे–पारदर्शक स्नेहाचा पडदा ! एस २२७, एस ३०८ या गव्हाच्या जातीची पहिली भरघोस लागवड चांदा जिल्ह्यात यांनी केली जगन्नाथ, पद्मा इ. धानाच्या जाती, लक्ष्मी कापूस, लांब पात्याचे कांदे...पाचूसारखा सांबर ! आणि ही केळीची बाग–खानदेशातून आलेल्या एका रुग्णानेच नव्याने वसवली. लहडते केळीचे लोंगर ! लहान मुलांच्या गोऱ्यापान गालांसारखे भासणारे हे पेरू आणि त्या सुवर्णकान्तीच्या दळदार तीन तीन किलोच्या पपया ! गावातल्या मराळणी, कॉलेजचे विद्यार्थी, आणि तुम्ही-आम्ही पाहिले तर या साऱ्यांवर तुटून पडतो ! मेहनतीने हे पाचूचे बेट असे फुलते फळते! येथला हा नारायण आवारी आपल्या आईला आसरा देतो.

गंगू आपल्या म्हाताऱ्या सासऱ्याला-त्याच्याही हाताबोटांचे खुंट झालेले—आसऱ्याला बोलावते...पाखरे तर हाकलील...अशा किती हकिगती सांगाव्यात. युगानुयुगे दैन्य-दारिद्र्याची, लाचारीची, दूषित ग्रहांची गीते आळवत, उजाड माळरानावर एकान्तात बसलेला हा— याला आता, महारोगी तरी कसे म्हणावे ?

या खडकाळ माळावर द्राक्षे पिकवण्याचा सफल प्रयोग त्यांनी केला. जमिनीतून पत्थर काढून त्या जागी माती ओतली. २५१ वेलांची जोपासना मोठ्या मिनतवारीने केली. विपरित परिस्थितीतही वर्षाकाठी पाच—पाचशे किलोंचे उत्पादन दिले. येथल्याच रुग्णांनी वर्ध्याजवळ दत्तपूरला जाऊन तेथेही द्राक्षबाग वसवून दिली. खडकाला पाझर फोडणाऱ्या एकोणतीस विहिरीसुद्धा याच हातांनी खणल्या ! आसपासच्या ग्रामीण परिसरात येथल्या टिनकॅनने दिवस सुरू होणार, सकाळी पीठ गाळले जाणार ते तेथे तय्रार झालेल्या चाळणीतून. त्यांचा चहासाखरेचा, मसाल्याचा डबा येथला. त्यांचे ताटांचे, कपबशांचे शिकाळे येथले. साठवणीचे डबे, कोठ्या, पेट्या, येथल्या. रात्री कास्तकार शेतावर जागलीला जाणार तो येथला कंदील घेऊन. हे दृश्य बहुतांशी परिसरात नजरेला येईल. अशा तऱ्हेने ही मिणमिणती ज्योत गडद अंधाराशी झगडत माणुसकीचा साक्षात्कार अनुभवत आहे.

मुक्तिसदन—सुखसदन—संधिनिकेतन या आनंदवनातील प्रकल्पांनी वंचनेची तीव्रता जिव्हाळ्याने कमी केली आहे. सुखसदनाचे नयनरम्य बांधकाम, आखीव-रेखीव नेटक्या अशा आनंदवन—मुक्तिसदनातील घरांच्या ओळी, कॉलेजची लांबरुंद इमारत, नवीनच बांधून झालेले भव्य संधिनिकेतन-या साऱ्यांची उभारणी येथल्याच लोकांनी केली. परस्परांना स्नेह—सहकार्य देत ही उभारणी झाली आहे. आनंदवनात ही कांचन-स्नेहाची झाडे खूप आहेत ! दसऱ्याच्या सुमाराला गावातले लोक कांचनाचा पाला येथून लुटून नेतात. वेदनेच्या टपटप नाद-बिंदूतून खुणावणारे इंद्रधनुष्य मित्रमेळाव्याचे निमंत्रण देत असते ! —मग :

दैन्याचे सैन्य जिकण्यासाठी तेथे विद्रोह समूर्त होतील
ओझी वाहणारी मस्तके तेथे मंदिराहून उंच असतील
मातीवरती जो फळांनी निर्मितीची निर्मिल गाथा
अशा श्रमर्षीसमोर तेथे द्रष्टयाचाही झुकेल माथा
तुडुंब असतील आनंद-मेघ वारा वाहील पिऊन स्वेद
पुरुषार्थ्थाची प्रज्ञा तेथे प्रत्यक्षाचे लिहील वेद

जिथे जनावरांना टोचूनही महारोग होत नाही, तेथे झाडापाल्यातून काय होणार ? ज्या जीवनाची रस्त्याकाठच्या धुळीनेच चौकशी केली होती, निवारा दिला होता, त्या अपंग हातांच्या ओंजळीत सर्व ऋतूंची समृद्धी परमेश्वराने दिली आहे. भूमीची गर्भधारणा करायला निघालेला हा वसुंधरेचा पुत्र सर्व प्रवृत्तीत स्नेह-सहयोगाचा आविष्कार पेरत चालला आहे, समर्पणाची ओंजळ घेऊन. याची कहाणी सांगावी तेवढी थोडीच आहे. सर्वांच्या सहकार्याने त्याने हे स्वप्न पालवले. त्याच्या गरजा जन्मायच्या आत जाणल्या आणि आईसारख्या पुरवल्या—समाजानेच ! समाजासाठी प्रल्हाद व श्रावण होण्याची संधीही या वसुंधरेच्या पुत्राने सोडली नाही. कॉलेजची निर्मिती, हजारो खंडी धान्याचे उत्पादन, सोमनाथ प्रकल्पातील योगदान...पाचामुखी परमेश्वराचा साक्षात्कार व्हावा तसे त्याने आपले हात पसरवून दिले आहेत कृतज्ञतेने. घेतले त्यापेक्षा भर-भरून उधळतो आहे. दुःखाला जात नाही, कुळ नाही, गोत्र नाही.

हा त्याचा विचार कल्याणाच्या पलीकडला आहे. अंग झाकायला एके काळी वस्त्र नव्हते, तेथे हा गुलाबाच्या, शेवंतीच्या, मोगऱ्याच्या फुलांनी अंगे सजवतो ! गावातला कासार बायकांच्या हातात बांगड्या भरायला, मोत्याचे दागिने विकायला येतो. परदेशी पाहुणे त्यांच्यांत बसून चहा घेतात, त्यांचे लग्न-समारंभ थाटाने साजरे होतात. संस्कृतीचे हे पोषण त्यांनी आपल्या घामातल्या लक्ष्मीतून केले आहे. त्रिखंडकीर्तीचे विख्यात सर्जन डॉ. पॉल ब्रँड यांनी आनंदवनास भेट दिली तेव्हा ते म्हणाले की, आनंदवन हे

आनंदाचे, सुखाचे प्रत्यक्ष दर्शन आहे. माणुसकीच्या साध्या तत्त्वावर आधारलेले, पण विज्ञानाचे भान ठेवून असलेले मूर्तरूप आहे. भान ठेवून आनंदवनाने योजना आखली आणि बेभान होऊन ही माळरानावर स्वप्ने फुलवली आहेत.

शब्दांचा केव्हाच विझलेला विस्तार
महान अर्थांनी पेटेल तेथे श्रमाचे गंधर्व गातील मुक्त
मातीच्या प्रीतीची गर्भस्थ गीते निर्माण नृत्यास देतील ताल गात्या-
तली पावले,

रोवणारे हात शोधतील तेथे विज्ञानयोगी, तिमिरातील किर-
णांचा थारा
आणि उद्दीप्त करतील सारा अंधारा गार गाभारा
पाहातील जीवनाच्या मुळांना कसा आहे गुलाबी रंग
पत्थरांच्या स्नायूंत कोठे शोधले आहेत तेजाचे तरंग
आव्हानीत आहे मी तारुण्य, त्या वस्तीच्या उभारण्या वेशी
मातीला रोगमुक्त करण्यासाठी हव्या आहेत
यौवनतप्त लाल पेशी.

# सजल स्नेहाची दिशाखूण

अंत्योदयाच्या, सर्वोदयाच्या विचारांच्या मऊ-स्नेहाळ पिसांची ऊब जनसामान्यांना मिळालेली आहे, पण कुडकुडणारी थंडी त्या उबेने जात नाही आहे.

त्यासाठी पुरुषार्थाने भारलेल्या तुमच्या सौहार्दगर्भ हृदयस्थ वृत्तीला ही साद आहे.

तुमच्या स्नेहाळ जीवनाला कृतज्ञतेने केलेला हा कुर्निसात आहे.

तुमच्या विचारांनी माझ्या जीवनवसंताचा ताल धरण्याची आणि वादळे तोलण्याची ताकद मला दिली आहे.

मानवाच्या कल्याणाची धडपड ही त्या परमेश्वराची वैभव-समृद्धी शोधण्याची एक कला. तिची लागण झालेली कार्यकर्त्यांची सेना, तरुणांचा समूह, पिचलेले पण बुलंद मनाचे आदिवासी... या सर्वांसाठी आणि जनसामन्यांसाठी आता तुमच्या सुगंधी सत्प्रवृत्तींच्या पारिजातकाच्या फांद्या खदखदून हलवायला हव्यात.

तुमच्या विचारांची पाळेमुळे धरतीचा पान्हा चुंफत बाळसे धरत आहेत. त्यांना बहरही लागला आहे. रंजल्यागांजल्यांची श्वसिते सुगंधित होत आहेत.

ही सारी तुमच्याच अजेय प्रेरणेची रूपे आहेत. कृतीचा पांगुळगाडा घेऊन कार्यकर्त्यांची सेना निरनिराळ्या क्षेत्रांत उभी राहिली आहे.

पण ही सेवेची, कार्यशीलतेची, कार्यक्रमाची फुले संघर्षांच्या फांद्या हलवल्यावाचून जनसामान्यांच्या पायांवर जाऊन पडणार कशी ?

रचनेची कामे करताना, प्रत्येक क्षणाला येणाऱ्या अन्यायाच्या विरुद्ध संघर्षाची तयारी करताना माणसा माणसापर्यंत जर हा शुभाकांक्षेचा कार्यक्रम पोचवला नाही तर या करुणेची वाढ खुंटेल. ते स्टन्टेड अफेक्शन होईल आणि त्याचा ' वेलु गगनावरि ' जाऊन पोचणार कसा ?

या कणवेचा तजेला टवटवीत ठेवायला, फोफवायला सत्प्रवृत्तींचे सदाबहार खतपाणी आवश्यक असते.

हृदयाहृदयांना साद देऊन तुम्ही या ओलाव्याची शिंपडण केली आहे.

केवळ विचार आणि आचारांच्या मिश्रणातून निर्माण झालेल्या संधिप्रकाशात अजून माणसांची ओळख पटत नाही. आकृती दिसते, अस्तित्व जाणवते, पण ओळख पटत नाही असे झाले आहे.
आचार-विचार यांच्या आशयसमृद्ध समतानतेतून हृदया-हृदयांत एक संगीत निनादता येईल.

तुमच्या कार्यातून या सुरांची झलक समाजाची मने स्पर्शून गेलीत. काळाच्या आवर्तनाबरोबर तत्त्वांचे स्फोट आवश्यक ठरतात. विचारांचे पैलू अधिक तावून, सुलाखून, पुनर्घडण करून घ्यावयाचे असतात, हे तुमच्या निर्मितिशील कार्याने राजकीय पक्षांना आणि कार्यकर्त्यांना सुचवले आहे. आतापर्यंतचे कार्य हे आश्वासनांचे, तयारीचे आणि पायाभरणीचे कार्य झाले. ही सुरुवात आहे हेही त्यांनी ओळखायला हवे. आता रचनात्मक संघर्षाच्या आविष्कारशीलतेला चेतना द्यावयास हवी.

जागोजागी सुप्त ठिणग्या स्नेहशील दीप्तीची प्रतीक्षा करत आहेत. वातावरण अनुकूल आहे. संघर्ष हा रचनेच्या हातांत हात घालूनच वाटचाल करणार आहे.

गांजणूक, पिळवणूक, दैन्य, विषमता इत्यादी, विरुद्ध उभे राहताना केवळ समस्याप्रधान परिस्थितीचा मुलायम बुरखा तळमळीच्या कार्यकर्त्यांना पांघरता येत नसतो. कृतीने प्रदीप्त झालेले अॅक्शन ओरिएंटेड तरुण नव्या मनूची जडण-घडण करू शकतात.

हे तुमच्याच कार्यातून समाजाने पाहिले आहे. पण केवळ भावात्मक अवलंबन संघर्षाला फायद्याचे नसते, हे त्यातून समाजाला कळले आहे.

तुमच्या विचारांच्या, स्मिताच्या छायेत राहून मी हा इंद्रधनुषी खेळ पाहिला आहे.

केवळ विचारांची, चिंतनाची एकेक लाट भरतीच्या उसळ-जोशाची असते. आपल्या पुरती अलिप्त.

मला जाणवले आहे ते तुमचे तुडुंब, दुथडी भरलेले, ओसंडून वाहणारे हृदय.

त्याच्याशी मी अनेकदा हितगुज केले आहे. स्नेहार्द्र प्रबोधनाला आता कार्यकुशल हातही हवे आहेत.

आणि भक्कम रोवलेली कणखर पावलेसुद्धा. असमानता, लाचारी, दैन्य, दारिद्र्य यांच्या भळाळत्या जखमेवर बोधामृताच्या चिंध्या बांधून भागत नसते. स्निग्ध सहानुभतीच्या, नव्या ताज्या उत्साहाच्या, तजेल तरतरीच्या रक्तपुरवठ्याची गरज असते. आणि ममतापूर्ण शुश्रूषेबरोबरच पाऊल उचलायला विचारांचे पौष्टिकही हवे असते. हे करणारा तुमच्यासारखा कुशल हकीम हवा आहे. जीवघेण्या समस्यांच्या उत्तरांनी आता उभारायच्या आहेत त्याच

समस्यांच्या कबरी. त्यात दफन करायची आहे ती त्रस्त उद्विग्नता, समाजाची विफलता, लाचारी, दारिद्र्याचे कुत्सित हुंकार.

विश्वास आणि साहस अधिक श्रद्धापूर्ण करणारी ही उत्तरे गवसतात, हे वर्तमानाने इतिहासाला नेहमीच दाखवून दिले आहे. बांगला देशाचा उदय हे अभेद्य, बुलंद श्रद्धेने संघर्षाच्या ज्वालेतून मिळवलेले एक जखमसमृद्ध उत्तर आहे.

तुमच्याच विचारांच्या असीम जलाशयावर खापऱ्या फेकून उमटलेले तरंग माझ्या अक्षरांसाठी आकार निर्माण करत आहेत. तुमच्या विशुद्ध प्रेरणेतून सामान्यांच्या जीवनातील संघर्षाला कोणती दिशा मिळते, कोणता आशीर्वाद मिळतो, त्याची आशा बाळगून मी हे लिहिले आहे.

तुमच्या तत्त्वश्रद्धेच्या ‘ व्हाय’ने जिज्ञासू आणि ज्ञानी यांना संभ्रमातून बाहेर पडायला स्वच्छ दिशा लाभली आहे.
आता तुमच्या प्रेरणागर्भ शुभेच्छांच्या किमयेने ‘ हाउ ’ ने, वास्तवाच्या तंत्राने त्यांना कोणती चालना मिळते याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे.

प्रत्येकच चंदेरी रेखेच्या आसमंताला काळ्या ढगाने गिळलेले असते. ‘ एव्हरी सिल्व्हर लाईनिंग हॅज इटस् क्लाउड. ’ काळे ढग पार करत एकेक चंदेरी रेखा स्नेहतंतूने जोडण्याचा प्रयत्न या रचनात्मक संघर्षातून करावयाचा आहे. त्या निर्धाराच्या पाठीशी तुमचा संप्रेषित दिलासा आहे, संजीवन आहे.

हा सगळा विचार आचाराच्या कुडीतून दाईच्या कुशल हाताने सुरक्षित सौष्ठवपणे बाहेर काढण्याची वेळ आली आहे. आता सौजन्यांकित संभ्रमातून सर्वोदयानेसुद्धा झेपावले पाहिजे, नम्रपणाचे अक्षांश–रेखांश ओलांडत.

माझ्या हाडांच्या सुगंधी भुग्यात रचनात्मक संघर्षाचे पाखरू फड-

फड करते आहे. संदेह, संशय यांची सारी पडझड जळून राख झाली आहे.

मन रचनेचा एकेक आशय रेखत, संघर्षाच्या निनादांनी व्याकुळ होत असते.

कृतिशीलतेचा ध्यास घेतलेले तरुण कधीच कामाला लागले आहेत. पण संधिप्रकाशात त्यांना हवी आहे दिशा.

(विनोबाजींना लिहिलेल्या एका पत्रातून)

# वळणावरचे तीन दगड

भुकेने कुरतडलेले आतडे स्वातंत्र्याची चव घेऊ शकत नाही, हे समाजातल्या तळथरांनी दिलेल्या धडकांनी नेहमीच दाखवून दिले आहे. पिळवणूक, अन्याय, विषमता यांनी ठसठसलेली वस्तुस्थिती फार काळ सायीसारखी शांत राहू शकत नसते. समाजातले सारेच थर हादरवून सोडणारी स्फोटकता, दाहकता आपोआपच उसळण घेत असते. त्या लाटा कधी लुप्त होतात, कधी उफाळतात.

अशाच स्फुल्लिंग भरलेल्या वास्तवाच्या काठांवर समाज वावरत आहे असे म्हणावे लागेल. हे स्फुल्लिंग, ही दाहकता केवळ शब्दांत नाही तर त्या तळथरांतल्या आदिवासींच्या खपाटीस गेलेल्या आतड्यात, पिचलेल्या हाडांत आणि असहाय पापण्यांत आहे. अनेक वर्षांपासून विषमतेचे आसूड सोसूनही ते जगले; पण आपले जिणे ओसाड करीत, दुसऱ्याचे हास्य फुलवत. त्यांच्या कोरभर फुटक्या सहानुभूतीवर. त्यांचे जे जे आहे, होते ते ते दुसऱ्यांनी यथेच्छ उपभोगले.

पण त्या एकाकी असहाय पापण्यांतही आता जाग आली आहे. समतेसाठी माणुसकीला जाब विचारण्याची.

या पहिल्या पावलानंतरचे भुकेचे भवितव्य टप्प्याटप्प्याने सुसह्य करण्यासाठी. त्यांना सहयोग देण्यासाठी : ही सुस्तावलेल्या समा-

जाची आव्हाने स्वीकारायची असतात.

बेतळ सहानुभूतीने किंवा गोठलेल्या ध्येयाने ह्या समस्या सुटत नसतात. स्वातंत्र्य हेही तेथे बुजगावणे बनत असते. स्नेहपूर्ण करुणेच्या स्पंदनांवर स्वार होऊन या रोंरावत्या काळोखात शिरता येणे शक्य होते, not escape but Approach— त्या समस्यांच्या अधिक निकट पोचणे, स्नेहतिरीप घेऊन, दिलासा, जवळीक घेऊन. तरच सुरुवात करता येणे शक्य होते. भव्यतेऐवजी शुभेच्छांची निवड हवी असते.

स्वतःपुरत्याच असलेल्या आकांक्षा दूर ठेवून, अन्याय पिळवणूक यांचा पालापाचोळा बेचिराख करणारी ही दियासलाई—समिधा—समाजाच्या सद्‌भावनेतून मिळते. तेव्हा त्या काडीच्या प्रकाशात अंधारलेल्या आदिवासींच्या पददलितांच्या जीवनात कणव घेऊन पोचणे शक्य होत असते.

ही एक उत्थानयात्रा आदिवासींची भू ... भूक आणि भविष्य हे निमित्त. त्यांच्या सहयोगात आपल्याच आत्म्याचे हे उत्थान.

माणसातला अभिजात चांगुलपणा,
त्यांच्या हृदयाला भलाईचे आवाहन,
आणि अटळ संघर्षाची रचनात्मक किनार—
या परिसावर तरुणांनी आपला निर्णय घासून पहायचा आहे.
त्यांच्या उत्साहात तळमळीची आच आहे.

आपल्या ऐहिक प्रलोभनांचा वधस्तंभ खांद्यावर मिरवत जाताना त्यांच्या सोबतीला आहे जळून राख झालेल्या जीवनांचा जत्था. राखेला आणखी कोण जाळणार असते ?

रचनेच्या ओंजळीत स्नेह वाहून नेतानाही संघर्षाची वळणे त्या कळकळीच्या तरुणांच्या मार्गात नेहमीच येत असतात. तीन दगड त्या वळणांवर ठाकलेले असतात. त्यांच्या इच्छांचीच ती प्रतीके.

पहिला दगड अतिशय धारदार सुळक्यांचा असतो.
त्या सुळक्यांवर पाऊल ठेवता येते, पण बसता येत नसते.
दुसरा दगड वज्रकठीण असतो. छिन्नीची धार बोथट होते.
त्याच्यावर कोरायला महाप्रयास पडतात.
खंजिरी काठिण्यातून एक रेषाही उमटत नसते.
शिल्प कोरण्याची मनीषा तर अपरंपार असते.
खुद्द तो दगड हेच एक दारुण शिल्प असते !

मग तिसरा दगड. त्यावर घाव घालताना छिन्नीच तुटावी इतका तो कठीणतर असतो. त्याचे स्वरूप मयासुरी स्फटिकासारखे असते. कधी त्यात आपलेच प्रतिबिंब दिसू लागते. त्याच्या कातळगर्भातील अग्निफुले आव्हान प्रदीप्त करीत असतात.

त्या दगडावर कशाची मात्रा चालवावी, या विचारात तो तरुण दिङ्मूढ होतो.

' मग मीच शिल्प होऊन त्या दगडापुढे उभे ठाकावे का ? माझे ' मॉडेल ' त्याचे कण हलवतील का ? '–तो विचारतो.

प्रश्नचिन्हांचे छिललेले घाव त्यांच्यासमोर नाचत असतात.
त्या तिसऱ्या दगडापाशीच त्यांची कसोटी असते.
पण तेथे उत्तरे त्यांची त्यांनाच शोधून पुढे जायचे असते.
त्यांच्या प्रतीक्षेत प्रत्येक क्षण व्याकुळ झालेला असतो.
ते आपल्याच प्रिय मूल्यांसाठी झगडत असतात.
त्या मूल्यांची मशागत त्या तरुणांच्या आचरणातून झालेली असते.

त्यांची पूर्ती हेच त्यांचे समाधान.

शांततेसाठी धवल कबुतरे महापुरुष उत्सवाच्या दिनी आकाशात उडवत असतात. तशी सत्प्रवृत्तींची, साहसाची, शांती–समाधानाची

बंदिस्त पाखरे बरगडयांचा पिंज़रा फोडून आता प्रत्येकाने मोकळी करायला हवीत.

'सारे काही परमेश्वराच्या प्रेरणेवर अवलंबून असेल' ही त्यांची प्रार्थना, तर तरुणांचे कार्य दाखवून देईल की सारे काही त्यांच्यावर, त्यांच्या निष्ठांवरचा अवलंबून आहे. हे त्यांच्या कार्याचे निनाद. बेदरकार लाटांच्या तुफानातले गलबत, किनाऱ्यावर जखडून असलेल्या नि ठिकऱ्या ठिकऱ्या होणाऱ्या गलबतापेक्षा – नेहमीच अधिक सुरक्षित असते !

स्वत:चीच जडणघडण करण्याकरता, आपला आत्मविश्वास अधिक बुलंद करण्याकरिता तरुण झेपावत आहेत. करुणेच्या स्पंदनांवर, स्नेहतिरीपीवर...धुवांधार पावसातील युवाशक्तीच्या मोरपिसाऱ्यावरचा तो डोळा समाजाच्या साऱ्या सत्प्रवृत्तींना खुणावत आहे.

# गुरुत्वाकर्षणापलीकडे

स्वातंत्र्याच्या रजतमहोत्सवाच्या ललकाऱ्या शानदारपणे सगळीकडे पसरल्या, पण त्या लकाकत्या प्रतिबिंबात अद्यापही भूतकाळातल्याच सावल्या रेंगाळत आहेत. ऐन यौवनातल्या स्वातंत्र्याच्या छायेतही तरुण मने करपत आहेत. शिगोशिग सुखाच्या पाठीमागे, वैभवाच्या भोगात एखाद्या नरभक्षक वाघासारख्या लागलेल्या पिढीच्या उद्योगाने गरीब गरीबच राहिलेत आणि श्रीमंत मात्र अधिक श्रीमंत झालेत ! त्यांच्या सुखाच्या वणव्याने समाजातले तळ-थर पार लाही लाही झालेत.

आता माणसाने स्वत:लाच अंतिम इशारा–मोक्याच्या क्षणाचा अल्टिमेटम–द्यायची वेळ आली आहे.

या कोंदाटलेल्या, करपलेल्या वातावरणातून, गुरुत्वाकर्षणाबाहेर झेपावण्यासाठी नवा उन्नयन बिंदू– पॉइंट ऑफ टेक ऑफ–पकडायचा आहे.

तो बिंदू निश्चित टिपण्यासाठी वर्तमान आणि भविष्य यांच्या रेषा जुळतात तेथे नव्या आखणीची नितांत आवश्यकता आहे. दूरदृष्टीला आंतरिक प्रेरणेची जोड असलेल्यांनी ह्या आखणीसाठी हातभार लावायचा आहे.

राष्ट्रीय जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात एक कलात्मक जाणीवेची सर्व-स्पर्शी एकात्मता म्हणजे संस्कृती. संवेदनशील मन, बुलंद बाहू आणि सतेज मेंदू त्या संस्कृतीच्या पाऊलखुणा रेखत असतात. सामूहिक जबाबदारीची एक सळसळती जाणीव, निर्णयातला निरोगीपणा यांच्या साहाय्याने तुडवत जायची आहे ती सार्वत्रिक विषमता. कोणतेही जिवंत मन या आचेतून अलिप्त राहू शकत नसते. राहवत नाही, अशी आच निर्माण झाली म्हणजे त्या बिंदूवरून झेप घेता येते.

वेगवेगळ्या क्षेत्रांत लोकबिरादरीसारखी कल्पना जेव्हा एकेक कण जोडू लागते तेव्हा आपल्याजवळचे कुशल तंत्र अंतिम थरातल्यांना देण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर, एंजिनियर आणि इतरही तंत्रज्ञांची जाणीवशील मने मग समाजातला गाभा धुंडाळू लागतात. छोटया छोटया क्षेत्रांत लहान लहान, पण समरूप आखणीचे हे आकृतिबंध कृतीत उतरवताना त्यावर एक ट्रेड मार्क दिसला पाहिजे, कसोटीचा–जिद्दीचा.

रजतमहोत्सवाचे निनाद सर्वत्र उमटले आहेत. तो बिलोरी लख-लखाट दिपवून टाकण्यासारखा झळकला. कीर्तीची वलये अधिक देदीप्यमान भासू लागली. पण तरुण मनाने आता स्वतःला झुगारून द्यायची, आंदोलित करवून घ्यायची वेळ आली आहे. एका नेमक्या दिशेने स्वतःला खेचून न्यायचे. या संकल्पासाठी एका सूत्रावर ह्या प्रेरणा घासून पाहायच्या असतात. जास्तीत जास्त कृतिशील सम-र्पण आणि किमान व्यक्तिगत अभिलाषा ! नव्या ताज्या आविष्का-राचे ग्रहण, शिकण्याची तयारी, झेपावण्याची वृत्ती म्हणजे समर्पण, पण केवळ गुंगी आणणारे विचार किंवा सावल्यांशी मुष्टियुद्ध खेळणारा संघर्ष यांनी या संकल्पाला भरणपोषण मिळत नसते.

विफलतेतून नवी रचना निर्माण करताना किंवा पाशवी व्यवहारां-तून माणुसकी रुजवताना वास्तवाच्या परिघावर दक्षतेने वावरावे लागते. त्यासाठी विवक्षित अशा लेबलसची गरज नसते. झाडाला

चिकटलेल्या फळासारखे सहज सहकार्य गृहीत असते. संकल्प हा तेव्हा क्रियावाचक असतो. उद्याच्या वैभवासाठी सक्त कृतिशील रहायची तयारी असते.

सामाजिक जाणीवेच्या बांधिलकीतून, जबाबदारीतून अलिप्त राहून भागत नसते. आपल्या अपेक्षा आणि कर्तव्ये यांचा फरक करणे, छेद-रेषा काढणे त्याला जमत नसते.

पारदर्शी, शक्तिगर्भ असा त्याचा समर्पित प्रयत्न जुन्या विद्रूपतेच्या, मतभेदांच्या आणि अपूर्तीच्या खुणा पुसून टाकत असतो. प्रत्येक क्षणी ती निरामय चेतना स्वतःची खात्री पटवत असते. अंतःप्रेरणेशी इमान राखणाऱ्या प्रत्येकच माणसाला याचा अनुभव येत असतो. स्वतःच्या एखाद्या वस्तूवर हक्क दर्शवावा तितक्या सहजतेने तो कर्तव्यांना स्वतःशी जोडून घेत असतो.

याचे अपयश, कोसळणे हेही त्याला उत्तुंग उंचीवर पोचण्यासाठी उभारी देत असते.

एकेक तरुण मन आणि तरुण हात आता नव्या चैतन्याने एकवटायचे आहेत—उन्नयन बिंदू टिपण्यासाठी.

स्वातंत्र्याच्या रजतमहोत्सवातील दीपशिखा क्षीण होण्यापूर्वीच रेंगाळणाऱ्या इतिहासाला शीघ्रगतीने भविष्याशी जोडायचे आहे.

# दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद.....

जीवनाचा अर्थ जाणवत नसता, सर्वत्र वैफल्य आणि अंधार असता, माणसे का जगत राहतात याची माझ्या मते दोन उत्तरे आहेत. एक : जगण्याची वासना (लस्ट फॉर लाइफ). ही नैसर्गिक व उपजत आहे आणि अन्य जन्मजात प्रवृत्तींसारखीच ती जीवनावर स्वामित्व गाजवीत असते. दोन : अंधाराच्या तटबंद्या सभोवार असतात. पण त्यांतून डोकावून पाहायला प्रत्येकाला एक तरी झरोका असतोच. एस्किमोच्या बुटक्या झोपडीलाही झरोका असतो तसा अगदी तळभागी पडलेल्या माणसाच्या अस्तित्वालाही असा एखादा झरोका असतोच असतो. प्रकाशकिरणे त्यातून झिरपत असतात आणि भयाण अंधार उजळण्याचे त्यांचे काम सुरू असते.

जीवन निरर्थक असल्याची ही जाणीव आपल्यातच आहे असे नाही. जेथे समृद्धी अगदी ओघळून वाहात आहे अशा पाश्चात्य देशातही ही निरर्थकता आहे. आणि तिच्यातून सार्त्र-कामूची अस्तित्ववादी तत्त्वज्ञाने आणि बीटनिक्स व हिप्पींची पिढी जन्माला आली आहे. खूप गोड जिलब्यांनी जसा जीव विटतो तसा अतिसमृद्धीनेही तो विटतो !

मात्र त्यांच्या व आपल्या प्रश्नांचे मूलभूत स्वरूप एकच असले तरी त्यांचा आविष्कार वेगळा आहे. नुसताच पॉझिटिव्ह आणि नुसताच

निगेटिव्ह करंट शक्ती निर्माण करू शकत नाही. त्यासाठी त्या दोघांना एकत्र यावे लागते. भाव आणि अभाव एकत्र आल्याशिवाय आविर्भाव होऊ शकत नाही. जगातील वा देशातील आहेरे व नाहीरे यांतील तटबंद्या (कंपार्टमेंट्स) तुटल्याशिवाय दोघांचे वांझोटेपण व वैफल्य दूर होऊ शकत नाही. ह्या तटबंद्या तोडणारे कार्यक्रम कोणते ?

येथेच सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका (सोशल वर्कर्स रोल) येते असे मला वाटते. त्या छोटयाशा झरोक्यातून बाहेरच्या जगाकडे पाहायला लावणे हे त्याचे काम आहे. विधायक कार्य अशी कोंडी व अंधार गृहीतच धरीत असते आणि त्या झरोक्यातून मोठ्यात मोठा झोत कसा टाकता येईल याचा शोध ते करीत असते.
व्हाट ईज लेफ्ट—जे संपले आहे ते सोडा, उरले आहे ते पाहा—हे पुनर्वसनाच्या कार्यक्रमाचे सूत्र आहे. डोळे गेले असले तरी हात आणि हात नसले तरी पाय काय करू शकतात हे या शास्त्रात पाहिले जाते. हेच सूत्र जीवनात कामी पडू शकते.

सामान्य माणसाजवळ काहीच नाही की काय ? माझा सामान्य माणसाबद्दलचा अनुभव वेगळा आहे. सामान्य माणसाकडून मी असामान्य अपेक्षा बाळगून आहे. कारण सच्चाई अजून त्याच्याजवळ आहे. उदाहरणार्थ मुलाची शपथ घेताना अजून शंभरातली नव्याण्णव माणसे बिचकतात, पण पुढारी कोणतीही शपथ बिनदिक्कत घेतो, असा अनुभव आहे ! निष्ठेचे हे छोटेछोटे कण एकत्र करण्याचा मार्ग कोणता ?

समाजाचे जसे निरनिराळे थर असतात तसे जमिनीचे असतात. वरचा थर भुसभुशीत असला की पाण्यासाठी खोल खणावे लागते. पण वाळवंटातही टायगर ड्रिल दूरवर आत जाते आणि पाण्याचा झोत बाहेर वर येतो. समाजाच्या भिन्न थरांत निष्ठेचे पाणी असे दडलेले आहे. हिरोशिमाच्या विनाशात, आंधळ्यांत व महारोग्यांत हे पाणी मौजूद असल्याचे आढळून आले आहे. परिस्थिती स्फोटक

वाटत आहे. पण ह्या स्फोटक परिस्थितीचा सुरुंग लावून खोल आत दडलेला स्रोत का वर आणता येऊ नये ?

हे चिंतनाने व अध्यात्माने होणार नाही. माणसाच्या निष्ठा वाढीला लावण्याचे प्रयोग ठिकठिकाणी झाले पाहिजेत. ठिकठिकाणी अशा प्रयोगशाळा उभ्या झाल्या पाहिजेत. अपंग व परित्यक्त माणसे ही आनंदवनात नवजीवनाचे स्पंदन सुरू करतात तेव्हा ते पाहणाऱ्या माणसाची जीवनावरची निष्ठा आपोआपच वाढते. निष्ठा सांसर्गिक (काँटेजिअस) असते. माणूस वैयक्तिक जीवनाऐवजी सामूहिक जीवन जगू लागला की हा संसर्ग लवकर होतो. स्वतः-साठी जगण्यात आनंद आहे; पण दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद अधिक मोठा आहे. जनावर आणि माणसात हाच फरक आहे. आगीत होरपळणारे मूल बाहेर काढण्याचा आनंद हा निर्भेळ आनंद आहे. केवळ माणसालाच तो बुद्धीने व शरीराने भोगता येतो. हा आनंद ज्या विधायक कार्याच्या प्रयोगशाळांतून भोगता येईल त्याची आज गरज आहे. निर्मितीचा आनंद (क्रिएटिव्ह जॉय) आला की वैफल्य कमी झाले. दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद मिळू लागला की जीवनातली निरर्थकता संपली.

समाजातील दोन टोके एकत्र आणण्याचे प्रयोग जीवनाच्या सर्व क्षेत्रांत होऊ शकतील. खालच्या माणसाजवळ जाताना हा वरचा अथवा मधला पांढरपेशा माणूस का बिचकतो ? दोघांत काही सामान्य (कॉमन) नाही म्हणून ? पण दोघांतले दुःख आणि वैफल्य, दोघांचे हताशपण सामान्य नाही का ? हा दोघांना जोड-णारा धागा आहे. तो धागा धरून जीवनाला निष्ठा देण्याचे आंदोलन एवढे जोरात सुरू झाले पाहिजे. दोघांसाठी सामान्य कार्यक्रम, समाजातील निरनिराळ्या थरांसाठी सामान्य कार्य-क्रम मधल्या तटबंद्या तोडू शकतील आणि आपण कशासाठी तरी, कुणासाठी तरी जगतो आहोत असा आनंद प्रत्येकापर्यंत पोचवू शकतील. देशाच्या वखवखत्या पोटात मीही आहुती

घालतो, असे सुजाण समाधान लहान मुलापर्यंत प्रत्येकाला मिळाले पाहिजे. चीनच्या रेडगार्डस्‌कडून द्वेषभावनेच्या बळावर सामूहिक कृती करविली जाते. भारतीय मुलांना प्रेमभावनेच्या बळावर सामूहिक कृतीसाठी प्रवृत्त केले जाऊ शकत नाही काय ? देशाच्या तरुण पिढीचे किती तास आज क्यूमध्ये, बसमध्ये भटकण्यात वाया जात आहेत ! हा प्रश्न देशाच्या लाचारीशी निगडित आहे. हे तास कामाला जुंपण्याचे कोणते प्रयत्न सुरू आहेत ? विद्यार्थ्यांच्या को-आपरेटिव्हची मोठी चळवळ का सुरू होऊ नये ? त्यांची उन्हाळ्यांची सुटी कारणी का लागू नये ?

दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद आणि नवनिर्मितिशील जीवन जगण्याचा आनंद हेच अंतिमतः आपल्या सामाजिक वैफल्यावर तोडगा आहेत.

# पुनरुत्थानाची प्रक्रिया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
पु ०३४६ निबंध
२२३९ १|५०

जरा शेतकऱ्यांच्या जीवनाकडे तर नजर टाका. घरात भले फाके पडत असोत, भुकेने बेजार असोत, भुकेची आग शमवायला मोहाच्या फुलांची भाकरी दाती धरावी लागो, शेतकऱ्याची बायको आपले काळीज कठोर करते. ती दाणे निवडते. साफ करते. त्यातून चांगले दाणे निवडते. त्यांना औषधी लावते. आणि आपल्या हाताने मातीत गाडते ! शहरात रेशनच्या दुकानात धान्य खरेदी करणारे जे तरुण असतील ते हैराण होऊन विचारतील, कळत नाही,-कशी पागल बाई ही ! मुलांना उपाशी टाकून सारे दाणे मातीत मिसळते ! जेव्हा अशा प्रकारे दाणे मातीत रुजतात तेव्हा पुढे ते आपल्या कबरींतून उठतात, आणि उठतात, ते शेकडो दाणे घेऊन! ही पुनरुत्थानाची प्रक्रिया;—रेसरेक्शनच्या या प्रत्यक्ष दाखल्यापुढे मला बायबलातील पुनरुत्थानाची कथा उणी वाटते. शेतकऱ्यासारखी बी रुजवण्याची हिंमत आणि त्याच्या फुलण्या—फळण्यापर्यंत वाट पाहण्याचा धीर क्रांतिकारी तरुणाईत असायला हवा.

अफगाणांच्या मुलखात अक्रोडांची झाडे-बगीचे असतात. अक्रोडाला फळे येतात साठ—सत्तर वर्षांनंतर ! कोठे एक म्हातारा अक्रोडाची रोपे लावत होता. त्याला पाणी देत होता. कुणी विचारले, 'बुढे बाबा, हे सारे काय चालवलेत ? तुम्हाला काही याची फळे खायला मिळणार नाहीत. मग इतक्या जिवापाड हे सारे कशासाठी?'

त्या म्हाताऱ्याला कळत होते की, या अक्रोडाची फळे काही आपल्याला लाभणार नाहीत; कदाचित नातवांपणतवंडांना त्याचा लाभ होईल. पण त्याला धीर आहे. तेव्हा कुठे अक्रोडाचा बगीचा फुलतो. बी पेरून जो अशा प्रकारे वाट पाहू शकतो तोच क्रांती करू शकतो. बी पेरून दुसऱ्याच दिवशी जो माती उकरून अंकुर फुटला की नाही ते पाहतो, तो रुजवलेलेच उखडत नाही काय ? आजच्या क्रांतिकारी तरुणांना असे रचनात्मक कार्य रुचेल का ? पत्थराची छाती फोडून बी वर येते, पण त्याआधी स्वत:ला जमिनीत गाडून घेते. हा आहे रचनात्मक संघर्ष ! जो स्वत:ला अशा प्रकारे गाडून रुजवून घ्यायला तयार नसतो, त्याचा संघर्ष–संघर्ष नसतो. ते एक प्रदर्शन मात्र असते ! तो संघर्ष तुष्टी-पुष्टी देऊ शकत नसतो.

समाजाचा रथ रचना आणि संघर्ष या दोन चक्रांवर चालत असतो. रचनात्मक कार्य आणि संघर्ष म्हणजे राजकारण. या दोन चक्रांवाचून रथ पुढे सरकत नसतो. जगन्नाथाचा रथ काय एकाच रुळावर चालणारी मोनो रेल थोडीच आहे ? तुम्ही आपल्या रथावर पाहिजे तो ध्वज उभारा. लाल, निळा, हिरवा, पिवळा–कोणतीही पताका असो, तो रथ तर चालणार रचना आणि संघर्ष या दोन चक्रांवरच. बुद्धी आणि प्रयत्न यांचे संघटन, सामरस्य झाले नाही तर काहीच होत नसते क्रांतीच्या नावाखाली चालणारे सारे कार्यक्रम नाही तर केवळ मनोरंजनाचे, दिखाऊपणाचे कार्यक्रम बनतात. चीनमध्ये माओने बुद्धी आणि श्रम यांचे मजबूत संघटन केले. त्याचा कार्यक्रम सुदीर्घ होता, आवाज बुलंद होता. His programmes were long enough and loud enough. आमचे कार्यक्रम ना लांब पल्ल्याचे, ना बुलंद.

आपल्या ध्येयाची धुन, संकल्पाची मस्ती आपल्यावर स्वार झाली पाहिजे. संकल्पाचे निरंतर भान, अवधान म्हणजेच जप. लोक मंदिरात जातात, मठात अड्डे टाकतात, गिरिजाघरात, मशिदीत, गुरुद्वारात जप करण्यासाठी जातात. संकल्प आणि सिद्धीचे सतत

स्मरण ठेवणे आणि त्यातला अंतराय सतत कमी करण्याची कोशीस करणे म्हणजेच जप ! आपले कार्यच त्या अवस्थेत व्यासपीठ बनते. Work becomes your puplit. तुम्ही पाहिजे तर शेतात काम करा, कारखान्यात करा, पाहिजे तर शुश्रूषा करा, अध्यापन करा त्यातूनच तुमचा धर्म प्रकट होत असतो. You proclaim your religion through your deeds. आपल्या कर्मातूनच धर्माचा अविष्कार होत असतो, गप्पाटप्पांतून नव्हे. प्रवचनांतून नव्हे. गीता, कुराण, बायबल, ग्रंथसाहेब, अवेस्ता आदी धर्मग्रंथांतूनच केवळ धर्माची ओळख होत नसते, ती होते आपल्या कार्यातून. धर्माचा असा आविष्कार घडला विवेकानंदांकडून. वयही कितीसे होते ! इतक्या लहान वयात केवढे मोठे काम केले ! एक युवक देश-विदेशांत घुमतो, त्याच्या विचारणातून एका तुफानाची उत्पत्ती होते.

कार्यक्रम कसलाही असो, शेती असो, प्रबोधन असो: त्याचे तीन चरण असतात;–अध्ययन, संशोधन व विस्तार. या आधारावरच प्रत्येक काम उभे राहते. तिपाईचा एखादाही पाय लहान–मोठा असला तर ती उभी राहू शकत नाही, पडते. आणखी एक तिपाई आहे–स्नेह, विश्वास व शक्ती,–Love, faith an strength यांची. ज्याच्यासाठी काम करायचे आहे त्याच्याबद्दल प्रेम असायला हवे. केवळ निवडणुकीच्या वेळी जे प्रेम उफाळून येते ते असते पूतनामावशीचे प्रेम ! परस्परांवर विश्वास असायला हवा, तेव्हाच संघटनांची बांधणी होते. सेल निर्माण होऊ शकतो. टागोरांनी एके ठिकाणी म्हटले आहे: It should be as silent as river of honey. मधाची नदी भले उसळून वाहो, पण ती आवाज करीत नसते. शांतपणे पुढे सरकते. मधुरता पोचवत, वाटत ती सरकते. दूरदूरहून मधाचे कण गोळा करून आणून मधमाशी आपल्या मोहोळात ते साठवते, तसे आपले काम असायला हवे. पाच वर्षांचा निवडणुकीचा कार्यक्रम तर ज्वालामुखीच्या रसासारखा असतो. त्याला वळण कोण देणार? जो सदा रचनात्मक कार्यात मग्न असतो, तोच लाव्हा-रसाचा हा प्रवाह नीट वळवू शकतो. Who will

groom the political race horse–राजकीय शर्यतीच्या घोड्याची साईसगिरी आम्हांला करायची आहे. लोकशाहीत सामान्य माणसाची असामान्य कर्तृत्वशक्ती प्रकट होण्याची किमया रचनात्मक कार्यातच आहे. युवाशक्तीने याचे भान ठेवले पाहिजे. युवा तो : जो आपल्या कर्तृत्वाचा ठसा आपल्या कार्यावर उमटवतो. Youth puts his signature of human behaviour, of his humanity on every small action of life.

मला जाणवते, माझे शब्द चामडी उधडणारे, रक्तबंबाळ करणारे आहेत. I know, my words serve as a cracking whip, but believe me, the whip is on my own back and you can see the bleeding on it. पाहा ते चाबकाचे फटकारे, पाठीवर उमटून माझीच पाठ कशी रक्ताळली आहे ! मी जेव्हा बोलतो, तेव्हा मी बोलत नसतो; माझी वेदना बोलत असते. When I speak, it is a version of a man who has suffered a lot. It is not serman of a sage or a priest. I am not a saint. I am also a man with many pores. Through sweat I have sweetened my life. You can never sweeten your life without sweat. The moment you follow the path of love, faith and strength; of vision; passion and compassion; of education research and extention; friends, you are condemned to succeed. मी कोणी उपदेश देणारा संत–महंत नाही. लाखो दोष माझ्यात असतील. पण घामातून मी जीवनाला मधुरता आणली आहे. जर आपणालाही या माधुरीची गोडी चाखायची असेल तर स्वेदगंगेच्या किनारी तिने तर्र व्हा. जेव्हा प्रेम, विश्वास आणि सामर्थ्य यांचा; जेव्हा दर्शन, तळमळ आणि करुणा यांचा शिक्षण, संशोधन आणि विस्तारण यांचा असा रस्ता आपण धराल आणि एकेक पाऊल पुढे टाकाल तेव्हा आपला विजय निश्चित आहे !

# सृजनशील साहस.....

ज्यांच्या स्वप्नांचा धागा तुटला आहे असे अभागी या देशात पुष्कळ आहेत. स्वातंत्र्याच्या रणकुंडात अनेक युवकांनी, विद्यार्थ्यांनी आहुती दिली. ते धगधगते रणकुंड त्यांचे रक्त पिऊन शांत झाले. त्यांची आठवण आहे का आम्हाला ? स्वतंत्र झालेल्या ह्या देशात सामाजिक समता निर्माण करण्यात आम्ही कितपत यशस्वी झालो आहोत ? ज्या देशात हरिजनांना सार्वजनिक विहिरीवरदेखील मोकळेपणे पाणी पिण्याचाही अधिकार नाही त्या देशात कसली आली आहे लोकशाही ? सामाजिक समतेचे दर्शन खऱ्या अर्थाने झाल्याशिवाय ही लोकशाही फलदायी होणे शक्य नाही. देशातली सारी स्थिती विस्फोटक आहे. आजच्या तरुण पिढीला काही करावयाचे असेल तर निष्क्रियतेची, जातिभेदाची बंधने तोडली गेली पाहिजेत. ‘ भारत जोडो ’ हा आजचा खरा नारा आहे, खरी गरज आहे.

क्रांतीसाठी स्वेच्छेने दास्य पत्करावे लागते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रात स्वतःला गाडून घेणे म्हणजे हे दास्य पत्करणे. आपल्यापुरते एक क्षेत्र तरुणांनी निवडावे, त्यात अपार प्रावीण्य मिळवावे. रचनात्मक संघर्षाची रणभेरी गर्जवायची असेल तर अमाप बुद्धिमत्ता आणि अपार श्रम आवश्यक आहेत.

जाणिवेचा पक्षी ज्या शिक्षणातून मुक्त होतो ते खरे शिक्षण.

व्यथेची आच जाणवत नसेल तर ह्या शिक्षणाला काही अर्थ नाही. ह्या शिक्षणाने आम्हाला साक्षर बनवले खरे, पण सुजाण बनवले असे दिसत नाही. जीवनाच्या मळलेल्या पायवाटा चोखाळणाऱ्याला मी तरुण मानीत नाही. भोवतालच्या भीषण परिस्थितीत नवी वाट शोधावी लागते, त्याच वाटेचा राजरस्ता करावा लागतो, हे तरुणांनी करावयाला हवे. त्यांचेच ते कार्य आहे. स्वतंत्र भारतातली ही तरुण शिक्षित पिढी देशावर अंधारून आलेले आकाश पेलून धरणार नसेल तर या देशाला भवितव्य नाही. परदेशी अन्नावर जगणाऱ्या या तरुण पिढीचे सत्व हरवलेय. तिच्या संवेदनांचा शर हरवलाय. पंचवीस वर्षांत हे स्वातंत्र्य म्हातारे झाले आहे. सूर्याची दिशा पाहून छत्री बदलणे ह्याचाच अर्थ जीवन, असे मानले जाऊ लागले आहे.

देशाच्या आजच्या तरुण पिढीकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. जगातील अन्य राष्ट्रांच्या समृद्धीच्या प्रचंड प्रकाशझोतामुळे दिपून गेलेल्या ह्या देशाला खरी वाट दाखवण्याचे कार्य त्यांनाच करावयाचे आहे. कुतूहलाचा थरथरता दिवा हातात घेऊन, त्याच्या मंद प्रकाशात जीवनातली अनोळखी, काटेरी वाट निर्भयपणे तुडवीत जाताना कल्पनेला सहचारिणी मानून फिरायला माझी हरकत नाही. पण विवेकाला वाटाड्या म्हणून सोबतीला अवश्य घ्या. जीवनाची माणसाला ही आज्ञा आहे. शतकानुशतके मानवाचे दुःख गुडघ्यात मान घालून अश्रू ढाळीत बसले आहे. जीवनाच्या फुटलेल्या आरशात स्वतःला न्याहाळत आहे. हे दुःख त्या तरुण नजरेला दिसत नसेल तर ह्या शिक्षणाचा काय उपयोग ? मानवतेवर निरंतर होणारा अन्याय असाच तुम्ही दृष्टीआड करणार काय ?

ज्यांना अन्यायाकडे डोळेझाक करायची सवय लागते त्यांना प्रकाशाची कूस कधीच कुरवाळता येत नाही. ढगांचा चिखल तुडवीत, विजांचा आसूड उडवीत ज्या वेळी लोक चंद्रावर पोचत आहेत,

त्या वेळी भमरागडच्या परिसरात भुकेने तहानेने पाणी मिळत नाही म्हणून अनेकांचे प्राण कंठाशी आलेले आहेत–अशी स्थिती आहे. ते कुरूप दारिद्र्य कोण दूर करणार ? या देशातला ९२ टक्के युवक राजनीतीपासून दूर आहे. ही ' सायलेंट मेजॉरिटी ' 'सायलेन्स मेजॉरिटी'त परिणत होते ! आज मुक्या असणाऱ्या बहुसंख्येला उद्या जरबेने गप्प बसवले जाते. ती सुस्त शक्ती कोण जागवील ? कार्यरत युवाशक्तीची स्थिती या देशात अल्सेशियन कुत्र्यासारखी आहे ! कुठलाही राजकारणीपक्ष आपला पट्टा तिच्या गळचात अडकवतो व स्वःतच्या इशाऱ्यावर तिला नाचवतो, भुंकवतो. हा प्रकार ही तरुण पिढी सहन कशी करते ? तिच्या मनाचा हा महारोग कसा दूर करता येईल, हा प्रश्न मला नेहमी छळत असतो.

ज्या देशातले काही विद्यार्थी तावदाने फोडण्यात पुरुषार्थ मानतात, त्याच देशातले दुसरें काही विद्यार्थी मातीशीही मैत्री करतात, सृजनशील साहसाला सीमा नसतात, त्याच्या कवेत आकाश सामावलेले असते. इथे अशा सृजनशील साहसाची मला पावती मिळते आहे. इथल्या योजनांना मातीचा स्पर्श आहे, श्रमाच्या संगमतीर्थावर एक नवे स्वराज्य उभे करण्याचे स्वप्न त्या 'पराभूत-प्रेषिता 'ने पाहिले होते. त्याच्या तेजस्वी परंपरेतील विद्यार्थ्यांनो, तुम्हाला निर्माण करता येण्यासारखे पुष्कळ आहे. निर्मितीची प्रेरणा ही गात सुटते. ती कधी विवरण करत नाही. माझ्या आनंदवनात एक शाळा आहे. ' प्रकाशाची शाळा ! ' आंधळ्या मुलांच्या त्या आंधळ्या डोळ्यांच्या पापण्यांना प्रकाशाची कवाडे पहायची जिद्द आहे. त्याच्या हजारपट जिद्द तरुणांच्या ह्या उघड्या डोळ्यांत का असू नये ? शतशः खंडित झालेल्या जीवनातूनसुद्धा एक ' पॅटर्न ' निर्माण होत असतो. पण ते निर्माण करायला स्वतःला संकटांमध्ये झोकून द्यावे लागते. जखमांची आरास अंगावर असलेल्या महारोग्यांनी स्वतःच्या श्रमातून ' आनंदवन ' उभे केले. प्रचंड कॉलेजे उभी केली. ज्वालांच्या जबड्यात उभे राहून अशा अखंड जिद्दीने लढणारे युवक आज सर्वत्र हवे आहेत. मित्रांनो

वैफल्याच्या वेदना सर्वत्र आहेत. 'फेलोशिप ऑफ अनरेस्ट' असंतुष्टांचा भाईचारा, 'फेलोशिप ऑफ मर्सी' करुणेचा भाईचारा सगळ्या ठिकाणी 'कॉमन' आहे. घोषणांच्या दगडावर ठेचाळत जाणाऱ्या देशाला विकासाच्या राजरस्त्यावर आणायचे असेल तर येथे नवा आचार, नवा विचार रुजवला पाहिजे. विचारांचे असे उन्नत संकर ज्या देशात होतात तिथला पालापाचोळाही वेळप्रसंगी गगनाला जाऊन भिडतो. हे सगळे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी तुम्हा तरुणांची आहे.

नुसत्या महारोग्यांच्या जखमा धुऊन मनाचे महारोग दुरुस्त होत नाहीत, म्हणून मी बाहेर पडलोय. देशातला तरुण एका भीषण वावटळीत सापडलेला दिसतो. त्याच्या, कार्याच्या आंदोलनाच्या दिशा त्यालाही नीट कळलेल्या नाहीत. वाटाडे सारे अपयशी ठरलेले आहेत. स्वतःची वाट आता स्वतःच घडवायला हवी. 'गरीबी हटाव' सारख्या पोकळ घोषणांनी आणि लहानसहान 'कोकाकोला रेव्होल्युशन्स'मुळे हे प्रश्न सुटणार नाहीत. आता 'शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई' म्हणणाऱ्या बेगुमान तरुणांच्या संघटना रचनात्मक संघर्षाकरता बाहेर पडायला हव्यात.

क्रांतिकार्याला दर्शन, तळमळ आणि करुणा यांची जोड हवी. श्रमतीर्थावर श्रमदेवतेची पूजा करणाऱ्या तरुणांचे प्रचंड मेळावे एकत्र यायला हवेत. साने गुरुजींनी हे स्वप्न पाहिले होते. आपल्याला हे स्वप्न साकार करायचे आहे. तरुण मित्रांनो, दीर्घकाळ ह्या देशाच्या जमिनीत रुतून बसलेल्या विषमतेची पाळेमुळे खणून काढण्याचे मूलगामी कार्य आपल्याला करावयाचे आहे. याला खूप वेळ लागेल, पण जिद्दीने उभे राहायला हवे. जगायचेच असेल तर असे जगावे की ज्याच्यामुळे समाजाला, देशाला अभिमान वाटेल.

मी तरुणांच्या जगाचे विविध रंग पाहिले आहेत. जर्जर, ग्रस्त, खंडित, रोगट, विलासी तरुण पिढीचे 'अंडर वर्ल्ड' भूमिगत जग

मला माहीत आहे. माझी प्रचंड निराशा ह्या तरुण जगताने अनेकदा केली, तरी पण मला आशा वाटते, विश्वास वाटतो– ह्यातून मार्ग निघू शकेल. वसंताच्या सौंदर्याची अक्षरे धुळीच्या धुळाक्षरात पुन्हा लिहिली जातील. माणसाला दोन्ही रूपे आहेत. एक देवदूताचे, दुसरे माकडाचे ! वेदनेच्या गडद अंधारात उतरण्याची देवदूतासारखी हिंमत आजच्या तरुण पिढीने जागवावी. मला तो माडिया, त्याचे दु:ख-दैन्य आव्हान देत आहे. मित्रांनो माझ्याबरोबर हे आव्हान स्वीकारा. वैफल्याची वाकळ पांघरून बसलेल्या त्या जगाकरता समृद्धीची भांडारे तुम्हीच रिती करू शकाल. हे ने, ते ने वृत्तीच्या नेत्यांच्या अंगी ते सामर्थ्य नाही ! ज्या देशात नेतृत्वाची केवळ वक्तृत्वाशी गाठ असते, जेथे चारित्र्याचे शिलाभंग अव्याहत होतात, तेथे 'यूथ-क्वेक्स' – युवाकंपही अधिक होतात. ह्या उफाळणाऱ्या लाव्हांशी हितगुज करायला मी निघालो आहे. तुमच्या पिढीने बांगला देशाचा प्राण पणाला लावून चाललेला मुक्तिसंग्राम प्रत्यक्ष पाहिला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीकरताच केवळ असे झुंजावे लागते असे नाही. स्वातंत्र्यरक्षणाकरताही अशाच झुंजी द्याव्या लागतात. केवळ इतिहास वाचून इतिहास घडत नसतो. इतिहास घडवण्याकरता सृजनशील साहस उराशी कवटाळावे लागते.

ज्यांना समाजाने सदैव परके मानले, ज्यांची सावली पडणेही पाप मानले गेले, दया म्हणून शिळ्या भाकरीचा तुकडा उदारपणे ज्यांच्या अंगावर भिरकावून दिला जात होता, ज्यांच्या हातापायाची बोटे झडली होती, डोळ्यांच्या खाचा झाल्या होत्या, शरीर ज्यांचे क्षतविक्षत झाले होते; अन्याय, अपमान, उपेक्षांचे कडू प्याले ज्यांनी चकार शब्द न बोलता रिचवले होते – आज त्याच महारोग्यांचा माथा उन्नत आहे. पण म्हणून काय झाले ? तेवढ्याने सारे संपले का ? आजही हरिजन स्त्रियांची निर्वस्त्र मिरवणूक दिवसाढवळ्या निघू शकते ! हरिजनांच्या झोपड्या जाळल्या जाऊ शकतात ! त्यांना प्यायला पाणी मिळू दिले जात

नाही ! तुमची दया, सहानुभूती अजूनही त्यांच्यापर्यंत पोचत नाही. ‘मानव का मानव से मुक्त मिलन चाहिए ’– केवढे मोठे, केवढे भव्य दिव्य स्वप्न आहे हे ! ! हे स्वप्न केवळ शब्दांतून साकार करून उपयोग नाही...ते आपल्या अखंड श्रमातून साकार व्हायला हवे आहे. ज्या समाजाचा संवेदनेचा शर हरवला आहे व ज्या समाजाचा भाता रिता आहे, त्या समाजाच्या नशिबी अशा स्वप्नांची पूर्ती नसते. अशा समाजाच्या हाती असलेल्या रिक्त धनुष्यांतून हुकूमशाही निर्माण होतात.

तरुण मनांच्या प्रेरणांना व भुकांना आपल्या खड्या समस्यांशी जोडले पाहिजे. तरुण मनांच्या गरजांचे थवे, वैफल्याच्या वाळवंटांतून वाटचाल करीत जेथे उतरू शकतील त्या हरित भूमीच्या शोधात माझे व्हिजन आहे. माझ्या स्वप्नांची बोटे धरून आनंदवनातील व्याधितांनी त्यांना कोठल्या कोठे आणून पोचवले ! माझे व्हिजन त्यांच्या कर्तृत्वशाली पावलांमागे फरफटत गेले ! त्या अपंगांचा पराक्रमी कारवाँ ज्या वाटेने आनंदवनात येऊन पोचला, सोमनाथाला निनादला, त्या पावलांच्या ठशांचा मागोवा घेत तरुणांचा हा कारवाँही आपले लक्ष्य गाठणार आहे.

# जीवनाच्या सुगंधी मिठीसाठी

चंद्राला कवेत घेण्यासाठी उड्डाण मारण्याचा खेळ हनुमंताने केला होता, पण ती पुराणातील वांगी पुराणात न ठेवण्याचा पराक्रम आज तुमच्या युगातील मानव करून दाखवीत आहे. ढगांचा चिखल तुडवीत आणि विजेच्या चाबकाचे फटकारे हाणत तो आज चंद्रावर पोचून तिथे भटकू फिरू लागला आहे. अशा काळात आपण आहोत हे विसरता कामा नये. साने गुरुजींची धडपडणारी मुले याचे भान राखणारी हवी. गुरुजींनी आपले सर्व जीवन रचनात्मक कार्य करण्यात वेचले. स्वराज्य मिळून पाव शतक पुरे झाले, पण पंचवीसाव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या आपल्या जवान स्वराज्याला म्हातारपण आले आहे आणि त्या कुबड आलेल्या म्हातारपणाची झळ तुम्हाला पोहचू लागली आहे! अशा वेळी रचनात्मक संघर्षाचा मंत्र पुढे येत आहे आणि आज राष्ट्रसेवेचा तोच एक मार्ग आहे.

रचनात्मक कार्य व संघर्षाची तयारी यासाठी एक प्रकारचे सहकार्य लागते. जमिनीत खोल गेलेली मुळे, त्याच्या फांद्या, त्याची पालवी – पाने यात असे सहकार्य असते. त्या पालवीला जीवन मिळून फुला-फळांचा बहर येण्यासाठी वृक्षांची मुळे पाण्याचा शोध घेत जमिनीत किती दूर वर व खोल खोल पोचतात! त्या एवढ्याशा गुलाबी मुळांत दगडांचे कठीण स्नायू फोडून वृक्षाला, त्या पालवीला ओलावा मिळवून देण्याची ताकद असते " Ten

commandments do not make Moses ... प्रेषिताने १० कलमी सूत्रे सांगितली म्हणून मोझेस सारखा संत निर्माण होत नाही, प्रेषिताचा संदेश, वृक्षांची ती कोवळी मुळे, समाजाच्या खालच्या पातळीवर सर्वदूर नेण्याचा पराक्रम करतो तोच संत ठरत असतो, संत मानला जातो.

एका वृक्षाचे अनेक वृक्ष कसे होतात ? असंख्य रंगीबेरंगी पक्ष्यांना विसावा देणारे, श्रांत प्रवाशाला सावली देणारे पिंपळ निर्माण कसे होतात ? कुठे एखादा पक्षी फळ फोडून पहातो, त्याचे बी गिळतो. पंख फडफडवून तो पुन्हा उडतो व उडताउडता विष्ठाही टाकतो. त्या विष्ठेतून ते गिळलेले बी एखाद्या विहिरीच्या भिंतीच्या कपारीत, एखाद्या दगडकपारीत पडते. थोड्याच दिवसांत तिथे लालसर पिंपळाचे रोपटे उगवते व हां हां म्हणता वाढते आणि ते वाढण्यासाठी त्याची कोवळी लुसलुशीत मुळे खाली सारखी धडपडत असतात. साने गुरुजींचे स्वप्न पुरे करण्यासाठी अशी धडपड हवी. My vision walks ar foot with me-माझी दृष्टी माझ्यापुढे एक पाऊल ठेवून नेहमी मजबरोबर चालत असते पण केव्हा ? जेव्हा करुणेने ओतप्रोत भरलेले असे हृदय घेऊन मी निघातो तेव्हा. आपल्या उद्दिष्टांबद्दलची साफ आणि स्पष्ट दृष्टी, ते उद्दिष्ट गाठण्याची जिद्द आणि हृदयांत भरलेली अपार करुणा ही त्रिसूत्री नेहमी कामी येते.

आणि योजनाही हवी. पण योजना आधी भान राखून आखायची असते आणि मग बेभान होऊन ती राबवायची असते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात योजनेचे साम्राज्य सुरू झाले. पण राज्यकर्त्या काँग्रेसपासून तो जहाल–मवाळ विरोधी पक्षांपर्यंत सर्वांचे एकमत आहे की या काळात गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आहेत, होत आहेत; पण ‘गरिबी हटाव’ ही योजना कोणाचकडे नाही. सर्वांमध्ये इक्वॅलिटी ऑफ कन्फ्यूजन-गोंधळाची समता आहे ! ‘सुंदर मी होणार’ सारखी नाटके जिथे चालतात

त्या मुंबापुरीच्या सुंदर चेहऱ्यावर ही झोपडपटचांची, गलिच्छ गरिबीची महारोगी विद्रूपता पसरली आहे, फुलून उठली आहे! त्या मुंबईला 'सुंदर मी करणार' अशी युवकांची प्रतिज्ञा हवी. जुनी पिढी म्हणते, हे जग म्हणजे तंदुरुस्त न होणाऱ्यांचे एक रुग्णालय आहे. अशी ती नैराश्यवादी पिढी. दुसऱ्या बाजूला 'झटपट' क्रांती करू पाहणारे उतावीळ बदलवादी पण आहेत. आम्हाला जन्माला घालण्यापूर्वी आमच्या आई-बापांनी विचारलेच नव्हते असे म्हणून सर्व प्रस्थापित नियम झुगारून देऊ पहाणाऱ्यांची ही जमात! ही सर्व माणसे एक प्रकारचे बंदिस्त जीवन जगतात. असुरक्षिततेची थरथरणारी भीती त्यांच्या हृदयाला वेटाळून बसलेली असते आणि हृदयात कारुण्य असलेच तर ते हृदय काचेच्या तावदाना-सारखे असते. विपरीत परिस्थितीचा हातोडा त्यावर पडला रे पडला की त्याचे शतसहस्त्र तुकडे पडतात!

हृदय असावे पोलादासारखे. तापवले तर रसरसते, पण त्यावर घाव घालून त्यातून पाणीदार तलवार तयार होऊ शकते, आणि पोलादाचे दोन गरम भाग एकत्र केल्यावर जसे ते एकरूप होतात तशी दोन तप्त-हृदये एकत्र येतात तेव्हा त्यातून पोलादी ताकद निर्माण होते. दलित-पतित समाजाला न्याय मिळवून द्यायला हृदयाची संवेदना जिवंत असावी. झोपडपट्ट्यांतून हाडांच्या ऐरणी-वर भुकेचे धाव पडतात, ते तुम्हाला ऐकू आले नाहीत तर म्हणावे लागेल की महारोग्याच्या संवेदनाशून्य शरीराप्रमाणे तुमची –हृदये सुद्धा संवेदनाशून्य झाली आहेत. यालाच मी म्हणतो मनाचा महा-रोगी! या रोगावर वेळीच इलाज करावा लागतो, नाहीतर समाजशरीराची पतझड झाल्यावर वाटेल "अरेरे हे सहकार्याने, प्रेमाने झाले असते. हे वेळीच करायला हवे होते." संवेदना हर-वून बसलेल्या सद्सद्विवेक बुद्धीचे शेपूट पिरगळल्याशिवाय ती जागृत होणार नाही. त्याशिवाय जगन्नाथाचा रथ पुढे जाणार नाही. रचनात्मक कार्यक्रमातही तोच तो पणा चालत नाही. बागे-तील पाऊलवाटेप्रमाणे रचनात्मक कार्यक्रम नसावे, कारण त्या

पाऊलवाटा शेवटी एकाच दारापाशी नेतात. नवे रस्ते शोधावे लागतात, मळावे लागतात, हे काम तरुणांचे आहे. हरदासी तट्टावर बसून जीवनाची शर्यत जिंकता येत नाही. शर्यत जिंकतो आगाखानी पोसलेला घोडा आणि त्यावर घट्ट मांड घातलेला जॉकी. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीवर आरूढ होऊन, ठाण मांडून तिला काटेरी टाच हाणाल तेव्हाच जीवनाची शर्यत जिंकाल. असे जॉकी तयार करण्यासाठी युवक संघटना असतात, असाव्या.

अर्जुनाच्या रथाचे सारथ्य कृष्णाने केले म्हणून अर्जुन लढाई जिंकला. आपल्या घोड्यावर कृष्णाचे प्रेम तरी किती पहा ! त्याला चंदी द्यायला तो आपला पितांबर वापरी. स्वतः आपल्या घोड्यांचा तो प्रेमाने खरारा करी. त्याला कोणते काम हलके असे नव्हतेच. राजसूय यज्ञात त्याने पत्रावळी उचलून टाकल्या. साने गुरुजींनी-सुद्धा असेच आपले आयुष्य वेचले. धारावीची घाण आपल्या हाताने उपसली समाजाच्या मनातील घाण उपसण्यासाठी अखेर-पर्यंत धडपडले. तुष्टी आली की सुस्ती येते. माणसाची मस्ती टिकावी म्हणून हवा असंतोष ! पण असंतोष असावा स्वतःबद्दल; संस्थेबद्दल, नेत्यांबद्दल, परिस्थितीबद्दल नव्हे. जीवन ही काही तक्रारपेटी नव्हे ! पतंगासारखे जीवन उंच उंच जायला हवे असेल तर त्याचा बळकट मांजा आपल्या कुशल हातात खेळता ठेवावा लागतो. सुटलेल्या मांजाप्रमाणे जीवनांतील क्षण पकडावे लागतात. ते क्षीण असतात, पण क्षीण असे क्षणही बलदंड बाहूत पकडावे लागतात. वेळीच पकडावे लागतात. महारोगाचे माझे काम. त्यासाठी मला दीक्षा दाखविली येशूने, गांधींनी आणि विनोबांनी. येशूला रस्त्यात कडेला धुळीची संगत घेतलेला एक महारोगी दिसला. यू आर डेड टू धिस वर्ल्ड, बट अलाइव्ह टू द किंगडम ऑफ गॉड—तू या जगाला मेला आहेस, पण परमेश्वराच्या राज्यात तुला जीवन आहे असे म्हणून लोकांनी त्याला धुळीचीच सोबत दिली होती. येशूने त्याला पाहताच म्हणले, बी दाउ क्लीन—मित्रा निर्मळ हो, असे म्हणून आपल्या करुणामय ओठांचा ठसा त्याने

त्या रोग्याच्या कपाळावर उमटवला ! अनेक शतकांनंतर गांधींनी परचुरेशास्त्रींना महारोगाच्या अंतिम अवस्थेत आपल्या शेजारी आणून ठेवले आणि त्यांच्या थरथरणाऱ्या दुःखाच्या पाठीवर त्यांनी आपले प्रेममय हात फिरवले ! त्यानंतर विनोबांनी एक नवीन दृष्टी दिली. महारोग्यांच्या जीर्ण खांद्याला खांदा घासत ते दत्तपूरच्या भातशेतीत – चिखलात उतरले, धानाच रोवण करायला, तेव्हा ही दृष्टी प्रकट झाली. असे जगावे दलित वर्गाबरोबर खांद्याला खांदा लावून तेव्हाच त्या वर्गाचा पराक्रम जागा होतो. समाजकार्य करण्याची अहंताही कार्यकर्त्यात राहात नाही जेव्हा तो दलितांसाठी राबत नाही, तर दलितांबरोबर परिस्थितीचा मुकाबला करीत असतो.

वधस्तंभाकडे जाणाऱ्या येशूच्या आईचे अश्रू ज्यांना दिसले त्यांनी येशूचा संदेश विपरीत परिस्थितीत सर्वत्र पोचविला. आपल्या भोवतालचे दुःख युवकांच्या हृदयाला हालवत नसेल तर संवेदनेचा शर ते हरवून बसले असे होईल. आणि तसे नसेल तर वेळीच पाऊल पुढे पडले पाहिजे-वेळीच प्रत्यंचा ओढून शिकाऱ्याने शरसंधान केले नाही तर शिकार हातची जाणार नाही काय ? आज हाडांची काडे करून अन्न पिकविणारा अन्नान्न दशेत, हातमागावर डोळ्यांत तेल घालून सुंदर रंगीत साडी विणत आपल्या स्वप्नाचे धागे गुंफणारा अर्धनग्न, शहरातील मशीनच्या थरथराटांत आपल्या हाडांची होळी करणारा मजूर आपल्या बरगड्यातच बंदिस्त, हे सर्व दुःख पाहून मनाची संवेदना, जाणीव नष्ट न होऊ देता. ते दुःख निवारण्यासाठी व्हर्ल विंड कोर्टशिप वुइथ डेस्टिनी–नियतीशी झंझावाती सलगी करावी लागते. अशक्य गोष्टी अशक्य रस्त्याने आणि अशक्य अशा थोड्या वेळात संतच करून दाखवितात. पण राजकीय पक्षांना त्यासाठी खूप तपश्चर्या करावी लागते. नुसती मतपेट्यांची प्रणयराधना करून चालत नाही. त्या पेट्यांतून पुढे येणारे बॅलट बॉक्स हिरो–मतपेटीचे वीर हे सामाजिक कार्याची दिशा नसलेले, ज्यांचे नीट ग्रूमिंग झालेले नाही– खरारा झालेला नाही

असे कोणीही गल्लीपती असू शकतात. त्यांना बरोबर घेऊन दिल्लीपती होण्याची घाई जे राजकीय पक्ष करतात त्यांचे पानपत झालेले आपण पहातो. म्हणून रचनात्मक संघर्ष.

प्रकाश देणारा आपला कंदील. त्या कंदिलात तेल, वात व त्या वातीभोवतीची काच, आगकाडी या सर्व गोष्टी हव्यात. तेल, वात आणि काच म्हणजे रचनात्मक कार्य. हे काम जे करत असतील त्यांनी संघर्षही करावा त्याशिवाय ज्योत पेटणार नाही. त्यासाठी मन सज्ज असू द्या. ती आगकाडी सुकी राहू द्या.

महारोगाच्या कामात मी का उतरलो ? महारोगाची माझी भीती जावी म्हणून. माझ्यासाठी मी ते काम पत्करले. महारोगी सेवा हा नुसता बाय प्रॉडक्ट आहे. तो क्षण महत्त्वाचा जेव्हा माझ्या प्रश्नाचे उत्तर मी शोधू लागतो. किरण डोकावत असताना, दरवाजा बंद होण्यापूर्वी, जो प्रकाश किरण पकडण्यासाठी मी माझे पाऊल पुढे टाकले तो क्षणच महत्त्वाचा. मग वैफल्याला जागा राहात नाही. आज समाजवादी चळवळीत वैफल्य आहे. सर्व राजकारण घोषणांनीच भरल्यामुळे हे वैफल्य आहे ! नगरपालिकेचा कंदील हा प्रकाश देण्याएवजी जणू रात्र असल्याची जाणीव देण्यापुरताच तेवतो ! तसे हे घोषणायुक्त राजकारण कामी पडणार नाही. गांधींनी सावली रहाट जनतेपुढे ठेवला तेव्हा मध्यमवर्गियांत त्यांची किती थट्टा झाली ! उपहास झाला ! पण त्या चक्राभोवती गांधींनी १४ कलमी कार्यक्रम गुंफला. सामान्य माणसातील असामान्यत्व जागृत करणारा तो कार्यक्रम होता. झोपडपट्ट्यांतील हे असह्य जीवन. तो मटका, ती दारू, ती कुरूप दरिद्रता, ते वैफल्य या दलदली नाहीशा करण्यासाठी लोकांबरोबर जीवन जगून काम करणारे बेभान तरुण हवेत. हे दैन्य, ही घाण यांतूनच नवजीवनाचे कमळ विकसित होऊ शकेल. राजकारणी मिठ्या ‘ संविद ’मधून फार झाल्या. आता विधायक शक्तीला जागृत करणाऱ्या युत्या हव्यात. तरुण तो जो आव्हाने उचलतो. जीवनाला सुगंधी मिठी

मारण्यासाठी दऱ्याखोऱ्यांत उतरले पाहिजे. मधमाशांप्रमाणे विधायक कामाची मोहोळे ठिकठिकाणी निर्माण केली पाहिजेत.

जलधारांचा ताणा व नांगरटीचा बाणा यांनी मनाची मशागत व्हायला हवी. म्हणून सुरक्षिततेचा सतत अभाव असलेल्या जीवनाशी आपले जीवन जोडणारे तरुण हवेत. माडिया गोंडांचे जीवन हल्ली खूप गाजले आहे. अडीच रुपये किलो मीठ विकत घेण्यासाठी, आपल्या जंगली सुरक्षिततेपासून माडिया गोंड पंचवीस-तीस मैल प्रवास करत दुकानदारी गावी येतो ! त्या गोंडांच्या दारापर्यंत स्वस्त मीठ गाढवाच्या पाठीवरून वाहून नेऊन पुरविणारे तरुण हवे आहेत, असे तरुण मुंबईचा चेहरा मोहराही मग बदलू शकतील.

आनंदवनात महारोगाच्या 'ट्रीटमेंट' बरोबरच पुनर्वसाहत पण होत आहे. वेदनेच्या समान धाग्यात तिथे सर्वांचे जीवन ओवले गेले आहे. म्हणून ते आपला पराक्रम गाजवू शकले. रोगी शरीरात निरोगी मन आनंदवनात मिळाले, तसे बाहेर निरोगी शरीरात रोगी, वैफल्याने भरलेले मनही पहात आहे. वैफल्याची वाकळ जे जे पांघरतात त्या सर्वांनी एकत्र यायला हवे. नवे नवे प्रकल्प उभारायला हवेत. व्हेकेशन व्हॉलेंटियर्सचे – सुट्टीचा वेळ देणाऱ्या स्वयंसेवकांचे जथ्थे उभे व्हावे. श्रमशिबिरांतून परस्पर नाती जुळवली गेली पाहिजेत. मग योजनांचे सत्र उभे करता येईल. यशाची व्याख्या स्पष्ट असली म्हणजे जीवनावर निराशेची सावट पडणार नाही. यश म्हणजेही एक थडग्यावरील खुणेचा दगडच असतो. त्या थडग्यात जे विसावलेले असते ते असते एका वेळचे जिवंत, ज्वलंत काम. त्यामुळे तरुण मन यशासाठी आसावलेले नसते. थडग्याशी प्रणय कोण करील ? आणि सुख म्हणजे तरी काय ? सर्जनाच्या कामात स्वत:ला सतत विसरून जाणे म्हणजे सुख. तरुणांनी अशा सुखाचा पाठलाग करावा. तरुण तो जो इतिहासात रममाण होत नाही, तर इतिहास घडवतो. तो नवीन रस्ता बनवतो. धोपट मार्ग सोडून देतो. स्वेच्छेने तो सक्तीचा एकान्तवास-क्लीअरकट. लोन लीनेस पत्करतो. युवक संघटनांतून असे तरुण समाजाला मिळावेत

# उषःकालची वाटचाल

दर्यावर लाटांचे तुफान तांडव चालले होते. त्या उफाळत्या लाटांवर थोड्याच वेळात एक विलक्षण दृश्य चमकू लागले. आकाशात रंगी-बेरंगी प्रकाशाचे झोत रात्रीच्या अंधारात झळकू लागले. आस-पासच्या विभिन्न देशांच्या बोटींच्या कप्तानांनी परस्परात संदेश पाठवून ते झोत सोडले होते. आणि सागराच्या लाटांवर तिरंगी प्रकाशपट्टा नाचू लागला. प्रकाशरेखा आणि ते परावर्तन अपूर्व होते ! भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची कप्तानांची ती अभिनव कल्पना. पंधरा ऑगस्ट एकोणीसशे सत्तेचाळीसची ती रात्र माझ्या डोळ्यांसमोर स्वच्छ तरंगते आहे. मी आणि साधना, राम-दास बोट पहायला सागरावर मचव्यातून निघालो होतो. बेफिकी-रीने धनदौलत लुटून द्यावी तशा मस्तीत सागर होता. स्वातंत्र्य-दिनाच्या आनंदाचे उधाण लोकांतही आले होते.

लाटांवर तरंगणारा तो विस्तीर्ण तिरंगा म्हणजे स्वातंत्र्याच्या उत्साहाचे, एकतेचे, देशाच्या आशाआकांक्षांचे, भवितव्यातील स्वप्नांचे मनोज्ञ प्रतीक होते.

आरस्पानी संगमरवरावर धूळ साचलेली असावी, तशी गेल्या पंच-वीस वर्षांच्या अगणित अपेक्षांवरील धुळीची पुटे फुंकरीने उडवताना काय दिसते ?

सामान्य माणसाच्या पाठीच्या कण्याचे हाड निखळावे अशी परिस्थिती अनेक बाबतीत आढळते ! बिलोरी स्वप्ने तडकली. धिप्पाड पिढीचे बोट धरूनही काटचाकुटचात आकांक्षा रक्ताळल्या.

पण ह्या वेदनांबरोबरच बुलंद समाधानाचे काही रेखीव स्फटिकही आढळतात. देशाची प्रतिमा आणि इज्जत कधी नव्हे त्या उत्तुंग पातळीवर आज विलसते आहे. जिद्दीने जवानांनी पराक्रम गाजवला. तेजपूरच्या तेजोभंगाचे लांच्छन धुतले गेले. आणि बांगला देशाच्या विजयाने तर निराशेला फुटबॉलसारखे लाथाडून दिले. युवाशक्ती स्वातंत्र्योत्तर काळात आपली विविध रूपे प्रकट करू लागली. काही अक्राळविक्राळ. पण हात उभारणीसाठी असतात, हेही तरुणाईला निश्चित जाणवले आहे. माझ्या डोळ्यांसमोरील राष्ट्रप्रतिमा अधिकच स्वच्छउत्कट झाली आहे. माय होल लँडस्केप इज रिफ्रेशड.

स्वातंत्र्याने निर्माण केलेल्या मनोरम भव्य स्वप्नांनी सामान्य माणूस दिपून जावा, असेच तेव्हाचे वातावरण होते. गुलामीच्या जोखडातून बलदंड देश मुक्त झाला. तसाच तो सामाजिक अन्यायांतून, रूढींतून, दैन्यदारिद्र्याच्या कचाटचातून सुटेल; नेते आपली शक्ती पणाला लावून हे घडवून आणण्यात कसूर करणार नाहीत, अशी खात्री वाटत होती.

ती निरभ्र शांतता (क्लाउडलेस सायलेन्स) होती. आकाश कसे स्वच्छ मोकळे वाटत होते. घायाळ जखमा ताज्या होत्या, पण स्वप्नांची क्षितिजे खुणावत होती.

गुलाबी शांतीत ह्या निरभ्र शांततेच्या रेषा – रोझी स्टिलनेस लवकरच मिसळल्या. पंडित नेहरूंच्या जोमदार जोशील्या योजनांना पंख फुटू लागतील असे वाटत होते. दवबिंदूत आकाश उतरावे तशी देशाची बिंबे त्या योजनांत धडकत होती.

नंतर निरनिराळ्या घोषणांनी आकाश गर्जून गेले. पण प्रत्यक्षात समस्यांचे विविध ज्वालामुखीच उफाळत होते. जातीजमातींतल्या भेगा रुंदावत होत्या. विद्यापीठांतून सुशिक्षित बेकारांची फॅक्टरीच उघडली होती. भाषावाद, सीमावाद अधिकच गडद होत गेले. ह्या साऱ्या करवती – समस्या वर्तमानाला अजूनही खोल चरे पाडीत आहेतच.

गुलाबी स्वप्नांवर धूसर पुटे चढली. अनेक कंगोरे घुसले, छिन्न-विछिन्न झाले. योजना बेभान होऊन आखल्या गेल्या, पण भान ठेवून त्यांची अंमलबजावणी झाली नाही.

केवळ स्मित–रेषांचे चेक्स (चेक बुक ऑफ स्माइल्स) घेऊन नेतृत्व जनतेसमोर उभे राहात होते! पण ते चेक वटवणाऱ्या बँका त्यांनी उघडल्याच नाहीत! गरीब हे गरीबच राहिले, श्रीमंत हे अधिक श्रीमंत झाले. ही कबुली पंचवीस वर्षांनंतरही द्यावी लागली! नेतृत्वाची कर्तृत्वाशी गाठ पडली नाही. स्वार्थाशी मात्र त्यांचे सूत्र जमले. आणि जनता समाजवादाच्या प्रतीक्षागृहातच केवळ वाट पहात राहिली. समाजवादाची गाडी येणार येणार म्हणून द्वाही फिरविली गेली. सत्तारूढांनीसुद्धा खणखणीत नारे लावले. हिरवा कंदील झळकला. पण समाजवादाच्या गाडीसाठी रस्ता निर्माण करायचे, रूळ टाकायचे, एंजिन चालवायचे श्रम कुणी घेतलेच नाहीत! प्रेरणा देणारे वातावरण टिकून राहिले नाही. स्वतः चेतनांकित झाल्यावाचून इतरांना प्रेरणा देता येत नसते. वाट पाहणाऱ्या, ताटकळणाऱ्या जनतेने मग आंदोलने, मोर्चे उभारले. त्यांच्यासाठी घोषणांचे रानही नेत्यांनीच उठवले.

मूठभर मोठमोठी शहरे वैभवसंपन्न भासू लागली. खेड्यातल्या वैफल्यग्रस्त निराधार लोकांचे लोंढे शहरांना सतत धडका देऊ लागले. वैभवाच्या तळाशी, सर्व बाजूंनी झोपडपट्ट्यांचा वणवा लागला. त्यातून प्रचंड समस्या उभ्या राहिल्या. डू अॅज आय से,

मी सांगेन तसे करा. असेच धुरीण म्हणत राहिले ! डू अॅज आय डू मी करतो तसे करा, असे आपल्या कर्तृत्वाचे संस्कार द्यायचे भान त्यांना राहिले नाही. ते केवळ सांगत बसले. क्वचितच कोणी काही केले. परिणामी शिक्षणाच्या अफाट विस्तारातही तेवढीच विस्तीर्ण, निराकार, बेतळ पोकळी निर्माण झाली.

तरी स्वातंत्र्योत्तर काळात नेतृत्वावर जनतेने अपार प्रेम केले. त्या प्रेमात श्रद्धा, विश्वास होता; पण त्याला समर्थ प्रतिसाद, दिलासा लाभला नाही. जनतेची मोहिनीही नेतृत्वाला प्रेरणा देऊ शकली नाही. त्यामुळे अॅक्शन डेडिकेटेड सोशल सर्व्हिस, सोशल जस्टिस – समर्पणशील, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे असे कार्य समाजाच्या विविध थरात उभे राहू शकले नाही. समाजाची अशी बांधिलकी करायला कोणत्याही राजकीय पक्षांनी सवड काढली नाही. आणि समाजातील बुद्धिवंत वर्गाने लक्झरी ऑफ स्पेक्टेटर्स-प्रेक्षकीय चैन उपभोगली. नव्या जाणीवा, नव्या आकांक्षा, नवी साहसे तरुणात निर्माण करायला शिक्षणपद्धती आणि बुद्धिवंत असमर्थ ठरले. पर्यायाने समाजाची एकजिनसी जडणघडण होऊ शकली नाही. प्रेरणेने ज्योतिर्मय झालेली तरुणसेना उभी करणे पं. नेहरूंना अशक्य नव्हते. पण गांधीजींनासुद्धा 'एकला चलो रे' चा पंथ अवलंबणे भाग पडले. साने गुरुजींसारख्यांना जगाचा निरोप घ्यावा लागला आणि तेजस्वी क्रांतिकारी नेते राजकीय विजनवासात राहिले. नेत्यांनी युवाशक्तीला नव्या वळणावर चेतनांकित केले नाही, म्हणून असे झाले. आणि ज्या संघटना उभ्या राहिल्या त्यांनाही केवळ निवडणूकसमरातल्या दलांची भूमिका पत्करावी लागली.

अर्थात स्वातंत्र्यानंतर उभे राहिलेले प्रश्न, अडचणी, गुंतागुंती अतिशय बिकट होत्या. क्रांतिकारी पिढीला ती आव्हाने पेलण्याची ताकद होती. पण फाटलेल्या वस्त्राला रफू करण्यातच त्यांची पुष्कळ शक्ती खर्च झाली ! पायरीवरून कळस गाठायला निघावे,



१८७०६

तोच पायरीचा दगड कोसळावा अशी आरंभीची परिस्थिती जाणवली. स्टेपिंग स्टोन–पायरी–हा स्टंबलिंग स्टोन – अडथळा झाला. आणि 'गेटवे' मधून स्वातंत्र्याचा केवळ सूर्योदय जनता पहात राहिली ! गर्दींच्या समस्या एवढ्या होत्या की, रस्ता हेच टर्मिनस अखेरचे ठिकाण त्यांना वाटू लागले. सत्तेच्या लोभाने सर्वंच राजकीय पक्षांनी केवळ 'चलो दिल्ली' चे नारे लावले. युवाशक्ती किंवा जनतेची ताकद संघटित करून ती कामाला लावण्याला त्यांना फुरसत नव्हती.

भूदान–ग्रामदानांनी नवे वातावरण, जिद्द निर्माण केली. विज्ञानाच्या साधनेने अनेक नव्या गोष्टींचे भान झाले. अवजड प्रकल्प धडधडू लागले. पोलादाच्या भट्टयांनी देशांची नवी घडण केली. तरुणांनी या विविध संशोधनांत आपली प्रज्ञा पणाला लावली. धरणांनी हरित क्रांती केली. खेडीपाडी विद्युन्मय झाली. अशा अनेक गोष्टी सफलतेची प्रतीके म्हणून सांगितली जातात. चैतन्याचे चक्र विकासाची दिशा काबीज करीत असल्याचा पुकार होतो आहे. नव्या भगीरथांनी अनेक चांगल्या गोष्टींची उभारणी निश्चितच केली आहे.

पण यातल्या कित्येक गोष्टी गरिबांपर्यंत, समाजातल्या तळथरापर्यंत पोचल्या नाहीत. भुकेच्या यक्ष-प्रश्नावर चिंतन आणि मुलामा फार काळ टिकत नसतो, हेच वर्तमानाने सतत दाखवून दिले आहे. हरित क्रांतीचे वाटप झाले नाही तर त्यात लाल क्रांती दडलेली असते ! सधन–अमीर अधिकच गबर होत आहेत आणि नेतृत्वाला क्रांतिकारी शक्तींची साथ मिळण्याऐवजी भिकेचेच साथी मिळत आहेत ! कोणत्याही राजकीय पक्षाने द्रारिद्र्याचा लचका तोडण्याची हिंमत दाखवली नाही. त्यांनी भूमिसेना उभी केली नाही. ते केवळ कल्लोळ करीत राहिले – आणि समाजवादाच्या चटणीला वेगवेगळा रंग स्वत: पुरता देत आपलाच घास त्यांनी मटकावला ! कुणाचा शुभ्र समाजवाद, कुणाचा लाल, भगवा, निळा ! !

चिझल युवर ओन विलपॉवर टू कार्व द ग्रॅनाइट—पत्थराला आकार देण्यासाठी युवाशक्तीने आपल्या आकांक्षांना, मनोशक्तीला आधी धार लावून घेण्याची गरज आहे. पण समस्यांचे ग्रानाइट कोरून काढण्याच्या छिन्नीबरोबरच डिझाइन सुद्धा तयार हवे. धारेचे आणि ध्येयाचे, उद्दिष्टांचे नेमके भान असण्याची गरज आहे. नेहरूंना समाजवादाची कल्पना होती, प्रतिभा होती, पण त्यावर एकाग्र मेहनत करणे जमले नाही. उत्पादनवाढीसाठी, नेमकी तीव्र कृती करण्यासाठी तत्पर मने घडवण्याचे काम बाकी राहिले.

पक्षातीत रचनात्मक संघर्षाच्या एकवटून केलेल्या प्रयत्नांखेरीज हे चित्र बदलणे अशक्य आहे. निवडणुकीत घोषणांची केवळ फुले आली. पण त्या फुलांच्या पोकळचा झडल्या नाहीत तर त्यातून फळ कसे आकार घेणार ? जमिनीत गाडून घेतल्याशिवाय बीजाला नवे अंकुर फुटत नसतात.

बी समथिंग, बिलिव्ह समथिंग, डू समथिंग—कोणीतरी व्हा, कशावर तरी श्रद्धा ठेवा आणि काही तरी करा हा नव्या युवाशक्तीचा उज्ज्वल उद्यासाठी सुरुवातीचा निनाद आहे. कलावंताचे प्रतिबिंब कलाकृतीत उमटलेले असते. पण तुमचे आमचे प्रतिबिंब देशाच्या योजनांत आपण क्वचितच पाहू शकलो. आमची शर्यत जागी उभे राहण्याकरता आहे की काय ? भाकरीला तत्त्वज्ञानाची गरज नसते, अशी एक जुनी म्हण आहे. पण भाकरी भाजायची तर दर्शन हवेच. रचनात्मक संघर्षाच्या कार्यक्रमांतून प्रत्येक पातळीवर युवाशक्तीला नवी वाट चोखाळायची आहे. उत्पादनवाढ आणि निर्मितीसाठी रचना, समस्यांशी झुंज घेण्यासाठी, जुन्या अडसरांशी झुंज घेण्यासाठी तयारी यातून ही तिसरी शक्ती उदयाला येणार आहे.

# एक आघाडी : समान्तर कार्यक्रम

प्रत्येक पक्षाच्या रचनेत काही लढाऊ आणि विध्वंसक वृत्तीचे, तर काही सहिष्णू व विधायक गुणधर्मांचे घटक असतात. हे विधायक घटक सर्वांशी जुळू शकणाऱ्या रक्तसमूहाप्रमाणे (युनिव्हर्सल ब्लड ग्रुप) असतात. ते तोडण्यापेक्षा जोडण्याकडे स्वाभावाने प्रवृत्त असतात. हीच खरी पक्षाला एकत्र ठेवणारी शक्ती (सीमंटिंग फोर्स) असते. तिच्याशिवाय पक्ष अथवा संघटन उभे राहू शकत नाही. प्रत्येक पक्षातील या शक्तीचे तोंड जमिनीकडे वळवणारा, आणि ही वळलेली शक्ती कामी लावण्यासाठी जमीन लपलब्ध करून देणारा एक रोखठोक व सुसूत्र कार्यक्रम कसा आखता येईल.

प्रत्येक पक्षाला आपला बालेकिल्ला आहे असे वाटणाऱ्या क्षेत्रात, अनुकूल ठिकाणे व साधनसामग्री पाहून पक्षाच्या संचालनाखाली कृषिऔद्योगिक उत्पादनाभिमुख (प्रॉडक्शन ओरिएंटेड) प्रकल्प हाती घ्यावे लागतील. या प्रकल्पांचे पुढील मुख्य उद्देश असू शकतील :

: पक्षाला अभिप्रेत असलेल्या समाजरचनेचे साकार आदर्श उभारण्याचा प्रयत्न.

: पक्षसंघटनेचा खर्च भागविण्याचे एक साधन.

: पक्षकार्य आणि इतर विधायक कार्यांसाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण.

: प्रकल्प आणि परिसरातील विस्तारकार्याद्वारे अन्नोत्पादनात वाढ आणि अतिरिक्त उत्पादनाची टनांच्या संख्येत निश्चित केलेली लेव्ही देशाला देणे.

देशातील निरनिराळ्या भागांतून हे प्रकल्प चालवण्यासाठी निवडक कार्यकर्ते जमा करावे लागतील. या कार्यकर्त्यांना शाश्वती आणि संधी (सिक्युरिटी अँड ऑपॉर्च्युनिटीज) दोन्ही देणारे हे प्रकल्प असावे लागतील. पोरांबाळांना घरी खायला असले की क्रांतीसाठी वाऱ्यांवर घर करणे सोपे असते ! हे प्रकल्प म्हणजे एक प्रकारे मानवशक्तिसंवर्धन केंद्रच (मॅन पॉवर ट्रेनिंग सेंटर) असतील. पक्षाचे नेतृत्व तेथे तयार होईल. अभ्यासकाल (स्टडी पीरिएड), प्रत्यक्ष व्यवहार (अॅप्लाईड वर्क) आणि तेथून पक्षकार्य (पार्टी वर्क) व तेथून सत्ताकेंद्राचे संचलन, अशी या नेतृत्वाच्या विकासाची दिशा राहील.

पक्षाचे तावूनसुलाखून बाहेर पडलेले विधायक प्रवृतीचे कार्यकर्ते व मित्र त्यांचे संचलन करण्यासाठी काही काळ तेथे गाडून घेतील. संघ, सेवादलाच्या शाखांतून तयार झालेली मुले, शाळाकॉलेजांतील समाजकार्याकडे कल असलेले तरुण, बेकार युवक, पक्षावर निष्ठा असलेल्या शेतकऱ्यांची उत्तम शेतकरी होऊ इच्छिणारी मुले, निवडक भूमिहीन कामकरी, 'शाश्वती आणि संधी'ची हमी घेऊन तेथे येतील. ही दुहेरी हमी असली तरच तरुण मन चाकोरीच्या बाहेर सहज उड्डाण ठोकू शकते.

या प्रकल्पांना कुठलाही ठराविक छाप असणार नाही. प्रत्येक प्रकल्प परिस्थितीनुरूप स्वयंसिद्ध (इंडिजिनस) असा असू शकेल. कृषीच्या सूर्याभोवती फिरणारी उद्योग–व्यवसायांची ग्रहमालिका हा त्यांचा रचनेचा पाया एकदा निश्चित झाली की स्थानिक माती-प्रमाणे स्वाभाविकपणे अनुरूप असा आकार त्याला येईल. कोठे दोनशे एकरांचे संकरबीज क्षेत्र (हायब्रीड सीड फार्म) उभे राहील, तर

कोठे कोरडवाहू शेतीचे उच्चांक गाठण्याचा प्रयत्न होईल. वीस हजार एकरांच्या मोठ्या फार्मपर्यंत सर्व प्रकार यांत बसू शकतील. हीच विभिन्नता संलग्न उद्योग, सहकारी दुग्धसंघटना (मिल्क युनियन), ट्रान्स्पोर्ट युनियन, क्रीमरी, राइस मिल, सूत गिरणी, यंत्रभागांचे उत्पादन (अँन्सीलियरी इंडस्ट्रीज) याही बाबतीत असू शकेल.

रशियन अथवा चिनी धर्तीचे साचेबंद मन या प्रयोगांतून तयार होण्याचा संभव नाही. कारण सगळ्याच पक्षांचे असे कार्यक्रम असतील. पक्षोपपक्षांच्या स्पर्धेला एक विधायक व निकोप वळण देता येईल आणि त्यातून केवळ विध्वंस व विद्वेष या फलिताऐवजी, अन्नस्वावलंबनाचे किमान फलित देशाच्या पदरात पडू शकेल. स्वार्थप्रेरणेने का होईना, पण निर्मिती करणारी मानवी संचलन-शक्ती मोकळी होऊ शकेल. भारतीय लोकशाहीने लोकशाहीच्या जागतिक उत्क्रांतीला दिलेली, ही एक अभिनव दिशाही कदाचित ठरू शकेल.

प्रकल्पाचा विकास एका टप्प्यापर्यंत येऊन पोचला की त्याचा विस्तार कार्यक्रम सुरू होईल. तेथील प्रशिक्षित युवकांच्या टोळ्या लगतच्याच अनुकूल परिसरात दुग्धव्यवसाय संघटनेसारख्या कार्य-क्रमांची शृंखला पुढे नेतील अथवा पक्षासाठी आणखी एखादा प्रकल्प उभारू लागतील. प्रशिक्षण झाल्यावर त्यांच्यासाठी काम वाढून ठेवलेले असेल ते असे :

: या प्रकल्पावर पक्षसंघटनेच्या ध्येयवादाला अनुरूप असे, बालकमंदिरापासून विद्यापीठापर्यंत विशिष्ट संस्कारी शिक्षण देण्याचाही विचार होईल. ज्यांची उदरनिर्वाहाची फिकीर संपलेली आहे असे तारुण्य, अनुभव आणि प्रतिभा शेतीच्या कक्षेत एकत्र बसतील तेव्हा त्यांच्या धडपडीतून साकार होणाऱ्या या शिक्षणसंस्थांचे रूप ‘ भाडोत्री ’ असण्या-

ऐवजी काही वेगळेच राहील. या कृषिउद्योगांच्या प्रक्रियेत व व्यवहारांत प्रत्यक्ष कौशल्य मिळवणारा हा तरुण गुरू मातीचा पुतळा असला तरी एकलव्यासारखा सवाई द्रोणाचार्य निघावा. व्यापक दृष्टिकोणाने विशेषीकृत प्रशिक्षण (इन्टेन्सिव्ह ट्रेनिंग वुइथ एक्स्टेन्सिव्ह आउटलुक), व्यावसायिक दृष्टिकोणातून विशेषीकृत अनुभव (इन्टेन्सिव्ह इक्स्पिरियन्स वुइथ बिझिनेस आउटलुक) असे या शिक्षणाचे स्वरूप राहावे.

: रशिया, चीनमधील कम्यून्स, इस्रायलमधील किबुत्स, मोशाव, अथवा जुने भारतीय आश्रम व गुरुकुल यापेक्षा हे प्रकल्प देश, काल व परिस्थितीनुरूप वेगळे राहतील, आणि वरील जीवन-प्रयोगांतील इष्टानिष्ट निष्पत्तींचा फायदा त्यांना घेता येईल. धोके सुरुवातीपासून टाळता येतील. हे युगच कलम बांधण्याचे आहे! पुन्हा सुरुवातीपासून प्रत्येक प्रयोग नव्याने करण्याची जरूरी नाही. या प्रयोगांतून निष्पन्न झालेल्या उत्क्रांत तत्त्वांच्या समन्वयाने उन्नत संकर (हायब्रीड) साधण्याचा प्रयत्न त्यात करावा लागेल. उदाहरणार्थ, कम्यून्स आणि किबुत्स वसाहतीत कमीअधिक प्रमाणात आढळून येणारा साचेबंदपणा (रेजिमेंटेशन) त्या वसाहतीत नको. जुन्या भारतीय आश्रमातील गुरूचे व्यक्तिकेंद्रित गुरुत्वाकर्षणही, संकुचितपणाच्या व विकृतीच्या सीमेपर्यंत तेथे नसावे. या जुन्या आश्रमातील सहजता, सौंदर्य व स्वातंत्र्य आणि या विदेशी साम्यकुलातील साहस, कर्तृत्व व वैज्ञानिक दृष्टी हे आधुनिक भारतीय साम्यकुलात एकत्र यावे. गतिशील विभिन्नता (डायनॅमिक डायव्हर्सिटी) आणि ध्येयोन्मुख शिस्तबद्धता यांचा समन्वय या प्रकल्पांत घालता आला पाहिजे. आणि त्यातून 'आम्हाला अभिप्रेत असलेली ती ही पहा समाजव्यवस्था!' असे जिच्याकडे बोट दाखवून म्हणता येईल अशी सगुण उभारणी करणे या विभिन्न पक्ष–संघटनांचे अंतिम ध्येय असले पाहिजे. प्रत्यक्ष वास्तवाच्या मुशीतून

या ध्येयांचे रूपही अधिकाधिक स्पष्ट होत जाईल. हे प्रकल्प लोकशाहीची मुळे ( ग्रासरूट्स ऑफ डेमॉक्रसी ) मजबूत करतील. विरोधी पक्षीयांची छाया मंत्रिमंडळे (शॅडो कॅबिनेट्) तालुका पातळीवरून उभारणे शक्य होऊ शकेल. पर्यायी संचलन शक्ती (पॅरलल पर्सोनेल) या खालच्या पातळीवरूनच तयार करता येईल. शेतकऱ्याला जो कार्यक्रम द्यायचा तो आधीच हातांतून गेल्यामुळे कार्यक्रम देणे तर सोपे होईलच, शिवाय नोकरशाहीच्या गुंताळ्यातून त्याच्या अंमलबजावणीचा नेमका रस्ताही घडवणे सोपे होईल. भान ठेवून योजनांची आखणी आणि बेभान होऊन त्यांची अंमलबजावणी या दोन्हींची सांगड नुसती हवेत राहणार नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात सेवाग्राम सारख्या संस्थांतून माणसे प्रक्षेपित केली गेली, तशी समाजाच्या नव्या गरजांशी सुसंवादी असे कर्तृत्व व नेतृत्व देणारी माणसे या प्रकल्पांतून अहमहमिकेने फेकली जातील.

मतदारांच्या हातात निर्णयाचे काही मानदंड देता येतील. इतरांची व स्वतःचीही नैतिकता मोजणारे थर्मामीटर अजून अस्तित्वात यायचे आहे. त्यामुळे आचारसंहिता व सदाचार समिती ह्या पाण्यावरील रेघांप्रमाणे प्रभावशून्य व क्षणजीवी ठरत आहेत. काँग्रेसचा सीडफार्म कसा चालतो, जनसंघाची मिल्क युनियन आपल्या शिस्तबद्ध स्वयंसेवकांच्या बळावर कशी बळावते, समाजवाद्यांची शीलवान संघटना उद्योगधंद्यांचे समाजीकरण कसे यशस्वी करून दाखवते आणि दलितांच्या थरांतून झपाट्याने वर येऊ लागलेले रिपब्लिकन वा नवबौद्ध कार्यकर्ते आपल्या जिद्दीतून कोणते कर्तृत्व प्रस्थापित करतात ते जनतेला दिसेल. कोणता पक्ष आपल्या पूर्व संकल्पाचे इष्टांक पूर्ण करून दाखवतो ते जनता पाहील आणि कौल देईल. श्राद्ध करायचे नसेल तर बाप दाखव, असा रोखठोक प्रश्न तिला उमेदवाराला विचारता येईल.

भ्रष्ट कैरो जर पंजाबला उद्यमशील बनवू शकतो, तर ज्यांच्या

माणसे व परिस्थिती हाताळण्याच्या कौशल्यावर राष्ट्राचे शिक्का-मोर्तब झाले आहे, ते समाजाच्या तळच्या थरांतून वर आलेले शुद्ध चरित् आणि व्यक्तित्वसंपन्न राष्ट्रीय नेते, अशी एक फळी का उभारू शकत नाहीत ? बैलांचे प्रतीक धारण करणाऱ्या सत्ताधारी पक्षाने गोवंशसंवर्धनाचे प्रकल्प चालवण्याचा विक्रम किती ठिकाणी केला आहे ? कितीजणांनी कृषिऔद्योगिक सहकारी संस्था न बुडवता चालवल्या आहेत ?

मतदान क्षेत्रातले धान्योत्पादन इतके टन आहे, आमच्या पक्षाच्या कर्तृत्वाने आम्ही ते इतके वाढवणार, ही त्याची योजना, ही त्याची साधनसामग्री, इतकी आमची धान्यवसुली, असे त्याचे वितरण, असा रोखठोक कार्यक्रम या कार्यकर्त्यांना देता आला पाहिजे. अन्न-दुर्भिक्ष्यावर उत्पादनवाढ आणि संततिनियमन असे दुहेरी आक्रमण (टू प्राँग्ड अटॅक) पक्षसंघटनेच्या बळावर त्यांना, मतदारसंघ ही सीमा ठरवून, करता आले पाहिजेत.

आजपर्यंत सत्तारूढ पक्षाने ‘ हे घ्या ’ म्हणून नुसती खैरात करण्याचा खाक्या ठेवला आहे ! जमीन आमची, पैसा आमचा, तुम्ही खा. फक्त मतदानाच्या दिवशी जास्तीत जास्त लोकांना धरून आणण्याची सोय करून ठेवा...असे अलिखित आश्वासन आजच्या तथाकथित सेवासहकारी कार्यकर्त्यांच्या पाठीशी असते. कुठल्याही कार्यक्रमाने तो जनतेशी जाहीर रीत्या बांधलेला नसतो. तो काँग्रेसचीही सेवा करीत नाही आणि जमिनीचीही करीत नाही ! मग ऐतखाऊपणा व बेजबाबदारी झाकण्यासाठी सर्व बाह्य सोंगेढोंगे तो कडव्या निष्ठेचा आव आणून चालवतो !

या अकर्मण्यतेनेच पंडितजींसारख्या जागतिक नेत्याला अखेर वैफल्य आले आणि ‘ मेल्यावर माझी राख शेतांत पसरा ’ असे सुंदर, तरीही करुण मृत्युपत्र त्याला करून ठेवावे लागले ! शास्त्रीजींचे ‘ जय जवान ’ झाले, पण ‘ जय किसान ’ करणारे हे दुसऱ्या व

तिसऱ्या फळीचे नेतृत्व अशा सच्च्या, जबाबदार प्रकल्पांतूनच उभे राहू शकेल.

विनोबांच्या आध्यात्मिक नेतृत्वात ही शक्ती आहे. पण ते सूक्ष्मात प्रवेश करण्याऐवजी अधिक भौतिक व्हायला हवे आहे. त्यांच्याजवळ ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, पण नुसत्या कागदावर सह्या जमा करून व ग्रामदान अॅक्ट पास होऊन त्यांना अभिप्रेत असलेला भूमिक्रांतीचा वणवा पेटणार नाही. या थोर कार्यकर्त्यांच्या ज्येष्ठ पिढीचे डोळे मिटण्यापूर्वीच, त्यांच्या डोळ्यांदेखत तो विझून गेलेला दिसेल ! पण ठिकठिकाणी उजळलेल्या ठिणग्यांचा वन्ही जिवंत ठेवणारे असे प्रकल्प या हजारो कार्यकर्त्यांनी हाती घेतले तर एका पिढीच्या आत वणवा सर्वत्र पसरलेला दिसेल. असे प्रकल्प ग्रामदानी गावांत संघटित करून, ग्रामदान तुफानात निर्माण झालेली शक्ती सर्जनाच्या कामी लावण्याचे अभियानही त्यांना सुरू करावे लागेल. अन्यथा श्रद्धावान गावकऱ्यांत या एकूण प्रकराबद्दल काहीशी जागी झालेली श्रद्धा, प्रतिक्रियेने, अंधश्रद्धेचे विघातक रूप घेतल्याशिवाय राहणार नाही. जिल्ह्यातील ग्रामदान आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या एका प्रमुख सर्वोदयी कार्यकर्त्याच्या जन्मभूमीत जाण्याचा प्रसंग आला. हे मोठ्यापैकी, जागृत वातावरणाचे गाव ग्रामदानात गेले आणि लगोलग, निधीकडून मिळणारे अनुदान बंद पडल्यामुळे तेथील चरखा संघाची शाखा बंद पडलेली ! गांधीजींचे पाय जेथे लागले होते तो आश्रम नेमका ग्रामदानानंतर बंद पडला ! चरक्यांची सूड अडगळीच्या खोलीत रचून ठेवलेली ! आणि निधिजीवी कार्यकर्ते 'व्यापक' होण्याच्या भूमिकेने सैरभैर पांगलेले दिसले ! हे चित्र अपवादात्मक नसून प्रातिनिधिक ठरेल अशी भीती आहे. ग्रामदानांचे इष्टांक व प्राप्तांक जाहीर करण्याबरोबरच ग्रामदानी खेड्यांतील प्रगतीचे आलेख जाहीर होऊ लागतील तेव्हाच या सुतकी वातावरणात बदल होऊ शकेल. आपल्या पूर्वग्रहांच्या झापडी काढून व व्रत–वैकल्यांच्या शृंखला झुगारून या कार्यकर्त्यांना भूमिक्रांतीच्या आघाडीवर लढावे लागेल.

अृषी-शेतीपसून यांत्रिक शेतीपर्यंत, आणि अंबर चरख्यापासून सहकारी सूतगिरणीपर्यंतचे प्रकल्प त्यांना चालवावे लागतील. महायंत्रांचे सर्व फायदे उपटून त्या यंत्रांच्या भव्यतेला व शक्तीला अस्पृश्य लेखण्याची आत्मवंचना सोडून द्यावी लागेल. विनोबांच्या शांति–सैनिकांनाही अखेर शेतावर जावे लागेल. कारण नुसत्या प्रबोधनाने शांती उत्पन्न होत नाही आणि अशांत पोटात ती नांदू शकत नाही !

गाईला देव मानणाऱ्या देशात, गाई खाणाऱ्यांच्या देशांतून, माणसांना जिवंत ठेवण्यासाठी अन्न येते, त्याची लाज गमावून आम्ही नसती उपोषणे व आंदोलने करीत आहोत ! शेतीच्या परिसरातली गोकुळे निर्माण करण्याची धमक यापैकी किती आंदोलकांनी दाखवली आहे ? जुन्या मालगुजारांच्या व जमीनदारांच्या, कूळकायद्याला बगल देऊन पडलेल्या, तण पिकवणाऱ्या, ओसाड जमिनीवर राष्ट्रीय उत्पादनासाठी पक्षांचे प्रकल्प का चालू नयेत ? स्वतंत्र पक्षाच्या भाईलाल भाई पटेलांसारख्या ' आनंद 'चे गोकुळ व ' विद्यानगर ' निर्माण करणाऱ्या नेत्याला व्यक्तीचा स्वतंत्र पराक्रम अशा तऱ्हेने गाजवण्याचा कार्यक्रम पक्षाला का देता येऊ नये ?

राष्ट्र सेवादलातील तरुणांना, कोणत्याही समाजवादी पक्षांचे ' सेंकड फिडल ' वाजवण्याची गतानुगतिकता पत्करण्याऐवजी, हे निखळ समाजवादी प्रकल्प चालवता येतील, आणि खरे ' सोशलिस्ट फौंडेशन ' उभारता येईल. सेवादलाचे शिक्षण घेताना जसे सेवादलच, तसे प्रकल्प उभारताना प्रकल्पच. त्यानंतर हवी तर पक्षाला त्यांनी वर्षे द्यावीत. पूर्ण वेळ देऊ न शकणाऱ्यांनी उन्हाळ्याच्या, नाताळच्या सुट्ट्या अथवा फावल्या वेळातली शक्ती तेथे नियोजितपणे केंद्रित करावी. उद्या समाजवाद्यांच्या हातात सत्ता आली तरी राष्ट्रीयीकरणानंतर कारखाने कोण चालवणार ? समाजवादाशी जिचे काही सोयरसुतक नाही अशी गॅझेटेड नोकरशहांची यंत्रणाच

की नाही ! टाटांच्या दिवाणजींकडून चालवल्या जाणाऱ्या त्या झोपलेल्या कारखान्यात, हा प्रशिक्षित समाजवादी अथवा साम्यवादी तरुण जाईल, तेव्हा त्यालाही समाजक्रांतीच्या जिवंत माध्यमाचे रूप तो देऊ शकेल. राष्ट्रीय एकात्मता आणि सर्व लोकशाही राजकीय विचारांचा प्रागतिक समन्वय असे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून काही पक्षातीत प्रकल्पही चालवता येतील. सोमनाथ येथील 'मानव शक्ती संवर्धन केंद्र' (मॅन पॉवर ट्रेनिंग प्रोजेक्ट) हा याच संदर्भात होणारा प्रयत्न आहे. सर्व पक्ष संघटनाच्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना सोमनाथाचे आव्हान आहे. म्हणून तेथे काँग्रेसच्या अब्दुल शफीचेही स्वागत आणि साधनाकार यदुनाथ थत्त्यांचेही. कलेक्टर राऊत यांना त्यात जेवढा रस तेवढा डॉ. सदाफळ या संघनिष्ठ कृषितज्ज्ञासही. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना त्याबद्दल उत्कंठा आणि सर्वोदयी अण्णासाहेब सहस्रबुद्ध्यांचीही त्यासाठी केवढी धडपड !

भाषा व प्रांतभेदांवर पक्षांची अखिल भारतीयता मात करू शकत नाही, असा अनुभव आहे ! एका दिवशी अधिवेशनात एकत्र येऊन, भावनात्मक ऐक्य साधले जाऊ शकत नाही. पण उत्तर–दक्षिणेतले तरुण आपल्या पक्षाच्या अथवा अशा एखाद्या पक्षातीत प्रकल्पात एकत्र येऊन या भेदांचे फोल व कालबाह्य स्वरूप अनुभवाने पाहू शकतील. भुकेचा प्रश्न सोडवण्याचेही कसब हेच अंतिमतः वंश, भाषावादांचा प्रश्न सोडवण्याचेही कसब आहे ! भुकेची भाषा हीच खरी आंतर भारती आहे !

संघाच्या बौद्धिकांतले राष्ट्रैक्यही फक्त शाखास्थानांवर, झेंड्याखाली नांदत असते ! पण तोच धनिक शेतकरी तांदूळ साठवून आपल्या गरीब हिंदू बांधवाला भरमसाट भावाने विकताना मागे पुढे पाहात नाही ! त्याचा ध्येयवाद तेथे लटका पडतो, आणि हा त्याचा दोष नसून परिस्थितीच्या ज्या कोंडाळ्यात तो सापडलेला आहे त्याचा दोष असतो.

संघाचे शिबिर सोमनाथसारखे जंगल तोडून देण्यासाठी का भरू नये ? बुद्धाच्या जिद्दीनेच पण निर्वाणाऐवजी निर्माणाची साधना करणारे बुद्धिमान तरुण सैनिकांच्या शिस्तीने, विशिष्ट साहसासाठी एकत्र येतील तर एकमेकांच्या रागलोभांवर व मतभेदांवर मात करणारे वातावरण त्यांना तयार करता येईल. (हा बुद्धिमान समाजवादी तरुण आज मन नसून बँकेत नोकरी करतो ! काँग्रेस-निष्ठ ध्येयवादी, खोटया पगारावर मुकाटयाने सह्या करतो ! आणि संघाचा तरुण मुख्याध्यापक 'युगांतर' पाहणाऱ्या शाळेची खोटी बिले तयार करतो ! ) प्रकल्पांत काम करताना प्रकल्प हीच प्राथमिक निष्ठा, अशी मनाची तयारी करून त्यांना यावे लागेल आणि व्यक्तिगत व पक्षीय महत्त्वाकांक्षा काही काळासाठी काबूत ठेवाव्या लागतील. या प्रकल्पांतून अनुभव आणि सामर्थ्य यांचे जे द्रव्य उपलब्ध होईल, त्यावर आपल्या विचारसरणीचे कलम मग पक्षसंघटनांनी बांधावे. नुसती लेबले लावू नयेत ! मार्क्सचे पुस्तक, अमेरिकेत बसून जयप्रकाशही वाचतो, तसा हा प्रकल्पही वाचता यावा ! येथे तयार झालेले कार्यकर्ते आपल्या संघटनेसाठी अशाच तऱ्हेचे अथवा त्याच्या खांद्यावर उभे राहून अधिक व्यापक क्षितिज पाहणारे प्रकल्प चालवू शकतील.

अमेरिकन भांडवलदारांना सरकार उद्योग उभारू देते. रशियन उभारणीचे कारखाने व सीड–फार्म भारतात चालू शकतात, इंडो–अमेरिकन एज्युकेशन फौंडेशन काढताना भीती वाटत नाही, त्याच निर्भयतेने इतरही पक्षांना ही संधी उपलब्ध करून देण्यात सत्तारूढ पक्षाला कसेसे वाटू नये ! ही पक्षांची उत्पादक चढाओढ भारतीय निवडणुकांसारखी न्यायी यंत्रणेद्वारे व निकोप वातावरणात कशी सुरू करता येईल ?

ही यंत्रणा उभारण्याची दिशा, पुढीलप्रमाणे सूत्रबद्ध करता येईल–

: एक प्राथमिक स्वरूपाची पण मध्यवर्ती संयोजन व संपर्क समिती (लायसॉनिंग एजन्सी).

: सर्व राजमान्य पक्षांच्या सर्वोच्च राष्ट्रीय नेत्यांची परिषद आणि सर्वपक्षीय प्रकल्प अभियानांच्या (ऑल पार्टी ॲक्शन प्रोग्रॅम) कल्पनेला मान्यता.

: तिच्यावर संसदेचे शिक्कामोर्तब.

: दरम्यानच्या काळात, आनुपातिक प्रतिनिधित्वाच्या (प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन) आधारावर राष्ट्रीय छाया मंत्रिमंडळांची (नॅशनल शॅडो कॅबिनेट) निर्मिती. या मंत्रिमंडळाच्या बहुमताने अ-राजकीय संस्थांच्या प्रतिनिधींची निवड, संविधान तयार करणे. त्यानंतर पक्षशाखांना प्रकल्प योजना तयार करण्यासंबंधी आदेश.

: एका विशेषज्ञ (टेक्नोक्रॅट्स) मंडळाची निर्मिती, आणि ६७ च्या निवडणुकीतील उपलब्ध राजकीय चित्राच्या आधारे सर्व राजमान्य पक्ष व अपक्ष संघटनांसाठी प्रकल्प उभारणीच्या योग्य क्षेत्राची पाहणी व अंतिम निवड.

: प्रकल्पांसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचे संपादन, संयोजन, संचालन व नियंत्रण.

: प्रकल्पाच्या फलितांचे नियतकालिक मूल्यमापन (इव्हॅल्यूएशन) व राष्ट्रीय निर्मिती संविधानात ठरतील त्याप्रमाणे आवश्यक उपाय योजना.

: अपक्ष लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांद्वारे तालुका पातळीपासून या सर्वपक्षीय छाया मंत्रिमंडळाच्या कामकाजाला पूरक व प्रेरक ठरतील अशा ‘ मतदार मंडळांची ’ निर्मिती.

# उज्ज्वल उद्यासाठी

लोळागोळा होणाऱ्या शरीराने जगण्यापेक्षा मरणाआधी पुनश्च पंखाच्या कवेत वादळ घेण्याची गरुडाची मस्ती, ज्वालांचा मखमली सहवास, वादळाचे धगधगते प्रचंडगती वाहन, ध्येयसूर्याची धगधगती आग यांनी, आपलेच पंख बेचिराख करावे, असे वाटते. इंद्रावती मला खुणावत आहे. भमरागडच्या त्या आदिमानवाच्या प्रदेशात मानवतेची नवी पहाट जागवावी, अशी मला ओढ लागलेली आहे. विजय नव्हे; वेदना हीच माझ्या परिपूर्णतेवरची मोहोर असेल.

माझा अंतरात्मा तरुणांच्या हृदयात प्रवेश करण्यासाठी आक्रंदत आहे. माझ्या देशातली तरुणाई मला परमप्रिय आहे. ह्या तरुणाईला माझी एकच आर्त साद आहे. तुमच्या 'होकारा'पासून, युवकांनो, मला वंचित करू नका. बिजलीच्या सोनेरी धाग्यांनी तुम्हाला ध्येयाशी करकचून बांधण्यासाठी मी आसुसलो आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील भमरागड, ठाणे जिल्ह्यातील मनोर, व धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागातील आकाशातल्या मेघांच्या रित्या पोटांचे नगारे– युवकांनो, तुम्ही नीडरपणे वाजवा. हो–नाहीचा पदन्यास करीत नाचण्या-बागडण्यात मी धन्यता मानीन. माझ्या वेदनांशी मी उद्दामपणे वागणार नाही. विनयाने वागेन.

माझे अंतिम साहस हाच माझा अंतिम आसरा आहे. मला ज्वालांच्या सहस्र जिव्हांनी युवकांना सांगावयाचे आहे : युवा-मित्रांनो, राज-

कीय पक्षांनी तुम्हाला जखडण्यासाठी लावलेल्या सापळचात अडकू नका. तुमच्या तरुण मनावर त्यांना कब्जा करू देऊ नका. अरे, जेथे माशांचा मागमूस नाही, अशा पाणथळीत गळ लावून कशासाठी बसता आहात ? कान उघडे ठेवून ऐका. अरे, युवक तो की– ज्याचा घनगंभीर आवाज ऐकल्यावाचून थडग्यातली प्रेते आणि थडगी खोदणारे हातदेखील राहत नाहीत. केवळ बघ्याची भूमिका घेऊन आपले अवघे भवितव्य सुळावर चढवले जात असताना मुकाटचाने पाहू नका. आता मी तर असह्य वेदनांच्या पाशांनी जखडला गेलो आहे; पण मानवता थडग्यात दफनवली जात असताना मीं थंडपणे तिच्याकडे पाहू शकत नाही ! माडिया गोंडाच्या तीरकमठचातून सुटलेल्या तीरासारखा मी वेध घेऊ इच्छितो. साहसाचे पंख लेवून, अनघड अकलेचे पाथेय घेऊन, मीं तरुणांच्या मेळाव्यात धावत येऊ इच्छितो. सुखाचीं आकांक्षा माझ्यात आहे, पण त्याला लाथाडण्याचीं कुवतही माझ्यापाशी आहे. माझा सोशिकपणा, माझा धीर, माझ्या दुःखांची, वेदनांची माझ्यावरील संकटांची आतडी कुरतडल्याशिवाय राहणार नाही. मला पेंढा भरलेला आणि सुस्कारे सोडणारा युवकांचा मित्र बनायचे नाही.

आलतू फालतू बदलांची तरुण मनाला आता ओढ नाही. क्रांतीचा सिंहनाद ऐकण्याची उत्कंठा त्याला लागली आहे. समाजाच्या दडपलेल्या, दलित थरांना आता जाग आणावी लागणार आहे. आपले युवक कार्यक्रम सगळे त्याचसाठी आहेत. रचनात्मक संघर्षातूनच क्रांतीचा हा सिंहनाद युवकांच्या हृदयाच्या गाभाऱ्यात घुमेल, हे निःसंशय. युवाशक्ती संघटित करण्याचे स्वप्न आपल्याला खुणावत आहे. त्यांच्या या संघटित शक्तींना रचनात्मक संघर्षाच्या मार्गानेच योग्य वळण मिळणार आहे. माझी नजर वर्तमानात खिळलेली आहे. नीत्शेने एके ठिकाणी म्हटले आहे : " माणूस म्हणजे आश्वासक सामर्थ्याचा धनी. " मी एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणू चाहतो की, " आश्वासक सामर्थ्यावर विसंबून निधडे-

पणाने क्रियान्वय साधण्यासाठी पुढे पाऊल टाकतो तो माणूस ! ” या भव्य प्रक्रियेवर माणसाचा भरवसा हवा. युवकांना मी वचन दिले आहे– रचनात्मक संघर्षाचे आंदोलन उभारण्याचे. युवकांना दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याचा माझा ध्यास हे वृथा स्वप्न-रंजन आहे, असे मला वाटत नाही. दुःखात सुख शोधण्याचा तो हव्यास नव्हे. प्रेम कधीच विफल होत नसते. प्रेमाला निराशा स्पर्श करू शकत नाही. प्रेम अहर्निश आशावन्त असते. आशेला प्रेमाचा कधी कंटाळा येत नाही. प्रेमापुढे माझा माथा विनम्र आहे. त्या एकाच शक्तीवर माझा पराकोटीचा विश्वास आहे.

नागा प्रदेशातील शूर अनामिक हुतात्म्यांच्या समाधीवर एक वाक्य नोंदले आहे म्हणतात :

घरी आपुल्या जाल जेधवा
सांगा अमुची अंतिम वाणी
‘ उद्या ’ तयांचा जज्ज्वल व्हावा
यांस्तव दिधला ‘ आज ’ आमुचा

लोकांच्या उज्ज्वल ‘ उद्या ’साठी ‘ आज ’ची आहुती देण्याला सिद्ध असणारे तरुण आन्तर भारतीच्या कार्यक्रमातून हजारोंनी पुढे सरसावले पाहिजेत. तरुणांनी पराभूत प्रेमिकाप्रमाणे प्रेमावरील विश्वास गमावल्यासारखे वागू नये. तरुणांना दृष्टी आहे, उत्कंठा आहे, पण करुणेच्या स्पर्शाला ते पारखेच राहिले आहेत. योजना-पूर्वक, संघटित प्रयत्न करण्यातला आनंद त्यांनी चाखायला हवा. संकल्प आणि सिद्धी यांतील अंतर कृतीने सांधायचे असते, याची त्यांना पुरेशी जाणीव हवी. संकल्पाचे बळ तर त्यांचे आटले नाही ना ? संकल्पाला सिद्धीने कृतार्थ करण्याची उत्कंठा त्यांना लागली पाहिजे. संभाव्यतांच्या अंधारात चाचपडत फिरत राहून नीत्शे आणि हेगेल यांना आशेचा दरवाजा गवसला नाही. मंगल प्रभात पाहण्याच्या उत्कंठेने तरुणांना चालते केले पाहिजे. वास्तवाची

ती प्रभात त्यांना गवसली पाहिजे. हगेल म्हणाला होता: “ जे होण्यासारखे आहे, ते झाले पाहिजे. ” जे होण्यासारखे आहे ते घडण्यासाठी आन्तर भारतीचे कार्यक्रम अधिक नेटाने, जोमाने आखावयास हवेत.

REFBK-0018706

'ज्वाला आणि फुले', 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ', 'माती जागवील त्याला मत', 'सार्वजनिक संस्थांचे संचालन', या चार पुस्तकांनंतर 'उज्ज्वल उद्यासाठी' हे बाबांचे पाचवे पुस्तक 'युवक अकादमी'तर्फे प्रकाशित होत आहे. बाबांची शब्दकळा अलौकिक आहे. त्यात अथांग विचारवता आहे, आणि सजग अनुभूती आहे, दुर्दम्य आशावाद आहे. नवी क्षितिजे पाहण्याची उत्कंठा आहे. 'उज्ज्वल उद्या'साठी निरंतर धडपडण्याची प्रेरणा युवकांना मिळावी या तळमळीतून लेखनाचा उगम झाला आहे. निर्भीड चिकित्सा, सहानुभूत अनुभवांचे रहस्य आणि उद्याच्या जगाचे मोहक परंतु चकरावून टाकणारे चित्र या चिंतनात आढळून येईल.

ती प्रभात त्यांना गवसली पाहिजे. हगेल म्हणाला होता : " जे होण्यासारखे आहे, ते झाले पाहिजे." जे होण्यासारखे आहे ते घडण्यासाठी आन्तर भारतीचे कार्यक्रम अधिक नेटाने, जोमाने आखावयास हवेत.

८०३४६ निबंध
२२३९ ११६५३

१८७०६

REFBK-0018706

'ज्वाला आणि फुले', 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ', 'माती जागवील त्याला मत', 'सार्वजनिक संस्थांचे संचालन', या चार पुस्तकांनंतर 'उज्ज्वल उद्यासाठी' हे बाबांचे पाचवे पुस्तक 'युवक अकादमी'तर्फे प्रकाशित होत आहे. बाबांची शब्दकळा अलौकिक आहे. त्यात अथांग विचारवता आहे, आणि सजग अनुभूती आहे, दुर्दम्य आशावाद आहे. नवी क्षितिजे पाहण्याची उत्कंठा आहे. 'उज्ज्वल उद्या'साठी निरंतर धडपडण्याची प्रेरणा युवकांना मिळावी या तळमळीतून लेखनाचा उगम झाला आहे. निर्भीड चिकित्सा, सहानुभूत अनुभवांचे रहस्य आणि उद्याच्या जगाचे मोहक परंतु चकरावून टाकणारे चित्र या चिंतनात आढळून येईल.